



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, मंगळवार ११ ऑगस्ट २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०





# रांचीमध्ये आंदोलक विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज अन् पाण्याचा मारा!

■ डोक्यावर मारल्या लाठ्या...! ■ विद्यार्थी नेता देवेंद्र रुग्णालयात ■ विधानसभेला घेराव घालताना मोठा राडा












**रांची/वृत्तसंस्था :** झारखंडची राजधानी रांची येथे JPSC-JSSC परीक्षेतील कथीत अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. आज या विद्यार्थ्यांनी बॅरिकेड्स तोडून विधानसभेला घेराव घालण्यासाठी विधानभवनाकडे कुच करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान पोलीस आणि आंदोलकांमध्ये संघर्ष ऊफाळून आला. विद्यार्थ्यांनी पुढे सरकण्याचा आणि बॅरिकेड्स ओलांडण्याचा प्रयत्न केल्यानंतर, पोलिसांनी त्यांच्यावर पाण्याचा मारा आणि लाठीचार्ज केला. यानंतर, आंदोलक विद्यार्थ्यांनीही पोलिसांवर चपला आणि बूट फेकायला सुरु वात केली. या घटनेनंतर आंदोलनस्थळी तणाव वाढला आहे. पोलीस जमावाला पांगवण्याचा प्रयत्न करत आहेत. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी सुरक्षा व्यवस्था कडक केली आहे.

या कारवाईसंदर्भात बोलताना रॉंचीचे पोलीस प्रमुख पारस राणा म्हणाले, 'पोलिसांनी वारंवार समज देउनही आंदोलक ऐकण्यास तयार नव्हते. ते बैरिकेड्स तोडून पुढे जाण्याचा प्रयत्न करत होते. यामुळे कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना लाठीचार्ज करावा लागला.' तसेच, 'पोलीस विद्यार्थ्यांच्या विरोधात नसून प्रशासन त्यांच्या मागण्यांबाबत संवेदनशील आहे,' असेही त्यांनी सांगितले. ➪(पान २ वर)

## केंद्राच्या वंदे मातरम भूमिकेला मुख्यमंत्री विजय यांचा विरोध

**चेन्नई :** तामिळनाडू विधानसभेत एकमताने एक ठराव मंजूर करण्यात आला असून त्यानुसार शासकीय कार्यक्रमांच्या सुरु वातीला सर्वप्रथम तमिळ थाई वाझथु हे राज्यगीत गाणे बंधनकारक करण्यात आलं आहे.



या निर्णयाकडे, कार्यक्रमांच्या सुरु वातीला वंदे मातरम हे राष्ट्रीय गीत सर्वप्रथम वाजवण्याच्या केंद्र सरकारच्या निर्देशाना मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांनी दिलेले आव्हान म्हणून पाहिले जात आहे.हा ठराव मांडताना मुख्यमंत्री विजय म्हणाले की, राज्यामध्ये तमिळ गीतालाच सर्वोच्च प्राधान्य मिळालं पाहिजे. द्रमुक आणि अद्रमुक या दोन्ही पक्षांनी या ठरावाला पाठिंबा दिला. विधानसभा अध्यक्ष जे.सी.डी. प्रभाकर यांनी हा ठराव मंजूर झाल्याची घोषणा केली आणि याच्या अंमलबजावणीसाठी आता इतर कोणत्याही परवानगीची आवश्यकता नसल्याचं सांगितलं. आज विधानसभेतील एका ➪(पान २ वर)

## कोलंबिया भूकंप, इमारती कोसळल्या, रस्त्यांवर हाहाकार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दक्षिण अमेरिकेतील कोलंबिया हा देश आज भूकंपाच्या तीव्र धक्क्यांनी हादरला. यूएसजीएसने या भूकंपाची तीव्रता ७.४ एवढी नोंदवली आहे. स्थानिक वेळेनुसार सकाळी ७ वाजून ३४ मिनिटांच्या सुमारास हा भूकंप झाला. या भूकंपाचं केंद्र जमिनीपासून सुमारे १०७ किमी खोलीवर होतं.कोलंबियामधील केली



या शहरात आलेल्या या भूकंपामध्ये सुमारे २० इमारती कोसळल्या असून, अनेक लोक या कोसळलेल्या इमारतींच्या ढिगा-यांमध्ये अनेक लोक अडकले आहेत, अशी माहिती महापौर अलेक्झँड्रो एडेर यांनी दिली. मदत आणि बचाव कार्यासाठी बोगोटा आणि मेडेलिन येथून पथके बोलावली आहेत. तसेच राज्याची राजधानी असलेल्या बोगोटापर्यंत लोकांना सुरक्षित ठिकाणी ➪(पान २ वर)

## 'त्या' 6 खासदारांच्या विलिनिकरणाबाबत आता दोन आठवड्यांनी सुनावणी

**मुंबई/प्रतिनिधी :** जून महिन्यात घडलेल्या नाट्यमय घडामोडींनंतर उद्धवसेनेतील सहा खासदारांचा एक गट फुटून शिंदेसेनेत विलीन झाला होता. तसेच या सहा खासदारांच्या विलिनीकरणाला लोकसभा अध्यक्षांनीही मान्यता दिली होती. मात्र या निर्णयाविरोधात उद्धवसेनेने सर्वोच्च न्यायालयात धाव घेत दाद मागितली होती. उद्धवसेनेच्या या



याचिकेवर आज सर्वोच्च न्यायलयात महत्त्वपूर्ण सुनावणी झाली. जून महिन्यात घडलेल्या नाट्यमय घडामोडींनंतर उद्धवसेनेतील सहा खासदारांचा एक गट फुटून शिंदेसेनेत विलीन झाला होता. तसेच या सहा खासदारांच्या विलिनीकरणाला लोकसभा अध्यक्षांनीही मान्यता दिली होती. मात्र या ➪(पान २ वर)

# शहा जंतर-मंतर लाठीचार्ज प्रकरणावर संसदेत उत्तर देणार

## रिजिजू म्हणाले- गृहमंत्र्यांच्या भाषणात गोंधळ करू नका

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** गृहमंत्री अमित शहा दिल्लीतील विद्यार्थी आंदोलकांवरील पोलीस कारवाईच्या प्रकरणावर सभागृहात उत्तर देतील. संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी सोमवारी ही



माहिती दिली. त्यांनी गृहमंत्र्यांच्या भाषणादरम्यान विरोधकांना गोंधळ न घालण्याचे आवाहन केले. मात्र, शहा कधी बोलतील, याची माहिती सरकारने दिली नाही. दिल्लीत २० जुलै रोजी संसद मार्चदरम्यान पोलिसांनी विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज केला होता. त्याच दिवशी संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचा पहिला दिवसही होता. १३ ऑगस्ट रोजी अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. म्हणजे, सध्याच्या अधिवेशनाचे फक्त ४ दिवस शिल्लक आहेत. तीन आठवड्यांपासून विरोधक दिल्ली पोलिसांच्या कारवाईबाबत गृहमंत्र्यांनी सभागृहात निवेदन देण्याची मागणी करत होते. विरोधी खासदारांनी या मुद्द्यावरून सोमवारीही संसदेत निदर्शने केली. काँग्रेस खासदार प्रियंका गांधी वाड्रा म्हणाल्या की, जोपर्यंत गृहमंत्री अमित शहा संसदेत निवेदन देत नाहीत, तोपर्यंत सभागृहात गोंधळ सुरूच राहील. काँग्रेसने आपल्या सर्व खासदारांना १०, ११ आणि १२ ऑगस्ट रोजी सभागृहात उपस्थित राहण्यासाठी व्हिप जारी केला आहे.

**महिला आरक्षण-परिसीमन विधेयकावर**




*संसदेत निदर्शनादरम्यान प्रियंका गांधींनी हातात एक पोस्टर घेतले होते, ज्यावर अमित शाह यांच्या लोकसभेतील गैरहजेरीच्या तारखा नमूद होत्या.*

**सस्पेन्स-** गेल्या ३ आठवड्यांपासून दोन्ही सभागृहांमध्ये सतत गोंधळ आणि कामकाज थांबले आहे. यामुळे महिला आरक्षण, परिसीमन आणि FCRA सुधारणा विधेयकावरील सरकारच्या ➪(पान २ वर)

### खासदारांना 12 तारखेपर्यंत व्हीप जारी

काँग्रेसने लोकसभा आणि राज्यसभेतील आपल्या खासदारांना व्हिप जारी करून १०, ११ आणि १२ ऑगस्ट रोजी संबंधित सभागृहांत उपस्थित राहण्यास सांगितले आहे. तसेच, इंडिया आघाडीतील सर्व सहयोगी पक्षांना देखील या तिन्ही दिवशी त्यांच्या खासदारांची उपस्थिती आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे.

### संसदेतील कोंडी कायम राहील-खा.गांधी

काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी सोमवारी स्पष्टे केली की विद्यार्थ्यांवरील पोलिसी अतिरेकांबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे सभागृहात येउन निवेदन देत नाही तोपर्यंत संसदेतला कोंडी कायम राहील. संसदेत विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. दिल्लीतील जंतरमंतर येथील जेन झी आंदोलनावेळी विद्यार्थ्यांवर झालेल्या कारवाई विरोधात विरोधी पक्षांच्या खासदारांनी आवाज उठवला आहे.




## उर्वरित रक्कम मिळाली नाही म्हणून खरेदीखत अवैध ठरत नाही

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** एखाद्या मालमत्तेच्-या विक्रीसाठी खरेदीखत नोंदवले जाते, तेव्हा विक्रीच्या किमतीचा काही भागच दिला गेला असला तरीही, त्-याचे मालकी हक्क खरेदीदाराकडे जातात. विक्रीच्या किमतीचा उर्वरित भाग न मिळाल्याने खरेदीखत अवैध ठरत नाही; अशा वेळी उर्वरित रक्कम वसूल करणे हाच उपाय असतो, केवळ उर्वरित रक्कम मिळाली नाही म्हणून खरेदीखत रद्द करणे हा उपाय नाही असे निरीक्षण नुकतेच सर्वोच्-च न्-यायालयाचे न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने नोंदवले. दोन मालमत्ता खरेदीसाठी प्रत्-येकी ७,००० रुपये




इतकी रक्कम निश्चित करण्यात आली होती. नोंदणीवेळी २,५०० रुपये देण्-यात आले होते. ४,५०५ रुपये ही रक्कम मूळ मालकाची वित्तीय संस्था आणि सरकारी विभागांतील थकबाकी भरण्यासाठी राखून ठेवण्यात आली होती. यावरुन मूळ मालकाने खरेदीखत रद्दबातल घोषित करण्यासाठी व मालकी हक्क मिळवण्यासाठी दावा दाखल केला होता. उच्च न्यायालयाचा तो निकाल रद्द करत सर्वोच्च न्यायालयाने दिवाणी न्यायालयाचा निर्णय बहाल केला. खंडपीठाने स्पष्ट केले की, अंशतः मोबदला मिळाल्याची पूर्ण कल्पना असताना झालेले खरेदीखत, केवळ उर्वरित रक्कम न मिळाल्याच्या ➪(पान २ वर)










जाहिरात संकलन - सुभाष कोटेचा, चांदूर रेल्वे

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# जिल्हा मध्यवर्ती बँकेत प्रवीण तायडे यांचा 'मास्टरस्ट्रोक'

## ११३२ नव्या मतदारांना न्याय, सहकार राजकारणात नवी खळबळ



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या राजकारणात अचलपूर मतदारसंघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी मोठा राजकीय मास्टरस्ट्रोक खेळल्याची चर्चा सध्या जिल्हाभर रंगली आहे. सर्वसामान्य शेतकरी व भागधारकांना मतदानाचा हक्क मिळावा यासाठी त्यांनी थेट मंत्रालयापर्यंत सातत्याने पाठपुरावा केला होता. त्या पाठपुराव्याला अखेर यश मिळाले असून जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या मतदार यादीत तब्बल ११३२ नव्या मतदारांची वाढ झाली आहे.

सहकार क्षेत्रात अनेक वर्षांपासून मोजक्या लोकांच्या नियंत्रणाखाली राजकारण होत असल्याची टीका होत होती. आपल्या जवळच्या संचालकांचे नातेवाईक सभासद करून घेतले जात होते; मात्र स्वतःहून भागधारक होऊ इच्छिणाऱ्या अनेक शेतकऱ्यांना डावलण्यात आले, असा आरोप सर्वसामान्य भागधारकांकडून करण्यात येत होता. याच मुद्द्यावर आमदार प्रवीण तायडे यांनी आक्रमक भूमिका घेत नवीन मतदारांना न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घेतला. त्यांच्या प्रयत्नांमुळे ११३२ नव्या मतदारांचा मार्ग मोकळा झाला असून, याला सहकार क्षेत्रातील मोठा लोकशाही निर्णय मानले जात आहे.

विशेष म्हणजे, जिल्ह्यात आमदार बच्चू कडू, आमदार संजय खोडके, आमदार प्रताप अडसड आणि आमदार राजेश वानखडे हे एकत्र असल्याचे राजकीय चित्र असताना, आमदार प्रवीण तायडे यांनी स्वतंत्र भूमिका घेत आपली वेगळी ओळख निर्माण केल्याची चर्चा सुरू आहे. 'प्रवीण तायडे यांनी पुन्हा एकदा आपण जॉइंट किलर असल्याचे दाखवून दिले,' अशा प्रतिक्रिया त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त होत आहेत.

सर्वसामान्य भागधारकांना न्याय मिळवून देत नवीन मतदारांसाठी देवदूतासारखे पुढे येण्याचे काम प्रवीण तायडे यांनी केले, असेही अनेक शेतकरी व सहकार कार्यकर्ते सांगत आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील सहकार राजकारणात नवीन समीकरणे तयार होत असल्याचे चित्र आहे.

दरम्यान, या घडामोडीनंतर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या आगामी राजकारणात बच्चू कडू विरुद्ध प्रवीण तायडे असा सामना पुन्हा पाहायला मिळणार का? याबाबत राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही ११३२ मतांची वाढ केवळ आकडा नसून, जिल्ह्याच्या सहकार राजकारणात मोठा टर्निंग पॉइंट ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पान १ व १० वरून

## रांचीमध्ये आंदोलक विद्यार्थ्यांवर

**विद्यार्थ्यांचा पोलिसांवर अमानुष कारवाईचा आरोप...** -दुस-या बाजूला आंदोलक विद्यार्थ्यांनी पोलिसांवर अमानुष कारवाईचा आरोप केला आहे. नियमानुसार लाठीचा वापर कमरेच्या खाली करायचा असतो. पण, पोलिसांनी विद्यार्थ्यांचे डोके, हात आणि चेह-यावर लाठ्या मारल्याचा दावा विद्यार्थ्यांनी केला आहे. या कारवाईमुळे विद्यार्थ्यांमध्ये राज्य सरकार आणि पोलिसांविरुद्ध तीव्र संताप व्यक्त करत आहेत. यादरम्यान पोलीस आणि विद्यार्थ्यांमध्ये अनेकदा चकमकी झाल्या. पोलिसांना दोन-तीन वेळा लाठीचार्ज करावा लागला, ज्यामुळे काही विद्यार्थ्यांच्या डोक्याला दुखापत झाली. याला प्रत्युत्तर म्हणून आंदोलकांनी पाण्याच्या बाटल्या आणि चपला भिरकावल्या.सकाळी १० वाजता हजारो विद्यार्थी जुन्या विधानसभा इमारतीजवळ जमले आणि त्यांनी विधानसभेला घेराव घालण्यासाठी कूच केले. त्यांना रोखण्यासाठी पोलिसांनी काटेरी तारांचे बॅरिकेड्स लावले होते; तिथे सुरक्षेची सहा-स्तरीय व्यवस्था करण्यात आली असून सीसीटीव्ही कॅमे-यांद्वारे परिसरावर लक्ष ठेवले जात आहे.पोलिसांनी 'वॉटर कॅनन'चा (पाण्याच्या फवा-यांचा) वापर केला असता, काही विद्यार्थी बॅरिकेड्सवर चढून नाचताना दिसले, तर काहींनी राष्ट्रगीत गायले. त्यानंतर पोलिसांनी अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या.दरम्यान, सीआयडीने (CID) JPSC चे माजी अध्यक्ष एल. खियांगते यांना अटक केली आहे. २१ जुलै रोजी ख्च्च्क कार्यालयावर धाड पडल्यानंतर त्यांनी राजीनामा दिला होता आणि सीआयडी त्यांची सतत चौकशी करत होती. भाजप नेत्यांनी विद्यार्थ्यांसह मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाला घेराव घातला होता. या आंदोलनादरम्यान, पोलिसांनी आंदोलन करणा-या भाजप नेत्यांना ताब्यात घेउन दिवसभर रांचीच्या खेळगाव कॅम्प जेलमध्ये ठेवले होते. सायंकाळी त्यांची सुटका करण्यात आली.

## 'त्या' 6 खासदारांच्या

निर्णयाविरोधात उद्धवसेनेने सर्वोच्च न्यायालयात धाव घेत दाद मागितली होती. उद्धवसेनेच्या या याचिकेवर आज सर्वोच्च न्यायलयात महत्त्वपूर्ण सुनावणी झाली. दरम्यान, आजच्या सुनावणीवेळी लोकसभा अध्यक्ष आणि इतर खासदारांनी आपली बाजू मांडण्यासाठी आणखी वेळ वाढवून मागितल्याने आता ही सुनावणी दोन आठवड्यांनी पुढे ढकलण्यात आली आहे. उद्धवसेनेच्या सहा खासदारांचं शिंदेसेनेतील विलिनीकरण रद्द करण्यात यावं या मागणीसाठी उद्धवसेनेचे खासदार अरविंद सावंत यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर आज न्यायमूर्ती पी. एस. नरसिम्हा आणि न्यायमूर्ती आलोक अराधे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. या सुनावणीवेळी लोकसभा अध्यक्ष आणि काही खासदारांनी आपली बाजू मांडण्यासाठी वेळ वाढवून मागितली. या प्रकरणी झालेल्या आधीच्या सुनावणी वेळी सर्वोच्च न्यायालयाने लोकसभा अध्यक्ष आणि संबंधित सहा खासदारांना आपली बाजू मांडण्यासाठी नोटिस बजावली होती. मात्र लोकसभा अध्यक्षांनी आपलं म्हणणं अद्याप सर्वोच्च न्यायालयासमोर मांडलेलं नाही. दरम्यान, लोकसभा अध्यक्ष आणि काही खासदारांनी वेळ वाढवून मागितल्यानंतर न्यायमूर्तींनी या प्रकरणाची सुनावणी दोन आठवडे पुढे ढकलली आहे.

## शहा जंतर-मंतर लाठीचार्ज

रणनीतीबाबत सस्पेन्स कायम आहे. लोकसभेच्या सोमवारच्या अजेंड्यात यापैकी कोणतेही विधेयक समाविष्ट केलेले नाही. महिला आरक्षण आणि परिसीमनाशी संबंधित संविधान सुधारणा विधेयक एप्रिलमध्ये लोकसभेत दोन-तृतीयांश बहुमत न मिळाल्याने मंजूर होउ शकले नव्हते. यात २०२९ पासून महिलांना ३३ऽ आरक्षण आणि लोकसभा जागांच्या पुनर्रचनेद्वारे सभागृहाचा आकार वाढवण्याचा प्रस्ताव होता. FCRA सुधारणा विधेयक मार्चमध्ये लोकसभेत सादर झाले होते, परंतु त्यावर अजून चर्चा होउन ते मंजूर होणे बाकी आहे. यात परदेशी निधी घेणा-या संस्थांवर कडक नजर ठेवण्यासाठी आणि परवाना गमावलेल्या गैर-लाभकारी संस्थांच्या मालमत्तांच्या व्यवस्थापनासाठी नवीन प्राधिकरण स्थापन करण्याचा प्रस्ताव आहे. याला राजकीय पक्ष आणि ख्रिश्चन संघटनांनी विरोध केला आहे.

**संसदेत कर आकारणी विधेयक मंजूर,** अर्थमंत्री म्हणाल्या- यूपीआय व्यवहार विनामूल्य राहतील.संसदेने सोमवारी कर आकारणी आणि इतर कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६ ला मंजुरी दिली. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी स्पष्ट केले की, या कायद्यानुसार यूपीआयवर कोणताही कर किंवा व्यवहार शुल्क आकारले जाणार नाही. गेल्या आठवड्यात लोकसभेने मंजूर केलेले हे विधेयक, राज्यसभेत संक्षिप्त चर्चा आणि अर्थमंत्र्यांच्या उत्तरानंतर आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले.

अखिलेश यादव म्हणाले- विद्यार्थी आंदोलनासोबतच शहा यांनी देणग्यांच्या चोरीवरही निवेदन द्यावे.अखिलेश यादव म्हणाले की, विरोधी पक्ष पहिल्या दिवसापासून गृहमंत्री शहा यांनी विद्यार्थी मुद्द्यावर सभागृहात निवेदन द्यावे अशी मागणी करत आहेत, परंतु सरकार तसे करण्यास तयार नाही. दोन दिवस शिल्लक आहेत. अयोध्या राम मंदिरासाठीच्या देणग्यांमधील कथित अनियमितता आणि विद्यार्थी आंदोलन या दोन्ही मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी सरकारकडे वेळ आहे. प्रभू रामाला अर्पण केलेल्या देणग्यांची चोरी ही सामान्य घटना नाही. हा लाखो लोकांच्या श्रद्धेचा प्रश्न आहे. यासाठी उत्तर कोण देणार, असा प्रश्न त्यांनी विचारला.

प्रमुख विमानतळ चालकांना विमान कंपन्यांमध्ये भागभांडवल ठेवण्यावर कोणताही सरकारी निर्बंध नाही, असे केंद्र सरकारने सोमवारी स्पष्ट केले. केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी राज्यसभेत ही माहिती दिली.मंत्री मुरलीधर यांनी सांगितले की, काही सार्वजनिक-खाजगी भागीदारी विमानतळांसाठी असलेल्या विद्यमान करारानुसार विमान कंपन्या आणि त्यांच्या समूह कंपन्यांना विमानतळ चालकांमध्ये भागभांडवल ठेवण्यास मनाई असली तरी, एएआय कडे या निर्बंधांमधून सूट मिळवण्यासाठी विनंत्या प्राप्त झाल्या आहेत, परंतु नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाने अद्याप या प्रकरणाची चौकशी केलेली नाही.जीएमआर आणि अदानी समूह विमान वाहतूक व्यवसायात प्रवेश करत असल्याच्या बातम्या प्रसारमाध्यमांनी दिल्या होत्या. तथापि, अदानी समूहाने या बातम्या निराधार असल्याचे सांगत, विमान वाहतूक व्यवसायात प्रवेश करण्याच्या कोणत्याही प्रस्तावावर विचार करत नसल्याचे स्पष्ट केले.

## उर्वरित रक्कम मिळाली नाही

कारणास्तव रद्दबातल ठरत नाही. वादींना उर्वरित रक्कम व्याजासह वसूल करण्याचा अधिकार आहे. प्रतिवादींनी इच्छित असल्यास उर्वरित रक्कम व्याजासह देउन मालमत्तेचा ताबा मागणे आवश्यक आहे, असे स्पष्ट करत ताबा कायम ठेवण्याच्या कनिष्ठ न्यायालयांच्या निर्णयामध्ये सर्वोच्च न्यायालयाने कोणताही हस्तक्षेप करण्यास नकार दिला.

**उच्च न्यायालयाने घेतला होता खरेदीखतावर आक्षेप-**दिवाणी न्यायालय आणि प्रथम अपील न्यायालयाने विक्री करणा-याचा मालकाचा दावा फेटाळला होता. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने द्वितीय अपील अर्जात कनिष्ठ न्यायालयांचे निष्कर्ष बाजूला ठेवून खरेदीखतावर आक्षेप घेतला होता. या निकालास सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण-यात आले होते.

**खरेदीखताची नोंदणीवेळीच मालमत्तेची मालकी हस-तांतरित होते-** सर्वोच्च न्यायालयाचे न्यामूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यामूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की जेव्हा खरेदीखताची नोंदणी होते, तेव्हा अंशतः मोबदला दिला असला तरीही मालमत्तेची मालकी हस्तांतरित होते. उर्वरित रक्कम न मिळाल्याने खरेदीखत बेकायदेशीर किंवा अमान्य ठरत नाही. अशा प्रकरणात उर्वरित रकमेच्या वसुलीसाठी दावा करता येतो, मात्र खरेदीखत रद्द करण्याची मागणी करता येत नाही.

## केंद्राच्या वंदे मातरम भूमिकेला

भावनिक भाषणात विजय यांनी स्पष्ट केले की, त्यांचे सरकार राज्याच्या भाषिक आणि सांस्कृतिक हक्कांच्या बाबतीत कोणतीही तडजोड करणार नाही. तमिळ ही केवळ एक भाषा नसून ती आमची जीवनवाहिनी आणि भावना आहे असे सांगत त्यांनी मातृभाषा ही मातृत्वाइतकीच पवित्र असल्याचे अधोरेखित केले. ते पुढे म्हणाले तमिळ म्हणजे अभिमान, तमिळ म्हणजे ताकद. तुम्ही तमिळ शब्द उच्चारताच संपूर्ण तमिळनाडू एकत्र येतो आणि एकसंध उभा राहतो. तमिळनाडूमध्ये तमिळ थाई वाझथु लाच पहिले स्थान मिळाले पाहिजे. तमिळ थाई वाझथु ला पहिले स्थान देणे हा आमचा अधिकार आहे. या ठरावानुसार तमिळनाडूतील शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, शासकीय कार्यालये आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या कार्यक्रमांच्या सुरु वातीला हे राज्यगीत सर्वप्रथम गाणे अनिवार्य आहे.

## कोलंबिया भूकंप, इमारती

हलवण्यात आलं आहे. या भूकंपात काही लोक जखमी झाले आहेत, अशी माहितीही राज्यपालांनी दिली आहे. दरम्यान, या भूकंपाचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. त्यामध्ये हा भूकंप किती भयानक होता, हे चित्रित झाले आहे. यापैकी एका व्हिडीओमध्ये एक इमारत ही दोन भागात दुभंगलेली दिसत आहे. त्याशिवाय समोर आलेल्या वेगवेगळ्या व्हिडीओंमध्ये लोक भीतीमुळे रस्त्यांवरून पळताना दिसत आहेत.

## अमरावती शहरात हलक्या व

लक्षात घेता सर्वसामान्य नागरिक व विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे प्रसिद्धी पत्रात सांगण्यात आले आहे.

दररोज सकाळी ६.३० ते रात्री २१.३० वाजेपर्यंत वाहनांना शहरात प्रतिबंध असणार असून या वाहनांमध्ये मालविरहित (खाली गाडी) वजन २,००० किग्रॅ (२ टन) पेक्षा जास्त असणारी सर्व हलकी व जड व्यावसायिक वाहने. ज्या वाहनांची भारसहित वहन क्षमता २ टनांपेक्षा जास्त आहे अशी सर्व वाहने. सर्व प्रकारची अति अवजड (मल्टी-ॲक्सल) वाहने.

यावेळेत शहरातील जे मार्ग बंद राहतील यामध्ये मुख्य चौक व बायपास मार्ग : गौरी इन वा पॉइंट, वेलकम टी पॉइंट, पंचवटी, इर्विन चौक, जयस्तंभ चौक, राजकमल चौक, गद्रे चौक, नवाथे चौक, बेनाम चौक, अलमास गेट, बडनेरा ते यवतमाळ वाय पॉइंट यांचा समावेश असेल. तसेच नाका व अंतर्गत मार्गांमध्ये राजुरा नाका, विद्यापीठ चौक, बियाणी चौक, जिल्हाधिकारी कार्यालय, इर्विन चौक, दीपक चौक, चित्रा चौक, टांगा पढाव, नागपुरी गेट चौक ते ट्रान्सपोर्ट नगर व भातकुली जकात नाक्यापर्यंत या मार्गांचा समावेश आहे.इतर महत्त्वाच्या मार्गांमध्ये आर.टी.ओ. कार्यालय, शेगाव नाका, कठोरा नाका, पोटे पाटील चौक, रहाटगाव बस स्टॉप, विभागीय आयुक्त कार्यालय मार्ग तसेच एम.आय.डी.सी. परिसराचा समावेश आहे. गौण खनिज वाहतूकीसंदर्भात काही सूचना देण्यात आल्या असून यानुसार दररोज सकाळी ९.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत विशिष्ट निर्धारित मार्गांवरून वाहतुकीस सूट देण्यात आली आहे.

या अधिसूचनेबाबत नागरिकांना किंवा वाहनधारकांना काही आक्षेप अथवा सूचना असल्यास त्यांनी अधिसूचना जारी झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपले आक्षेप लेखी स्वरूपात पोलीस प्रशासनाकडे सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर मोटर वाहन कायदा १९८८ व महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ नुसार कठोर कारवाई केली जाईल असेही सांगण्यात आले आहे.

## मेळघाट ब्लड बँकेसमोर चिमुकलीचा

जाऊन पाहिले असता तेथे एक ते सव्वा महिन्याचे लहान बाळ चादरीवर ठेवलेल्या अवस्थेत आढळून आले. बाळाच्या अंगावर डायपर लावलेला होता. मात्र, मृतदेहाची अवस्था अत्यंत विदारक आणि हृदयद्रावक होती. परिसरात भटकणाऱ्या कुत्र्यांनी या चिमुकल्याच्या मृतदेहाचे काही भाग कुरतडून खाल्ल्याचे दिसून आले. हे दृश्य पाहून उपस्थितांचा थरकाप उडाला.

घटनेची माहिती मिळताच परतवाडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार अजय आखरे यांच्या नेतृत्वाखाली पोलिस स्टेशनचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला आहे.

## स्वतच्या घरावरच फायरिंगचा

वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. घरावर बुरखा परिधान केलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी फायरिंग केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले. याप्रकरणी गाडगेनगर पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ८६९/२०२६ अन्वये कलम १०९(१), ३(५) बीएनएस तसेच कलम ३/२५ आर्म्स ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

गोळीबाराची घटना संवेदनशील असल्याने पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी गुन्हे शाखेची सहा पथके तयार करून आरोपींचा तातडीने शोध घेण्याचे निर्देश दिले. त्यानुसार गुन्हे शाखा युनिट-१चे प्रभारी पोलिस निरीक्षक दिनेश दहातोंडे आणि युनिट-२चे प्रभारी पोलिस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वाखाली तपासाला वेग देण्यात आला.

पोलिसांनी शहरातील १०० पेक्षा अधिक ठिकाणांवरील सीसीटीव्ही फुटेजचे विश्लेषण केले. त्यासोबतच तांत्रिक तपास आणि गुप्त माहितीच्या आधारे संशयितांची माहिती मिळविण्यात आली. त्यातून बादशहासिंग अजाबसिंग टांक आणि अजय नुरजेम भोसले यांचा गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी दोघांना नागपूर महामार्ग आणि वडाळी परिसरातून ताब्यात घेतले. पोलिसांनी केलेल्या चौकशीत आरोपींनी गोळीबार केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. तपासात, विपुल ठाकरे यांनी आपल्या घरावर देशी कट्ट्याच्या सहाय्याने फायरिंग करून प्राणघातक हल्ला घडवून आणण्यासाठी एकूण १ लाख ५० हजार रुपये देण्याचे ठरविले होते, अशी माहिती समोर आली आहे. या रकमेपैकी १० हजार रुपये चंद्रसिंग ऊर्फ शेरूसिंग जोधसिंग शाकला याच्या माध्यमातून बादशहासिंग टांक, अजय भोसले आणि राजासिंग टांक यांना देण्यात आल्याचा पोलिसांचा दावा आहे. त्यानंतर आरोपींनी अर्जुन नगर येथील ठाकरे यांच्या घरावर गोळीबार केल्याचे तपासात निष्पन्न झाले.

स्वतःच्याच घरावर गोळीबार करून घेण्यामागे नेमका काय उद्देश होता, हा तपासातील महत्त्वाचा मुद्दा असून पोलिसांकडून त्याचा शोध घेतला जात आहे. या कटाबाबत अधिक माहिती विपुल ठाकरे यांच्याकडून मिळण्याची शक्यता असून तो सध्या फरार असल्याने पोलिस त्याचा शोध घेत आहे.

या प्रकरणात अटक करण्यात आलेल्यांमध्ये बादशहासिंग अजाबसिंग टांक (४२, रा. सिकलकरीपुरा, वडाळी), अजय नुरजेम भोसले (३१, रा. राजुरा), राजासिंग अजाबसिंग टांक (३२, रा. सिकलकरीपुरा, वडाळी) आणि चंद्रसिंग ऊर्फ शेरूसिंग जोधसिंग शाकला (३०, रा. फलोदी, राजस्थान; सध्या अर्जुन नगर) यांचा समावेश आहे. तर विपुल भानुदास ठाकरे हा फरार आहे.

ही कारवाई पोलिस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपायुक्त यशवंत सोळंके, श्याम घुगे आणि प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. गुन्हे शाखा युनिट-१चे प्रभारी पोनि. दिनेश दहातोंडे व युनिट-२चे प्रभारी पोनि. अतुल वर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने तसेच सायबर पोलिसांच्या मदतीने ही कारवाई केली.

## ४ कोटी रुपयांचे २ किलो ८५०

हजार रुपयांची रोख रक्कम घेतल्याचेही तपासात पुढे आले आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणात प्रत्यक्षात किती रुपयांचा अपहार झाला, याचा हिशेब पोलिसांकडून तपासला जात आहे.

दरम्यान, आरोपींच्या चौकशीतून मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी शहरातील दोन सराफ व्यावसायिकांकडे तपास केला. तेथून ९० ग्रॅम सोने जप्त करण्यात आले असून, संबंधित सोन्याच्या अधिकृत पावत्याही पोलिसांनी ताब्यात घेतल्या आहेत. या सोन्याचा व्यवहार आणि आरोपींशी असलेला संबंध याबाबत पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. तपासादरम्यान पोलिसांनी आरोपींकडून विविध बँकांचे ३० एटीएम कार्ड, ४४८ अनधिकृत पावत्या आणि दोन कार जप्त केल्या आहेत. कथित अपहाराच्या व्यवहारात या साहित्याचा वापर करण्यात आल्याचा संशय पोलिसांना आहे. मुख्य संशयित शुभम वासेवाय याची विविध बँकांमध्ये सहा खाती असल्याचेही तपासात निष्पन्न झाले आहे. या खात्यांमधील आर्थिक व्यवहारांची माहिती पोलिसांकडून तपासली जात आहे.

## बार्शी टाकळीच्या तरुणाचा

दाखल करण्यात आले. मात्र, प्रकृती गंभीर असल्याने डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी अमरावती येथे हलविण्याचा सल्ला दिला. अमरावती येथे उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. मित्रांसोबत काही आनंदाचे क्षण घालवण्यासाठी सुरू झालेला हा प्रवास संतोष यांच्या आयुष्यातील अखेरचा प्रवास ठरला. काही क्षणांपूर्वी मित्रांसोबत हसत-खेळत असलेले संतोष अचानक दरीत कोसळल्याने सोबतच्या मित्रांनाही मोठा धक्का बसला. निसर्गाचे सौंदर्य टिपताना सेल्फीचा एक क्षण त्यांच्या जीवनाचा अखेरचा क्षण ठरल्याने या घटनेने सर्वांनाच सुन्न केले आहे.

संतोष लाडके हे धाबा येथील चौकात कटलरी व जनरल स्टोअर्सचे दुकान चालवत होते. किरकोळ विक्रीच्या व्यवसायातून ते आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. मनमिळाऊ स्वभावामुळे त्यांचा मित्रपरिवार मोठा होता. कुटुंबाचा आधार असलेल्या संतोष यांच्या अचानक जाण्याने आई- वडिलांसह संपूर्ण कुटुंबाला मोठा धक्का बसला असून, मित्रपरिवारावरही शोककळा पसरली आहे.

## विधी सेवा ञाधिकरणाकडून वकिलांसाठी

ठाणे सी. एन. ऑडरे यांच्या मार्फत प्रशिक्षणार्थी वकिलांना मध्यस्थीचे ४० तासांचे सखोल प्रशिक्षण देण्यात येत आहे. प्रशिक्षणामध्ये प्रत्यक्ष उदाहरणे, चर्चासत्रे, प्रश्नोत्तर सत्र, तसेच ध्यान, प्रत्यक्ष मध्यस्थी सत्र अनुकरणाचा समावेश करण्यात आला आहे. या प्रशिक्षणात वकिलांना मध्यस्थी प्रक्रियेबाबत सैद्धांतिक तसेच व्यावहारिक प्रशिक्षण देण्यात येत आहे. मध्यस्थीची संकल्पना व महत्त्व, मध्यस्थाची भूमिका व जबाबदाऱ्या, पक्षकारांशी प्रभावी संवाद, वाटाघाटीची कौशल्ये, विवाद निराकरणाच्या विविध पद्धती, मध्यस्थीची प्रक्रिया तसेच मध्यस्थीतील व्यावहारिक बाबी याबाबत प्रशिक्षण देण्यात येत आहे.

तत्पूर्वी, ७ ऑगस्ट रोजी या प्रशिक्षणाच्या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्ष न्या. उज्वला एम. नंदेश्वर होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव संजय सहारे यांनी केले. जिल्हा न्यायाधीश- १ ए. जी. जोशी, अमरावती, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, के. आर. राजपुत, अमरावती जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष प्रशांत देशमुख आदी उपस्थिती होते.

## जिल्ह्यातील मतदार गणना अर्जांचे

पुनरिक्षण कार्यक्रमास मुदतवाढ देण्यात आली आहे.यानुसार १७ ऑक्टोबर २०२६ पर्यंत मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत गृहभेटी देण्यात येणार आहे. मतदान केंद्रांच्या पुनर्रचनेला येत्या १७ ऑक्टोबर पर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे. २४ ऑक्टोबर रोजी मतदार याद्यांची प्रारुप प्रसिद्धी करण्यात येणार आहे. यानंतर २३ सप्टेंबर पर्यंत दावे व हरकती दाखल करता येणार आहे. २२ नोव्हेंबर पर्यंत दावे व हरकती निकाली काढण्यात येणार असून २७ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात येणार आहे अशी माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांनी दिली आहे.

## टीटी नगरातातील फ्लॅटमध्ये

केल्यानंतर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या पथकाने नियोजनबद्ध पद्धतीने फ्लॅटवर धाड टाकली. यावेळी तेथे देहव्यवसाय सुरू असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. कारवाईदरम्यान पोलिसांनी देहव्यवसाय चालविणाऱ्या महिलेविरुद्ध कारवाई करत तिला अटक केली. तसेच घटनास्थळावर आढळून आलेल्या एका पुरुषासह अन्य एका महिलेला ताब्यात घेण्यात आले. पुढील कायदेशीर कारवाईसाठी तिघांनाही राजापेठ पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात

शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५

(मान्य दिनांक ११.०७.२०२६)
(जाहिरात दिनांक १४.०७.२०२६)

संस्थेचे नांव- (270705SC009) EDUCATION SOCIETY BELORA

(Secondary/Higher Secondary) - With Interview

शैक्षणिक स्तर- Secondary/Higher Secondary

समाजशास्त्रज्ञ स्व.डॉ.एम.आर.देशमुख स्मृतिविद्यालय बोरड

EDUCATION SOCIETY BELORA द्वारा संचालित शाळेमध्ये खाली नमूद केलेल्या पदांसाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता [illegible] धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशील

| अ. क्र. | प्रवर्ग | महिला | माजी | [illegible] | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | [illegible] | समांतर आरक्षण व्यतिरिक्त(खुली) पदे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | इ.मा.व. | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | एकुण | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशिल

(मान्य दिनांक २०.०७.२०२६)

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकविण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET/CTET | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Marathi | Under Graduate Teacher Std (1-4/5) | Consolidated Pay UGT (16000) | Aided | All Subject | Marathi | HSC (Std 12th) | Diploma | TET Paper1/ CTET Paper1 | 1 |
| | | | | | | | | Total | | 1 |

सर्वसाधारण सूचना -

१) अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०२५ (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2025mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे असे उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करू शकतील.

अध्यक्ष/सचिव

एज्युकेशन सोसायटी बेलोरा,[illegible]

पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात

शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५

(मान्य दिनांक २०.०७.२०२६)

संस्थेचे नांव- (270712SC011) श्रीराम शिक्षण संस्था नांदसावंगी

ता. नांदगाव खंडे. जि. अमरावती र.नं.एफ ५२

श्रीराम शिक्षण संस्था नांदसावंगी ता. नांदगाव खंडे. जि. अमरावती र.नं.एफ ५२ द्वारा संचालित व व्यवस्थापनाच्या शाळेमध्ये खाली नमुद केलेल्या पदांसाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशिल (मान्य दिनांक २०.०७.२०२६)

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकविण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET/CTET | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Marathi | Under Graduate Std(1-4/5) | Consolidated Pay - UGT (16000) | Aided | All Subject | Marathi | HSC (Std. 12th) | Diploma | TET Paper 2/ CTET Paper 2 | 1 |
| 2 | Marathi | Graduate Teacher Std(6-8) | Consolidated Pay - GT Sci (18000) | Aided | Mathematics Science | Marathi | Graduation | Diploma/ Graduation | TET Paper 2 (Maths-Science)/ CTET Paper 2(Maths-Science) | 1 |
| 3 | Marathi | Graduate Teacher Std(9-10) | Consolidated Pay - GT 9-10 (18000) | Aided | Language (English) | | Graduation | Education | | 1 |
| | टीप -सर्व जागांसाठी महिलांना प्राधान्य. | | | | | | | Total | | 3 |

सर्वसाधारण सूचना - वरील पदांपैकी S.T.-1, S.C.-1, O.B.C-1(महिलांना प्राधान्य)

१) अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०२५ (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2025mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे असे उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करू शकतील. २)पात्र उमेदवारांनी पदभरतीच्या सविस्तर जाहिरातीसाठी पवित्र पोर्टल संकेतस्थळी भेट द्यावी.

अध्यक्ष
श्रीराम शिक्षण संस्था नांदसावंगी ता. नांदगाव खंडे. जि. अमरावती
मो.नं.९९२१९३६५११मो.नं.९०२९९९६०९१

सचिव
श्रीराम शिक्षण संस्था नांदसावंगी ता. नांदगाव खंडे. जि. अमरावती
मो.नं.८६२९६०६२०१

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

▪ मंगळवार, ११ ऑगस्ट २०२६ ▪ मूल्य ३.०० ▪ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## धार्मिक बांधकामांवर कारवाई करताना समान न्यायाची भूमिका घ्या

### एका समाजावरच कारवाई नको सर्व धर्मांच्या बांधकामांचा समान निकषाने आढावा घ्या वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाधिका-यांना निवेदन



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

शहरातील विविध भागांत सार्वजनिक जागांवर उभारण्यात आलेल्या धार्मिक बांधकामांच्या प्रश्नावरून वंचित बहुजन आघाडीने आक्रमक भूमिका घेतली आहे. धार्मिक बांधकामांवर कारवाई करताना कोणत्याही एका समाजाला लक्ष्य न करता सर्व धर्मांच्या बांधकामांबाबत समान निकष लावावेत, अशी मागणी करीत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

शहरातील विविध ले-आऊटमधील सार्वजनिक ओपन स्पेसमध्ये धार्मिक बांधकामे उभारण्यात आली आहेत. तसेच काही वॉर्डमध्ये आणि अयोध्यानगर परिसरातील सार्वजनिक जागांवरही धार्मिक स्वरूपाची बांधकामे झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

एका समाजाच्या धार्मिक बांधकामावर कारवाई आणि अन्य बांधकामांकडे दुर्लक्ष, अशी दुहेरी भूमिका प्रशासनाने घेऊ नये, अशी भूमिका निवेदनातून मांडण्यात आली. सर्व संबंधित धार्मिक बांधकामांची वस्तुस्थिती तपासून कायदा व नियमांनुसार समान पद्धतीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

धार्मिक बांधकामांचा प्रश्न हा सामाजिक सलोखा आणि कायदा-सुव्यवस्थेशी निगडित असल्याने प्रशासनाने संवेदनशीलतेने आणि निष्पक्षपणे कार्यवाही करावी. कोणत्याही समाजावर अन्याय झाल्याची भावना निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असेही निवेदनात म्हटले आहे.

यावेळी तहसीलदार मालेगाव, पोलीस अधीक्षक वाशिम, नगराध्यक्ष, मुख्याधिकारी तसेच मालेगाव पोलीस ठाणे यांच्याकडे निवेदन साद करण्यात आले. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.



## रोजगाराभिमुख कौशल्य प्रशिक्षणातून युवकांना सक्षम करा –जिल्हाधिकारी

### स्थानिक गरजांनुसार प्रशिक्षण अभ्यासक्रम निश्चित होणार



■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील युवक-युवतींना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी स्थानिक गरजा व उद्योग क्षेत्रातील मागणी लक्षात घेऊन कौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रम निश्चित करावेत. प्रशिक्षणातून रोजगारक्षम मनुष्यबळ तयार करण्यावर भर देणे आवश्यक आहे, असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समितीची बैठक जिल्हाधिकारी श्री. कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शहा, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक यशवीर कुमार ,जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी उत्तम शिंदे, मत्स्य विभागाच्या सहाय्यक आयुक्त प्रियंका झोड, जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण संस्थेचे सचिन नकाते आदींची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीत सन २०२६-२७ च्या जिल्हा कौशल्य विकास आराखड्याला मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या प्रारंभी सहायक आयुक्त तथा सदस्य सचिव प्रवीण. खंडारे यांनी उपस्थित सदस्य व विविध क्षेत्रांतील प्रतिनिधींचे स्वागत करून बैठकीचे प्रास्ताविक केले. त्यानंतर कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी वैशाली पवार यांनी समितीसमोरील विषयांचे सादरीकरण केले.

बैठकीत मागील सभेचे इतिवृत्त कायम करणे, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीमार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या शुल्कातील बदल तसेच जिल्हा कौशल्य विकास आराखडा सन २०२६-२७ साठी प्रशिक्षण अभ्यासक्रम (जॉब रोल) निश्चित करणे आदी विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेदरम्यान कृषी, उद्योग, आरोग्य, पर्यटन, बांधकाम आदी क्षेत्रांतील स्थानिक मागणीचा विचार करून रोजगाराभिमुख व स्वयंरोजगाराला चालना देणारे प्रशिक्षण अभ्यासक्रम अंतिम करण्यात आले. या प्रशिक्षणामुळे जिल्ह्यातील युवक-युवतींना कौशल्यवृद्धीबरोबरच रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. अंतिम करण्यात आलेल्या प्रशिक्षण अभ्यासक्रमांचा जिल्हा कौशल्य विकास आराखडा तातडीने तयार करून तांत्रिक मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी श्री. कुंभेजकर यांनी दिले. त्यावर सहायक आयुक्त प्र. वा. खंडारे यांनी आराखडा वेळेत तयार करून तांत्रिक मान्यता मिळविण्यासह प्रशिक्षण कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल, अशी माहिती दिली. बैठकीस विभागांचे अधिकारी, समितीचे सदस्य तसेच विविध क्षेत्रांतील प्रतिनिधी उपस्थित होते. शेवटी मार्गदर्शन अधिकारी वैशाली पवार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## वाशिममध्ये काँग्रेसतर्फे क्रांती दिनी हुतात्म्यांना अभिवादन; स्वातंत्र्यसैनिकांच्या योगदानाला उजाळा



■ प्रतिनिधी | वाशिम ■

देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात महात्मा गांधी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत वाशिमकरांनी 'चले जाव' आंदोलनात सहभाग नोंदविला होता. या स्वातंत्र्यलढ्यात योगदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे तसेच हुतात्मा झालेल्या क्रांतिकारकांना अभिवादन करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. याच भावनेतून ९ ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त वाशिम जिल्हा काँग्रेस कमिटी व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने जुन्या नगर परिषद परिसरातील हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

सकाळी ११ वाजता झालेल्या या कार्यक्रमात स्वातंत्र्यलढ्यातील हुतात्म्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला. स्वातंत्र्यसैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या योगदानाचे स्मरण करून त्यांच्या त्यागाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

यावेळी वाशिम जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजूभाऊ चौधरी, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते किसनराव मस्के, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सागर गोरे, नगर परिषद सदस्य राजूभाऊ वानखेडे, जिल्हा सरचिटणीस उज्वल देशमुख, सुभाष देवहंस, डॉ. शेख तस्लिम, बाळासाहेब रोकडे, मदन जाधव, बाळासाहेब लेंमळे, पिंटू भालेराव पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## अखेर पाठपुराव्याला यश! ५० कुटुंबांच्या नियमाकुलीकरणाचा मार्ग मोकळा

■ प्रतिनिधी | कारंजा ■

धनज बु. येथील रमाबाई आंबेडकर कॉलनीतील गट सर्वे क्रमांक १३५ मधील स्थानिक निवासी अतिक्रमित ५० कुटुंबांच्या नियमाकुलीकरणाचा प्रश्न अखेर मार्गी लागण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. दीर्घकाळापासून सुरू असलेल्या पाठपुराव्याला यश मिळाल्याने रहिवाशांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार तसेच वाशिम जिल्हा प्रशासन आणि तालुका प्रशासनाच्या निर्देशानुसार पंचायत समिती कारंजा (लाड) येथील मा. गटविकास अधिकारी यांच्या आदेशाने ग्रामपंचायत सचिव व सरपंच यांना परिपत्रक काढून नियमाकुलीकरणासाठी आवश्यक अर्ज दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले.

या आदेशानुसार रमाबाई आंबेडकर कॉलनीतील सर्व स्थानिक अतिक्रमित रहिवाशांनी आपल्या कुटुंबाच्या जागेच्या नियमाकुलीकरणासाठी दिनांक ५ ऑगस्ट २०२६ रोजी ग्रामपंचायतीकडे वैयक्तिक अर्ज सादर केले. अनेक वर्षांपासून आपल्या हक्काच्या निवासस्थानाच्या नियमाकुलीकरणाच्या प्रतीक्षेत असलेल्या या ५० कुटुंबांसाठी ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. शासनाच्या आदेशामुळे आता या कुटुंबांना त्यांच्या निवासस्थानाबाबत कायदेशीर हक्क मिळण्याच्या प्रक्रियेला गती मिळण्याची अपेक्षा आहे. या प्रश्नासाठी सातत्याने



करण्यात आलेल्या पाठपुराव्याला अखेर सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याबद्दल महाराष्ट्र शासन, वाशिम जिल्हा प्रशासन, तालुका प्रशासन तसेच पंचायत समिती कारंजा (लाड) यांचे रमाबाई आंबेडकर कॉलनीतील रहिवाशांनी मनःपूर्वक आभार मानले आहेत. दरम्यान, ग्रामपंचायतीकडे दाखल करण्यात आलेले सर्व नियमाकुलीकरणाचे अर्ज विलंब न करता तालुका प्रशासनाकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात यावेत, अशी मागणी कॉलनीतील सर्व स्थानिक रहिवाशांनी ग्रामपंचायत सचिव व सरपंच यांच्याकडे केली आहे.'अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर नियमाकुलीकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. आता प्रशासनाने पुढील कार्यवाहीही तातडीने पूर्ण करून ५० कुटुंबांना दिलासा द्यावा,' अशी अपेक्षा आंबेडकर कॉलनीतील रहिवाशांनी व्यक्त केली.

## देव, धर्म हे अंधश्रद्धेचे मूळ नाही !

### अंनिसच्या प्रशिक्षण शिबीरात दिलीप सोळंके यांचे प्रतिपादन



■ प्रतिनिधी | अकोला ■

मनुष्याच्या अज्ञानातून अंधश्रद्धा निर्माण झाल्या आहेत ,त्यांचे मूळ देव,किंवा धर्मात नाही म्हणून अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा देवा,धर्माला विरोध नाही,त्या नावावर होणाऱ्या शोषणाला आम्ही विरोध करीत प्रबोधन करतो असे प्रतिपादन विचारवंत दिलीप सोळंके यांनी येथे केले.

अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरात रविवारी सोळंके प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.श्री.शिवाजी महाविद्यालयाच्या वसंत सभागृहात झालेल्या या शिबिराच्या मंचावर अंनिसचे राज्य प्रवक्ते पुरुषोत्तम आवारे पाटील, शरद वानखडे, चंद्रकांत झटाले, डॉ. पुरुषोत्तम तायडे, जिल्हाध्यक्ष चंद्रकांत तराळ, जिल्हा संघटक ॲड. अनिल लव्हाळे, ॲड. शेषराव गव्हाळे उपस्थित होते. जे सत्य नाही तरीच ते सत्य आहे असे समजणे यालाच अंधश्रद्धा म्हणतात. आपल्या संत परंपरेने सत्याच्या शोधार्थ काम केले त्याचाच वारसा अंनिस चळवळ चालवत असून आपल्या जीवनात सगळ्याच क्षेत्रात विवेकी व्यक्तीने सत्याच्या शोधार्थ काम करीत राहणे अंनिसला अपेक्षित असल्याचे सोळंके म्हणाले. शेतात पाच हजार रुपये क्विंटल सोयाबीन उगवणाऱ्या शेतकऱ्याची मुलगी जर केवळ गोरे दिसण्यासाठी एक लाख रुपये क्विंटलचे फेअर अँड लवली वापरत असेल तर बापाला आत्महत्याच करावी लागेल, कारण या क्रीमने कुणीही गोरे होत नसते या सत्याचा मुलीने शोध घेतला नाही असेही यावेळी सोळंके म्हणाले. शिबिरात श्रद्धा आणि अंधश्रद्धा या विषयावर ते बोलत होते. ज्योतिषशास्त्र, नशीब खरे की खोटे यावर पुरुषोत्तम आवारे पाटील यांनी बोलताना ग्रहगोल ताऱ्यांचा अभ्यास करणारे खगोल हे शास्त्र आहे मात्र ज्योतिष हे शास्त्र नसून ठोकताळे आणि अंदाज सांगण्याचा उत्तम धंदा आहे. उद्या आपल्या जीवनात काय घडणार आहे हे आजवर जगातील कोणत्याही व्यक्तीला सांगता आले नाही. कुंडली, पत्रिका आणि राशिभविष्य काढण्यात, बघण्यात अजिबात वेळ घालवू नका असे आवाहन त्यांनी केले. अंनिसचे राज्य सहसंघटक अशोक घाटे यांनी चमत्कारामागील विज्ञान या विषयावर बोलताना मंत्राने अग्नी पेटविणे, हस्त स्पर्शाने वासू गोड करणे, चुन्याचा गुलाल करणे, नारळातून देवीचा खण काढणे इत्यादी चमत्कार करून दाखवत त्यामागील विज्ञान समजावून सांगितले. ॲड. शेषराव गव्हाळे, कौशिक पाठक, योगेश आवारे, दिगंबर सांगळे, विजय बुरुकले, मंगेश वानखडे, अमोल ठाकरे, मनोहर इंगळे, ॲड. रूपाली राऊत, मनोहर इंगळे यांनी शिबिरासाठी परिश्रम घेतले. दरम्यान, आगामी काळात अकोला जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात युवक,युवतींसाठी अंधश्रद्धा निर्मूलन शिबिरे घेतली जाणार असून त्यासाठी इच्छुक तरुणांनी संपर्क करावा असे आवाहन यावेळी अंनिसचे जिल्हा संघटक ॲड. अनिल लव्हाळे यांनी आपल्या प्रास्तविक भाषणातून केले.

## पर्यावरण संवर्धन ही प्रत्येकाची वैयक्तिक व सामाजिक जबाबदारी

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील वनोजा येथील ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था, वनोजाद्वारा संचालित श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालय, वनोजा आणि आधार सोशल इन्स्टिट्यूट अँड रिसर्च सेंटर, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने 'पर्यावरण आणि मानवता' या विषयावर दि. ८ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. देशभरातील प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सहभाग नोंदविला.

कार्यशाळेचे प्रास्ताविक आयोजक समन्वयक डॉ. ममता पाथ्रीकर यांनी केले. 'जीव-जगत-परमेश्वर' ही भारतीय संस्कृतीची संकल्पना असून पर्यावरण आणि मानवता यांचे नाते अतूट आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यशाळेचे उद्घाटन संत गाडगेबाबा कला व वाणिज्य महाविद्यालय, वलगावचे प्राचार्य तथा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे माजी वाणिज्य अधिष्ठाता डॉ. दिनेश निचित यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी पर्यावरणाचा वाढता ऱ्हास आणि विकासातील असंतुलनामुळे निर्माण होणाऱ्या विविध समस्यांकडे लक्ष वेधत शाश्वत विकासाची गरज अधोरेखित केली.

बीजभाषक डॉ. पुनिता आनंद यांनी पर्यावरण आणि साहित्य यांच्यातील अनुबंध स्पष्ट केला. प्रमुख मार्गदर्शक डॉ. संदीप तुंडूरवार, डॉ. राहुल इंगोले आणि डॉ. बाळू भालेराव यांनी अनुक्रमे शासन, भौगोलिक व आर्थिक दृष्टिकोनातून पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासाचे महत्त्व विशद केले. समारोपीय सत्रात मुंबई येथील डॉ. सुनील अवचार यांनी साहित्य, निसर्ग आणि मानवी जीवन यांच्यातील अतूट संबंध उलगडून सांगितला.

अध्यक्षीय भाषणात साळुंकाबाई राऊत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे यांनी पर्यावरणाचा वाढता ऱ्हास, प्लास्टिक प्रदूषण, रस्त्यांवरील प्राण्यांचे अपघात तसेच मानव-पर्यावरण संघर्ष यांसारख्या गंभीर प्रश्नांकडे लक्ष वेधले.

## माविमच्या राज्यस्तरीय आढावा बैठकीत अमरावती विभागाची राज्यात बाजी



■ प्रतिनिधी | वाशिम ■

महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) आयोजित राज्यस्तरीय वार्षिक आढावा बैठकीत अमरावती विभागाने राज्यात प्रथम क्रमांक पटकावत मानाचा बहुमान मिळविला, तर उत्कृष्ट कामगिरीच्या बळावर वाशिम जिल्ह्याने राज्यात तृतीय क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त केला. ३० व ३१ जुलै २०२६ रोजी झालेल्या या बैठकीत माविमच्या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. पुरस्कार वितरण समारंभात माविमच्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती राजलक्ष्मी शाह (भा.प्र.से.) यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी महेंद्र गमरे, अशोक फाळणीकर, कार्यक्रम व्यवस्थापक श्रीमती रूपा मिस्त्री, व्यवस्थापक श्रीमती गौरी दोंदे, विभागीय सल्लागार केशव पवार तसेच विभागीय व्यवसाय सल्लागार पवन देशमुख उपस्थित होते.

## स्वाधारसाठी शासकीय वसतिगृहाचा अर्ज भरणे बंधनकारक

**अकोला :** अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांपैकी अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील इयत्ता ११ वी १२ वी तसेच इयत्ता १२ वी नंतरच्या व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेता यावे म्हणुन भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा या विद्यार्थ्यांना स्वत: उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट जमा करण्याकरिता शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरु केली आहे.

## मराठी भाषा विभागासह अधिनस्त कार्यालयांची सात संकेतस्थळे नव्या स्वरूपात कार्यान्वित

### नव्या संकेतस्थळांचा लाभ घेण्याचे मराठी भाषा विभागाचे आवाहन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मराठी भाषा विभाग तसेच विभागाच्या अधिनस्त कार्यालयांची एकूण सात संकेतस्थळे महाराष्ट्र शासनाच्या मानक डोमेन संरचनेनुसार नव्या स्वरूपात कार्यान्वित करण्यात आली आहेत. नागरिक, संशोधक, अभ्यासक, विद्यार्थी, साहित्यप्रेमी तसेच शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांनी या नव्या संकेतस्थळांचा वापर करावा, असे आवाहन मराठी भाषा विभागाने केले आहे.

मराठी भाषा विभाग तसेच विभागाच्या अधिनस्त भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ आणि राज्य मराठी विकास संस्था यांच्या एकूण सात संकेतस्थळांच्या हस्तांतरणाची कार्यवाही ईंर्ष्िऊ मार्फत सुरू होती. या हस्तांतरण प्रक्रियेदरम्यान संकेतस्थळांसाठी महाराष्ट्र शासनाच्या मानक डोमेन संरचनेनुसार नवीन डोमेन वापरण्याची कार्यवाही करण्यात आली.या तांत्रिक प्रक्रियेदरम्यान आवश्यक प्रणालीगत बदल करण्यात येत असल्यामुळे संबंधित संकेतस्थळे काही काळ तात्पुरती अनुपलब्ध होती. आता हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाली असून सर्व संकेतस्थळे नव्या स्वरूपात नियमितपणे कार्यान्वित करण्यात आली आहेत.

## महिलांनी उद्योजिका होऊन आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे जिल्हा समन्वय अधिकारी वर्षा खोब्रागडे

■ प्रतिनिधी | वाशिम ■

महिलांनी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी उपलब्ध शासकीय योजनांचा लाभ घेत उद्योजकतेकडे वाटचाल करावी. सत्ता, संपत्ती आणि समान संधी हे महिला आर्थिक विकास महामंडळाचे ब्रीदवाक्य असून, महिलांना न्याय्य संधी मिळवून देण्यासाठी त्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हा समन्वय अधिकारी वर्षा खोब्रागडे यांनी केले.

लोकसंचालित साधन केंद्र, वाशिमची १६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा श्री विठ्ठलवाडी मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आली. यावेळी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून मान्यवरांच्या हस्ते



दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. सभेत केंद्राच्या अध्यक्षा सविता सुनील चौधरी यांनी सन २०२५–२६ या वर्षाचा कामकाजाचा आढावा तसेच सन २०२६–२७ साठीचे नियोजन सादर केले. यावेळी नाबार्डचे जिल्हा प्रबंधक शंकर कोकडवार यांनी महिलांनी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून विविध योजनांचा लाभ घेऊन लघु तसेच मोठे उद्योग उभारावेत, असे सांगितले. महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी आकर्षक पॅकेजिंग, लेबलिंग आणि ब्रँडिंग करून विक्री व्यवस्थेला बळकटी द्यावी, असे त्यांनी नमूद केले.

पीएमएफएमई योजनेचे श्री. मुठाळ यांनी योजनेची माहिती देत महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले. या योजनेअंतर्गत ३५ टक्के अनुदानाची तरतूद असून, पात्र महिलांनी योजनेचा लाभ घेऊन उद्योग उभारणीसाठी पुढाकार घ्यावा, असे त्यांनी सांगितले. बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखा व्यवस्थापकांनी महिला बचत गटांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी लोकसंचालित साधन केंद्र आणि बँक ऑफ महाराष्ट्र यांच्यातील सामंजस्य कराराच्या माध्यमातून महिलांना कर्जपुरवठा करण्यासाठी सहकार्य केले जाईल, असे सांगितले. पोकरा योजनेचे सोहम बेलोकर यांनी पोकरा २.० अंतर्गत गावांसाठी उपलब्ध विविध योजनांची माहिती दिली. या योजनांमध्ये अनुदानाची तरतूद असून, महिला बचत गटांनी उपलब्ध संधींचा लाभ घेऊन आर्थिक उपक्रमांना चालना द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. सभेदरम्यान उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या उद्योजिकांचा, उत्कृष्ट सीआरपी तसेच गाव विकास समितीचा सत्कार करण्यात आला.

यावेळी माविमचे लेखाधिकारी संकेत महाजन, वैभव काळमेघ, पुरुषोत्तम हातोलकर, राहुल मोकळे, प्रमोद गोरे, साधना मुळे यांच्यासह संबंधित अधिकारी, कर्मचारी, महिला बचत गटांच्या प्रतिनिधींची उपस्थिती होती.

जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २५५ ■ मंगळवार ११ ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु

# ४०० खाटांचे रुग्णालय हिंगणघाटच्या आरोग्यसेवेला नवी दिशा देणार

**- ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे**

## आजनसरा देवस्थानला ‘ब’ वर्गाचा दर्जा अन् ५ कोटींचा निधी

**हिंगणघाट जनमाध्यम :** हिंगणघाट येथे उभारण्यात येणारे ४०० खाटांचे रुग्णालय केवळ शहरापुरते मर्यादित न राहता संपूर्ण परिसरातील ग्रामीण नागरिकांसाठी आरोग्यसेवेचे महत्त्वाचे केंद्र ठरणार आहे. या रुग्णालयामुळे नागरिकांना उपचारासाठी वर्धा अथवा नागपूर गाठण्याची गरज कमी होईल. हिंगणघाटच्या विकासाच्या इतिहासात ४०० खाटांचे रुग्णालय आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय ही ऐतिहासिक बाब ठरेल, असे प्रतिपादन ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी केले. हिंगणघाट येथे नव्याने बांधण्यात येणाऱ्या ४०० खाटांच्या रुग्णालय इमारतीचे भूमिपूजन मंत्री जयकुमार गोरे, पालकमंत्री डॉ. पंकज भोयर आणि आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार समीर कुणावार, नगराध्यक्ष डॉ. नयना तुळसकर, जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुधीर कोठारी, संजय गाते, आरोग्य उपसंचालक डॉ. शशिकांत शंभरकर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुमंत वाघ आदी उपस्थित होते.

मंत्री गोरे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राला विकसित, समृद्ध आणि निरोगी बनविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय उभारण्यासोबत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे. हिंगणघाटमध्ये ४०० खाटांचे रुग्णालय आणि मेडिकल कॉलेज व्हावे, हे आमदार समीर कुणावार यांचे स्वप्न होते. त्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. मतदारसंघातील कामांसाठी प्रत्येक टेबलपर्यंत जाऊन पाठपुरावा करणारा आमदार म्हणून त्यांनी कुणावार यांच्या कार्याचे कौतुक केले.



### आजनसरा देवस्थानला ‘ब’ वर्गाचा दर्जा

हिंगणघाट परिसराचे श्रद्धास्थान असलेल्या आजनसरा देवस्थानला सध्या ‘क’ वर्गाचा दर्जा आहे. या देवस्थानला ‘ब’ वर्गाचा दर्जा देण्यासाठी प्रस्ताव तातडीने पाठविण्याच्या सूचना मंत्री गोरे यांनी दिल्या. तसेच ग्रामविकास विभागामार्फत देवस्थानच्या विकासासाठी ५ कोटी रुपयांचा निधी देण्याची घोषणाही त्यांनी केली. हिंगणघाट, समुद्रपूर आणि सेलू पंचायत समिती इमारतींच्या कामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही त्यांनी दिली.

### कुणावारांच्या पाठपुराव्याची मंत्र्यांकडून वाहवा

४०० खाटांच्या रुग्णालयाचा प्रकल्प हिंगणघाटच्या जनतेसाठी भावनिक आणि ऐतिहासिक ठरला आहे. अनेक अडथळ्यांवर मात करून प्रकल्पासाठी केलेल्या पाठपुराव्याचे श्रेय आमदार समीर कुणावार यांनी जनतेला दिले. मात्र, मंत्री गोरे यांनी त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे जाहीरपणे कौतुक केल्याने हिंगणघाटच्या राजकीय वर्तुळात कुणावारांच्या कार्याची चर्चा रंगली आहे.

### माईक’नेच काढला आवाज ; प्रशासनाची धावपळ

दरम्यान, भव्य भूमिपूजन सोहळ्यात नियोजनातील विस्कळीतपणाचे चित्रही दिसून आले. मंत्री, राज्यमंत्री, पालकमंत्री, आमदार आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित असतानाच भाषण सुरू असताना माईक बंद पडला. अचानक आवाज गायब झाल्याने आयोजकांची तारांबळ उडाली. मंत्र्यांसमोरच ध्वनिव्यवस्थेने दगा दिल्याने काही काळ कार्यक्रमस्थळी गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. मोठ्या शासकीय कार्यक्रमाच्या नियोजनावर यामुळे उपस्थितांमध्ये कुजबुज सुरू झाली.

# समृद्धी महामार्गावर वाहतूक विस्कळीत करणाऱ्या कंटेनर चालकावर कारवाई



**वर्धा जनमाध्यम :** समृद्धी महामार्गावर वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या कंटेनर चालकावर परिवहन विभाग व पोलिस विभागाने संयुक्त कारवाई केली. मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या लेनवर कंटेनर आडवा उभा करून वाहतूक विस्कळीत केल्याप्रकरणी चालकाविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनांक ९ ऑगस्ट रोजी दुपारी समृद्धी महामार्गावरील आयसी-०४, येळाकेळी येथे कंटेनर मोटार वाहन क्रमांक एचआर ५५ बीए ८५४४ चा चालक वाहन आडवे उभे करून वाहतुकीस अडथळा निर्माण करीत असल्याचे निदर्शनास आले. समृद्धी महामार्गावर वाहने ताशी १२० किलोमीटर वेगाने धावत असल्याने अशाप्रकारे वाहन उभे केल्यास गंभीर अपघात होण्याची शक्यता असते. त्यामुळे परिवहन विभाग आणि पोलिस विभागाने संयुक्तपणे कारवाई केली.

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, वर्धा यांच्याकडून वाहनावर मोटार वाहन अधिनियम १९८८ मधील कलम १९२ (अ) अंतर्गत कारवाई करण्यात आली. तसेच चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम विविध कलमांन्वये तसेच राष्ट्रीय महामार्ग कायदा १९५६ मधील कलम ८ ब अन्वये पोलिस ठाणे सावंगी येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

समृद्धी महामार्गावर शासनाच्या निर्देशानुसार २४ तास शून्य अपघात मोहिमेंतर्गत तपासणी मोहिम राबविण्यात येत आहे. या तपासणीदरम्यान सदर कंटेनर नो पार्किंग मध्ये थांबलेला आढळला. चालकाचे समुपदेशन करून वाहन सुरक्षित ठिकाणी हलविण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यानंतर वाहनाची कागदपत्रे व मालाचे टॅक्स इनव्हॉइस तपासले असता, वाहनातील माल नागपूर येथून पुणे येथे जात असल्याचे आढळले.

सदर वाहन राष्ट्रीय परवान्याच्या अटी व शर्तींचे उल्लंघन करीत असल्याचेही तपासणीत निष्पन्न झाले. त्यामुळे वाहनावर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून चालकाची अनुज्ञप्ती (ड्रायव्हिंग लायसन्स) निलंबित करण्यासाठी संबंधित मूळ अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याकडे तसेच वाहनाचा परवाना निलंबित करण्यासाठी मूळ नोंदणी प्राधिकाऱ्याकडे प्रस्ताव पाठविण्यात येत आहे.

समृद्धी महामार्गावर वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशाप्रकारे वाहन उभे करणे अथवा वाहतूक नियमांचे उल्लंघन करणे टाळावे. अशा प्रकारचे कृत्य करणाऱ्या वाहनधारक व चालकांविरुद्ध मोटार वाहन अधिनियम व संबंधित नियमांनुसार दंडात्मक कारवाई, तसेच आवश्यकतेनुसार पोलिसांकडून फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल, असे उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाने कळविले आहे.

# परदेशात पाणपक्ष्यांसाठी कृत्रिम घरटी; हिंगणघाटमध्ये घरटी असलेली झाडेच तोडली

### हेरॉनरीत दोन नव्या बगळयांच्या प्रजातींचे आगमन प्रशासनाच्या संवर्धनाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह

**हिंगणघाट जनमाध्यम :** पोलंड, हंगेरी, जर्मनी आणि पोर्तुगालसारख्या देशांमध्ये पाणपक्ष्यांच्या संवर्धनासाठी कृत्रिम घरटी उभारून त्यांना सुरक्षित अधिवास उपलब्ध करून दिला जात असताना हिंगणघाटमध्ये मात्र घरटी असलेली झाडेच तोडली जात असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. विदर्भातील प्रमुख पाणपक्षी मिश्र विण वसाहतींपैकी एक असलेल्या हिंगणघाटच्या हेरॉनरीमध्ये दरवर्षी हजारो पाणपक्षी प्रजननासाठी दाखल होतात.

दोन वर्षांपूर्वी गेट बांधण्यासाठी पाणपक्ष्यांची घरटी असलेले झाड तोडण्यात आले होते. त्याबदल्यात दोन काटेरी झाडे लावण्याचे आश्वासन हिंगणघाट नगर परिषद व सार्वजनिक बांधकाम विभागाने दिले होते. मात्र, अद्याप त्याची अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे प्रशासनाच्या आश्वासनांवर पक्षीप्रेमींकडून नाराजी व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, यंदा हेरॉनरीमध्ये प्रथमच मध्यम बगळा (Intermediate Egret) आणि मोठा बगळा (Great Egret) या दोन नव्या प्रजातींची घरटी आढळली आहेत. या प्रजाती प्रजननासाठी येथे दाखल झाल्याने हिंगणघाट परिसराचे पर्यावरणीय महत्त्व अधोरेखित झाले आहे. परदेशात पक्ष्यांसाठी कृत्रिम घरटी उभारली जात असताना हिंगणघाटमध्ये निदान नैसर्गिक घरटी आणि घरटी असलेली झाडे तरी जपली जाणार का, असा सवाल उपस्थित होत आहे. आता आश्वासनांची नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीची गरज आहे.



# आदिवासी दिनाच्या रॅलीत माणुसकीची ‘थंड’ सावली

### जागतिक आदिवासी दिनानिमित्त नवक्षितिज चॅरिटेबल ट्रस्टचा सामाजिक उपक्रम; सेवेतून जपली सामाजिक बांधिलकी



**वर्धा जनमाध्यम :** जागतिक आदिवासी दिनानिमित्त शहरात आयोजित करण्यात आलेल्या रॅलीतील नागरिकांना नवक्षितिज चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने पाण्याच्या बाटल्या व आईस्क्रीमचे वाटप करण्यात आले. उन्हाचा तडाखा लक्षात घेऊन राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला.

आदिवासी समाजाची समृद्ध संस्कृती, परंपरा, हक्क आणि निसर्गाशी असलेले अतूट नाते यांचा सन्मान करण्यासाठी जागतिक आदिवासी दिन साजरा केला जातो. या निमित्ताने आयोजित रॅलीमध्ये मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. रॅलीदरम्यान उन्हामुळे नागरिकांना त्रास होऊ नये, यासाठी ट्रस्टच्या सदस्यांनी ठिकठिकाणी पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले. तसेच नागरिकांना आईस्क्रीमचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाला रॅलीतील सहभागी नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

‘सेवा हीच खरी सामाजिक बांधिलकी’ या विचारातून नवक्षितिज चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. गरजू व्यक्तींना मदतीचा हात देणे, सामाजिक एकोपा वाढविणे आणि समाजहिताच्या कार्यात योगदान देणे, हा ट्रस्टचा उद्देश असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नरेश कुमरे, राहुल कोहचडे, प्रवीण आडे, मनोज सिडाम, संजय आत्राम यांच्यासह ट्रस्टच्या पदाधिकारी व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. नागरिकांनीही समाजोपयोगी उपक्रमांत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले.

# आर्वीत स्वातंत्र्यदिनी सायकल रेस स्पर्धेचे आयोजन

### आमदार सुमित वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन

**आर्वी जनमाध्यम :** स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून आमदार सुमित वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता युवा मोर्चा, आर्वी शहर व ग्रामीणतर्फे भव्य राज्यस्तरीय सायकल रेस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या १५ ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० वाजता शासकीय विश्रामगृहासमोर, मेन रोड, आर्वी येथून या स्पर्धेला सुरुवात होणार आहे. राज्यभरातील सायकलपटू या स्पर्धेत सहभागी होण्याची शक्यता असून आर्वीकरांना क्रीडामहोत्सवाचा थरार अनुभवता येणार आहे.

ही स्पर्धा पुरुष खुल्या गटासाठी आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धकांसाठी १३ ऑगस्टपर्यंत अंतिम नोंदणी करता येणार आहे. विजेत्यांसाठी आकर्षक रोख पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. प्रथम क्रमांकासाठी २५ हजार १ रुपये, द्वितीय क्रमांकासाठी १५ हजार १ रुपये, तर तृतीय क्रमांकासाठी ७ हजार १ रुपये देण्यात येणार आहेत. याशिवाय सहभागी सर्व स्पर्धकांना प्रोत्साहनपर बक्षिसे देऊन गौरविण्यात येणार आहे.

तरुणांमध्ये क्रीडाभावना निर्माण करण्यासोबतच आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. आर्वी शहर व परिसरातील तरुण, खेळाडू आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी स्वप्निल कठाळे, आशिष टिकले, रवि गाडगे, सुमित शिंगाणे व अमोल पांडे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# हर घर तिरंगा’ अभियानात एनसीसी छात्रसैनिकांचा सहभाग



वर्धा जनमाध्यम : स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाच्या ‘हर घर तिरंगा’ अभियानात २१ महाराष्ट्र बटालियन एनसीसी अंतर्गत देवळी येथील एस.एस.एन.जे. महाविद्यालयाच्या एनसीसी युनिटने उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. अभियानाची सुरुवात वर्धा जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला हार अर्पण करून करण्यात आली. एनसीसी अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर यांच्या नेतृत्वाखाली सीनियर अंडर ऑफिसर कल्याणी लिखार, अंडर ऑफिसर कोमल शितळे, अंडर ऑफिसर रितेश बुटे आणि सार्जंट वैष्णवी कन्नाके यांच्या नेतृत्वात चार पथके तयार करण्यात आली आहेत.

या अभियानात महाविद्यालयातील ६० एनसीसी छात्रसैनिक सहभागी झाले असून, देवळी शहरातील सुमारे १ हजार घरांना भेट देऊन तिरंगा फडकविण्याचा संदेश देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

एनसीसीचे कमान अधिकारी कर्नल जिसांतो व प्रशासकीय अधिकारी लेफ्टनंट कर्नल आर.के. सामनंदा यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबविण्यात येत आहे. एनसीसी अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर यांच्या नेतृत्वाखाली सीनियर अंडर ऑफिसर कल्याणी लिखार, अंडर ऑफिसर कोमल शितळे, अंडर ऑफिसर रितेश बुटे आणि सार्जंट वैष्णवी कन्नाके यांच्या नेतृत्वात चार पथके तयार करण्यात आली आहेत.

महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनीता सोनारे यांनी अभियानाला शुभेच्छा दिल्या. अभियान यशस्वी करण्यासाठी सार्जंट स्नेहा मडकाम, सार्जंट यामिनी पारधी, आरती मरघडे, साक्षी पारिसे, दुर्गेश पोटे यांच्यासह एनसीसी छात्रसैनिक परिश्रम घेत आहेत.

# मानधनाच्या नावाखाली शोषण बंद करा

## आयटकचा वर्ध्यात जेलभरो आंदोलन ; ९८७ महिला-पुरुषांना अटक करून सुटका

### अंगणवाडी, आशा, पोषण आहार कर्मचारी व स्त्री परिचरांचा सरकारला इशारा

**वर्धा जनमाध्यम :** शासनाच्या योजना घराघरात पोहोचविणाऱ्या अंगणवाडी सेविका-मदतनीस, आशा व गटप्रवर्तक, शालेय पोषण आहार कर्मचारी तसेच अंशकालीन स्त्री परिचरांच्या प्रलंबित मागण्यांनी सोमवारी वर्ध्यात सरकारविरोधात एल्गार केला. आयटकच्या नेतृत्वात काढण्यात आलेल्या मोर्चानंतर बजाज चौकात जेलभरो आंदोलन करण्यात आले. पोलिसांनी ९८७ महिला-पुरुष आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेऊन नंतर सुटका केली. आंदोलनामुळे काही काळ परिसर घोषणांनी दणाणून गेला.

आयटकचे राज्य सचिव कॉम्रेड दिलीप उटाणे यांच्या नेतृत्वात दयालनगर रेल्वे स्थानक येथून मोर्चाला सुरुवात झाली. अत्यल्प मानधनावर वर्षानुवर्षे शासनाच्या विविध योजना राबवूनही मूलभूत सुविधा आणि सामाजिक सुरक्षा न मिळाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. किमान वेतन, सेवासुरक्षा, पेन्शन, इझ, ग्रॅच्युइटी, विमा आणि शासकीय सेवेत समावेश या प्रमुख मागण्यांसाठी हा लढा उभारण्यात आला.



अंगणवाडी सेविका व मदतनीसांना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ग्रॅच्युइटी लागू करावी. सन्मानजनक पेन्शन देतानाच किमान वेतनाच्या धर्तीवर मानधन निश्चित करावे. आजारपणाची, आकस्मिक व प्रसूती रजा, इझ, विमा आणि सामाजिक सुरक्षा लागू करावी, अशी मागणी करण्यात आली.

शालेय पोषण आहार योजनेतील स्वयंपाकी व मदतनीसांना किमान २१ हजार रुपये मासिक वेतन द्यावे. त्यांना चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचा दर्जा देऊन शासकीय सेवेत सामावून घ्यावे, अशी मागणी करण्यात आली.

अंशकालीन स्त्री परिचरांना दरमहा २६ हजार रुपये किमान वेतन द्यावे. इझ, ग्रॅच्युइटी, पेन्शन, विमा व सामाजिक सुरक्षा लागू करून सेवाज्येष्ठतेचे लाभ द्यावेत, अशी मागणी आहे.

आशा व गटप्रवर्तकांना निश्चित मासिक वेतन द्यावे. दहा वर्षांपेक्षा अधिक सेवा केलेल्या गटप्रवर्तकांना शासकीय सेवेत सामावून घ्यावे. सेवासुरक्षा देऊन मनमानी सेवा समाप्ती बंद करावी, अशी मागणी करण्यात आली.

‘काम नियमित घेतले जाते, मग वेतन आणि सामाजिक सुरक्षा नियमित का नाही असा प्रश्न आंदोलनकर्त्यांनी सरकारला केला. मागण्यांवर तातडीने निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा आयटकने दिला.

आश्वासनांचा बाजार आता बंद करा

शासनाच्या योजना राबविणाऱ्यांना सन्मानजनक वेतन आणि सामाजिक सुरक्षा मिळालीच पाहिजे. आता निर्णयाची वेळ आली आहे. — कॉम्रेड दिलीप उटाणे, राज्य सचिव, आयटक

MAHAVITARAN

**E-TENDER NOTICE**

Proposals are invited on e-tender by this office from registered & experienced Firms / Contractors in the prescribed Tender form for **Repairing and fixing of 11KV and 33KV CT's & PT's of various specification for Substation & Crossover** under **WARDHA CIRCLE Tender No. SE/WRD/CTPTREP/ 2026-27/T-09**

The e-tenders can be downloaded from our website www.mahadiscom.in or http://etender.mahadiscom.in/eatApp after payment of requisite Tender fee ONLINE only. Tenders can be downloaded from **11.08.2026 to 17.08.2026.** The Pre Bid Meeting on dt. 14.08.2026 at 15:00 Hrs. The last date of tender submission is 17.08.2026 at 15.00 Hrs. & Tender will be opened on Dt. 18.08.2026, at 11.00 Hrs. if possible.

Any changes in Tender Schedule, Corrigendum, Amendment, Extension of due dates etc., if any shall be available in our website only and will not be published in the News Papers separately.

Contact person : Executive Engineer (Adm) Mobile No. **7875761027**

**NZ PRO No. 116/2026 Dt.10.08.2026**

**Superintending Engineer, O&M, Circle, MSEDCL, Wardha**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# भारतीय तिरंगा यात्रा केवळ रॅली नसून देशप्रेमाची भावना- मुख्यमंत्री फडणवीस

## ‘राष्ट्र प्रथम तिरंगा ऊत्सव’ला ऊत्स्फूर्त प्रतिसाद

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय तिरंगा आज आपण हातात घेतला असला तरी तो आपल्या मनामध्ये आहे. भारतीय संविधानाचा सन्मान, देशाचा स्वाभिमान आणि राष्ट्रभावना आपल्या अंत?करणात आहे. नवभारत घडविण्याची जबाबदारी आता प्रत्येक नागरिकाची आहे. ही जबाबदारी आपण पार पाडली तरच हातातील तिरंग्याला ख-या अर्थाने अर्थ प्राप्त होईल, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.तिरंगा यात्रा ही केवळ एक रॅली नसून देशप्रेमाची भावना जागृत करणारा ऊपक्रम असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

वरळी सी फेस येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्र प्रथम तिरंगा ऊत्सव रॅलीचे ऊद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी तिरंग्याचे महत्त्व अधोरेखित करत देशाच्या विकासाचा आणि नवभारताच्या संकल्पनेचा ऊल्लेख केला.

यावेळी विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबईच्या महापौर रितू तावडे, सर्वश्री आमदार रवींद्र चव्हाण, अमित साटम, योगेश सागर, मिहिर कोटेचा, कॅप्टन तमिळ सेल्वन, राजहंस सिंह, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड आदी ऊपस्थित होते.






मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आज मला येथे दोन सागर दिसत आहेत. एक म्हणजे समोर असलेला हिंद महासागर आणि दुसरा म्हणजे भारतीय तिरंग्याचा महासागर. ज्या तिरंग्यासाठी क्रांतिकारकांनी बलिदान दिले, सैनिकांनी सीमेवर प्राणांची आहुती दिली आणि देशवासीयांनी स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला, तो तिरंगा जोपर्यंत चंद्र-सूर्य आहेत तोपर्यंत सदैव ऊंच फडकत राहील. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत जगातील चौथी सर्वात मोठी आर्थिक महासत्ता बनला आहे. विविध क्षेत्रांमध्ये भारताने ऊल्लेखनीय प्रगती केली आहे. चंद्राच्या दक्षिण ध्रु वावर यान ऊतरविणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला आहे. अंतराळ संशोधन, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, फिनटेक आणि ऊद्योन्मुख तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताने मोठी झेप घेतली आहे,असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

भारतामध्ये जगातील दुसरी सर्वात मोठी स्टार्टअप इकोसिस्टम विकसित होत असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले., भारताकडे सर्वात मोठी युवा शक्ती आहे. तिरंगा हातात घेउन बाहेर पडणा-या या तरु णाईला थांबवण्याची ताकद जगात कोणाकडेही नाही. भारत एक मोठी महासत्ता म्हणून ऊदयास येत आहे.भारताची प्रगती काही शक्तींना खटकत आहे. काही परकीय शक्ती भारताची घोडदौड थांबवण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र भारताचा विकासाचा प्रवास कोणीही थांबवू शकणार नाही. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पाहिलेल्या नवभारताच्या संकल्पनेतून आगामी काळात भारत विकसित राष्ट्र म्हणून जगाच्या नकाशावर अग्रस्थानी दिसेल,असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्तकेला.या रॅलीसाठी वरळी सी फेस येथे हजारो मुंबईकर एकत्र आले होते. तिरंगा ध्वज हातात घेतलेले नागरिक, युवक, विद्यार्थी आणि एनसीसी कॅडेट्स यांच्या ऊत्साहामुळे संपूर्ण परिसर देशभक्तीच्या वातावरणाने भारावून गेला होता. भारत माता की जय, जय शिवाजी, जय भवानी, वंदे मातरम अशा घोषणांसह देशभक्तीपर गीतांनी वातावरण दुमदुमून गेले.

# आता भारतातून थेट रशियासाठी लवकरच रेल्वे

**नवी दिल्ली :** अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्ध अद्याप संपलेले दिसत नाही. याचा थेट परिणाम होर्मुझ सामुद्रधुनीतून जाणा-या तेलवाहू तसेच व्यापारी जहाजांवर झालेला पाहायला मिळत आहे. यातच भारत ते रशिया या दोन देशांदरम्यान थेट रेल्वे सेवा सुरू करण्याचा मानस रशियाकडून बोलून दाखवण्यात आला आहे. याबाबत भारताला खास प्रस्ताव देण्यात आला असून याचा मार्ग कसा असेल, यासंदर्भातही काही आरेखन करण्यात आले आहे. रशिया भविष्यात हिंद महासागरापर्यंत भूमार्ग ऊपलब्ध करू न देणारा आणि त्याला भारताशी जोडणारा रेल्वेमार्ग बांधण्याच्या शक्यतेचा शोध घेत आहे. रशियाचे ऊपपंतप्रधान मरात खुसनुलिन यांनी या संदर्भात पुढाकार घेतला आहे.

## नावात बदल

**जुने नांव -**
आदित्य सोनली रंगारी

**नविन नांव -**
आदित्य संघपाल ढवाले

रा.: भिमटेकडी, उत्तमनगर,
रुख्मीणी नगर,
अमरावती.
महाराष्ट्र - ४४४६०६

## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात

शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५ (जाहिरात दिनांक २०.०७.२०२६) (प्रसिद्धी दिनांक १५.०७.२०२६)

संस्थेचे नांव- (2707)SCO PEOPLE EDUCATION SOCIETY KHANAPUR TQ MORSHI DIST AMRAVATI

(Secondary/Higher Secondary) - With Interview

[illegible]

आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशील

[illegible]

शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व माध्यमनिहाय रिक्त पदांचा तपशील

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी | ... | ... | ... | ... | ... | TET/CTET | पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Marathi | Graduate Teacher | Consolidated | Aided | Maths | Marathi | Graduation | Diploma | TET Paper | 1 |
| 2 | Marathi | Graduate Teacher | Consolidated | Aided | Language | [illegible] | Graduation | Graduation | TET Paper | 1 |
| 3 | Marathi | Graduate Teacher | Consolidated | Aided | Physics | Marathi | Graduation | Graduation | [illegible] | 1 |
| | | | | | | | | | Total | 3 |

[illegible]

## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात (मुलाखतीसह)

शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५ (जाहिरात दिनांक २०.०७.२०२६)

संस्थेचे नांव- [illegible] श्री.गजानन ग्रामीण आरोग्य व शिक्षण संस्था, अमरावती

[illegible]

आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशील

[illegible]

शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व माध्यमनिहाय रिक्त पदांचा तपशील

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी | ... | ... | ... | ... | ... | TET/CTET | पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Marathi | Under Graduate Teacher | Consolidated | Aided | All Subjects | Marathi | HSC | Diploma | TET Paper 1 | 1 |
| 2 | Marathi | Graduate Teacher | Consolidated | Aided | Maths | English | Graduation | Diploma | TET Paper 2 | 1 |
| | | | | | | | | | Total | 2 |

[illegible]

अध्यक्ष / सचिव
श्री.गजानन ग्रामीण आरोग्य व शिक्षण संस्था, अमरावती

## -सायटेशन/जाहीरनामा-

विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

[illegible]

## जाहीर नोटीस

विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती

[illegible]

## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात

शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५ (जाहिरात दिनांक २०.०७.२०२६) (प्रसिद्धी दिनांक ०६.०८.२०२६)

संस्थेचे नांव- (2707CSSU306) Prayatk Shikshan Sanstha (Secondary/Higher Secondary) - With Interview

शैक्षणिक स्तर - Secondary/Higher Secondary

[illegible]

आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशील

[illegible]

शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व माध्यमनिहाय रिक्त पदांचा तपशील

[illegible]

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी | ... | विषय | ... | ... | ... | TET/CTET | पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Marathi | Under Graduate Teacher | Consolidated | Aided | [illegible] | Marathi | HSC | Diploma | TET Paper 1 | 1 |
| 2 | Marathi | Graduate Teacher | Consolidated | Aided | Language (English) | | Graduation | Diploma | TET Paper 2 | 1 |
| 3 | Marathi | Graduate Teacher | Consolidated | Aided | Maths and Science | Marathi | Graduation | Diploma | TET Paper 2 | 1 |
| 4 | Marathi | Graduate Teacher | Consolidated | Aided | Science | Marathi | Graduation | Graduation | | 1 |
| 5 | Marathi | Graduate Teacher | Consolidated | Aided | Language | | Graduation | Graduation | | 1 |
| | | | | | | | | | Total | 5 |

[illegible]

अध्यक्ष / सचिव
प्रायत्क शिक्षण संस्था, [illegible] जि.अमरावती

## जाहीर नोटीस

विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती

[illegible]

अर्जदार : [illegible]

— विरुद्ध —

गैरअर्जदार : निरंक

[illegible]

मा.दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

[illegible]

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, [illegible] अमरावती

[illegible]

## सायटेशन/जाहीरनामा

विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

[illegible]

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

[illegible]

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## रुपयाची किंमत

**भारत जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. उत्पादन, सेवा, तंत्रज्ञान आणि डिजिटल व्यवहारांमध्ये भारताने मोठी झेप घेतली आहे; परंतु या सकारात्मक चित्राला रुपयाच्या घसरणीने काहीसे ग्रहण लागले आहे. प्रश्न केवळ रुपया घसरला याचा नाही, तर ही घसरण किती काळ सुरू राहणार आणि तिचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर किती व्यापक परिणाम होणार, हा आहे. रुपया का घसरतो, याची अनेक कारणे आहेत. सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे अमेरिकन डॉलरची जागतिक ताकद. अमेरिकेची मध्यवर्ती बँक 'फेडरल रिझर्व्ह' व्याजदर वाढवते, तेव्हा जागतिक गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणुकीसाठी अमेरिकेकडे वळतात. त्यामुळे डॉलरची मागणी वाढते आणि रुपयासह अनेक देशांच्या चलनांवर दबाव निर्माण होतो. दुसरीकडे भारतासारखा देश मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, संरक्षण साहित्य, यंत्रसामग्री आणि औद्योगिक कच्चा माल आयात करतो. या आयातीसाठी डॉलरची आवश्यकता असते. डॉलरची मागणी वाढली, की रुपयाचे मूल्य आपोआप कमी होते. रुपयाच्या घसरणीचा पहिला आणि सर्वाधिक परिणाम आयातीवर होतो. भारत आपल्या गरजेच्या जवळपास ८५ टक्के कच्च्या तेलाची आयात करतो. डॉलर महाग झाला, की त्याच प्रमाणातील तेलासाठी अधिक रुपये मोजावे लागतात. परिणामी पेट्रोल, डिझेल, एलपीजी, विमान इंधन आणि औद्योगिक इंधनाच्या किंमती वाढण्याची शक्यता निर्माण होते. इंधन महागले, की वाहतूक खर्च वाढतो आणि त्याचा परिणाम अन्नधान्यापासून बांधकाम साहित्यापर्यंत सर्व वस्तूंच्या किमतींवर होतो. महागाईचे चक्र वेगाने फिरू लागते. उत्पादन खर्च वाढला,की कंपन्या खर्चाचा भार ग्राहकांवर टाकतात.परिणामी, सर्वसामान्य नागरिकांच्या खिशावर अतिरिक्त ताण पडतो. अमेरिकेने अलीकडे इराणवर सलग १३ दिवस हल्ले केल्यानंतर किंचित विराम घेतला. इराणनेही शेजारील आखाती देशांवरील हल्ले स्थगित केले आहेत. युद्धाची वाढणारी व्याप्ती, संरक्षण सामग्रीचा घटणारा साठा, विस्कळित ऊर्जापुरवठा आणि अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम लक्षात घेऊन हे पाऊल उचलण्यात आले आहे. त्यामुळे जागतिक बाजारपेठेमध्ये कच्च्या तेलाच्या दरात पाच टक्क्यांची घट होऊन ते ९१ डॉलर प्रति बॅरल दरापर्यंत पोहोचले आहे. जगातील सर्वाधिक महत्त्वाच्या तेलमार्गांपैकी एक असलेल्या होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी जलवाहतूक लवकरच पूर्ववत होण्यास सुरुवात होईल.भारतात २५ मे पासून पेट्रोल व डिझेलचे दर स्थिर आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर, झपाट्याने विस्तारणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्ता परिसंस्थेला बळकट करण्यासाठी मायक्रोसॉफ्ट कंपनी भारतात १७.५ अब्ज डॉलरची गुंतवणूक करणार असल्याची कंपनीचे मुख्याधिकारी सत्या नाडेला यांनी केलेली घोषणा महत्वाची आहे. २०३५ पर्यंत देशातील म्युच्युअल फंडांची गंगाजळी ३०० लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त होण्याचा अंदाज आहे. असे असून देखील भारताच्या रुपयाची सतत घसरगुंडी होत असून,एका डॉलरला ९६ रुपयांची सीमारेषा त्याने पार केली आहे.शेअर बाजारात तेजी होती, तेव्हा देखील रुपया घसरत होता. परकीय चलनाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पुरवठ्यापेक्षा चलनाची मागणी जास्त होते,तेव्हा चलनाचा भाव वाढतो आणि मागणीच्या मानाने चलनाचा पुरवठा वाढतो, तेव्हा चलनाचा भाव कमी होतो. कुठलाही देश निर्यातीपेक्षा आयात जास्त करतो, तेव्हा त्याच्या चलनाचा भाव घसरत असतो.याचे कारण, निर्यात आणि आयात हे दोन्ही व्यवहार डॉलर या चलनात होत असल्यामुळे निर्यात करतेवेळी डॉलर्स मिळतात तर आयात करतेवेळी रुपया देऊन डॉलर्स विकत घेतले जातात आणि ते डॉलर्स देऊन परदेशातून वस्तू आणि सेवा या आयात करत असतो.त्यामुळे डॉलरचा भाव वाढतो आणि रुपयाचा घसरतो. वर्षानुवर्षे भारतात हेच चालत असल्यामुळे रुपयाचा भाव घसरत चालला आहे. एकीकडे भारतातील उद्योगधंद्यात परकीय भांडवल आकर्षित होत असले, तरी परदेशी अर्थसंस्थांनी भारतीय शेअर बाजारात गुंतवलेला पैसा काढून घ्यायला सुरुवात केलेलीच आहे. कारण त्यांना भारतापेक्षा अमेरिकेत वा अन्यत्र अधिक परतावा मिळत आहे. परदेशी गुंतवणूकदार भारतीय शेअर बाजारात समभाग विकत घेतो, तेव्हा तो डॉलर्स देत असतो. याउलट ते समभाग विकतात, तेव्हा मिळालेल्या रुपयांचे डॉलर खरेदी करतात आणि परदेशी नेतात. त्यामुळे डॉलरची मागणी वाढते आणि रुपयाच्या तुलनेत डॉलरचा भाव वाढतो. म्हणजेच अशा वेळी रुपया घसरत असतो आणि हेच गेले काही महिने सुरू आहे. २००० मध्ये एक डॉलर घेण्यासाठी ४५ रुपये मोजावे लागू लागले. २०१२ मध्ये डॉलरचा दर ५३ रुपयांवर जाऊन पोहोचला. १९६५ चे भारत-पाकिस्तान युद्ध तसेच दुष्काळी परिस्थिती यामुळे १९६६ अखेर भारत सरकारला प्रथमच रुपयाच्या अवमूल्यनाचा निर्णय घ्यावा लागला होता. रुपयाचे तब्बल ५७ टक्के अवमूल्यन करावे लागले. त्यामुळे ६ जून १९६६ पर्यंत एका डॉलरची किंमत ४.७६ रुपये इतकी होती. अवमूल्यन केल्यानंतर ती ७.५० रुपये इतकी झाली. डॉ. मनमोहन सिंग अर्थमंत्री असताना, जुलै १९९१ मध्ये रुपयाचे १९ टक्क्यांनी अवमूल्यन करण्यात आले. सध्या मात्र रुपयाने डॉलरपुढे नांगी टाकली आहे. त्याचे प्रमुख कारण स्थानिक चलन, म्हणजेच रुपयापेक्षा अमेरिकन चलनाला जागतिक बाजारात असलेली वाढती मागणी, हे आहे. आज संपूर्ण जगाची वाटचाल बहुध्रुवीय रचनेकडे होत असल्याचा दावा केला जात असला, तरी अजूनही अमेरिकन डॉलर हेच सर्वात प्रभावी चलन आहे. डॉलरला पर्यायी चलन निर्माण करण्यात अद्याप यश मिळालेले नाही. त्यामुळेच अजूनही डॉलरच्या तुलनेत एखाद्या चलनाचे मूल्य काय आहे, यावरून त्या देशाची पत ठरते. अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हच्या धोरणांमुळे अमेरिकन रोखे हे गुंतवणुकीवर अधिक लाभ मिळवून देत आहेत. परिणामी, डॉलर मजबूत होत आहे. म्हणूनच परकीय गुंतवणूकदारांनी भारतीय बाजारातून अलीकडील काळात १७अब्ज डॉलर काढून घेतले आहेत. दुसरीकडे बँकांकडून वाढीव दराने डॉलरची खरेदी सुरू होती. त्यातच अमेरिकेने भारतासह अनेक देशांवर चढे आयात शुल्क लादल्यामुळे परिस्थिती चिघळली आहे.**

# महाराष्ट्र निघाला का गुजरातच्या 'विरोधक मुक्त' वाटेवर?

राजकारणात एखादी घटना स्वतंत्रपणे पाहिली, तर तिचा अर्थ एक असतो. पण त्याच घटनेला वेगवेगळ्या दहा-पंधरा घटनांची जोड दिली आणि या सगळ्या घटनांकडे स्वतंत्रपणे न पाहता त्यांचे 'तुकडे' एखाद्या 'जिगसॉ पझल'प्रमाणे जोडले, तर आपल्या समोर घडणाऱ्या राजकारणाचे एक वेगळेच,आश्चर्यकारक चित्र स्पष्ट होऊ लागते....!

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिल्लीत जातात. आपल्या खासदारांसह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतात. दुसरीकडे शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे खासदारही सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली 'महाराष्ट्राच्या प्रश्नांसाठी' पंतप्रधानांची भेट घेण्याच्या तयारीत आहेत. त्याच सुमारास गृहमंत्री अमित शहा मुंबईत येतात... या दौऱ्यात अनेक अनपेक्षित लोक त्यांना भेटतात...

लोकशाहीत राज्याच्या नेत्यांनी पंतप्रधानांना,गृहमंत्र्यांना भेटणे,यात गैर काहीच नाही. उलट केंद्र आणि राज्य यांच्यात सुसंवाद असायलाच हवा.पण प्रश्न भेटींचा नाही. प्रश्न त्या भेटी ज्या राजकीय पार्श्वभूमीवर होत आहेत, त्या पार्श्वभूमीचा आहे...आणि आपल्या राजकीय भविष्याचा देखील आहे!

गेल्या पाच-सहा वर्षांत महाराष्ट्रातील 'राजकीय नकाशा' इतक्या वेगाने बदलला की, आज घडणारी एकेक घटना वेगळी न पाहता तिच्यामागची सलग प्रक्रिया समजून घेतली पाहिजे. तसे केले, तर महाराष्ट्राच्या राजकारणाचा एक वेगळाच आकृतिबंध पुढे येताना दिसतो... आणि तो पाहताना गुजरातची आठवण झाल्याशिवाय राहत नाही.

आपण जाणतोच की, गुजरातच्या राजकारणातून भाजप विरोधी आवाज जवळजवळ संपुष्टात आला आहे.गुजरात एका दिवसात'विरोधकमुक्त' झाला नाही. नरेंद्र मोदी २०१४ मध्ये दिल्लीला गेल्यावर भाजपला गुजरातमध्ये विरोधक उरले नाहीत, असेही झाले नाही. उलट मोदी गुजरात सोडून गेल्यानंतर तीनच वर्षांत, २०१७ मध्ये भाजपसमोर गंभीर आव्हान उभे राहिले होते. ते आव्हान होते लोकांच्या पाठिंब्यावर उभ्या राहिलेल्या लोकप्रिय युवकांचे.आक्रमक युवा नेते हार्दिक पटेल पाटीदार आंदोलनातून भाजपविरोधी असंतोषाचा चेहरा बनले होते.अल्पेश ठाकोर ओबीसी समाजातून पुढे आले होते. जिग्नेश मेवाणी यांनी दलित अस्मितेचे स्वतंत्र राजकारण उभे केले होते. छोटूभाई वसावा आदिवासी पट्ट्यात भाजपविरोधी ताकद म्हणून उभे होते. काँग्रेसने या विविध असंतुष्ट सामाजिक समूहांना एकत्र आणण्याचा यशस्वी प्रयत्न केला आणि त्याचा मोठा परिणाम झाला. १८२ सदस्यांच्या गुजरात विधानसभेत भाजपला केवळ ९९ जागांवर समाधान मानावे लागले. काँग्रेसने तगडी झुंज देत ७७ जागांपर्यंत मजल मारली.

काँग्रेसने भाजपला दिलेल्या या झटक्याने, हा पक्ष 'चिंतन मोड'मध्ये गेला. त्यामुळे त्यानंतरची पाच वर्षे अभ्यासण्यासारखी होती. काँग्रेसने दिलेले 'प्रत्युत्तर' भाजपने अगदी मनांवर घेतले. त्याला त्यांनी पुढील म्हणजे,२०२२च्या विधानसभा निवडणुकीत केवळ बहुमताने उत्तर दिले नाही. तर विरोधी पक्षाचं समूळ उच्चाटन करण्याचा प्रयत्न केला. परिणामी,राज्यस्तरीय नेत्यांसह काँग्रेसचे जवळपास वीस प्रभावी आमदार भाजपमध्ये गेले. काँग्रेसचे ताकदवान माजी प्रदेशाध्यक्ष भाजपमध्ये गेले. त्यामुळे जिल्ह्यातालुक्यातील 'राजकीय वजन' असलेली माणसे भाजपमध्ये गेली. त्याच काळात नगरपालिका, महापालिका, जिल्हा पंचायत,तालुका पंचायत,सहकारी संस्था, बाजार समित्या अशा सत्तेच्या तळागाळातील केंद्रांवर भाजपची पकड आणखी मजबूत होत गेली. आणि इथेच भाजपच्या 'गुजरात प्रयोगा'चे खरे सूत्र सापडते.विरोधकाला हरवायचेच,जमेल तेव्हा त्यांचा दारुण पराभव करायचाच. पण विरोधी पक्षांचे भविष्यातील नेतृत्व तयार होऊ नये,यासाठी पक्षाचे दरवाजे उघडे ठेवायचे,एवढे केले तरी, आपली भविष्यातील सत्ता टिकवणे सोपे जाते ...भाजपचा हाच तो यशदायक सत्तामंत्र आहे.

२०१७ मध्ये भाजपला ९९ जागांवर रोखणाऱ्या राजकीय समीकरणाकडे पाहा. हार्दिक पटेल भाजपविरोधात होते,अल्पेश ठाकोर काँग्रेससोबत होते,जिग्नेश मेवाणी काँग्रेससमर्थित होते आणि काँग्रेस ७७ जागांवर पोहोचली होती.पण त्यानंतर, पाच वर्षांनी चित्र एकदम उलटे झाले. सारेच विरोधी आवाज भाजपात सामील झाले. आणि विरोधी मतांमध्ये वाटा मागण्यासाठी,खरेतर विरोधी मतांमध्ये फाटा फोडण्यासाठी केजरीवाल यांचा'आम आदमी' पक्ष मैदानात उतरला होता.त्याचा निकाल २०२२ च्या विधानसभा निकालात असा दिसला... भाजप ९९ वरून थेट १५६ जागांवर गेला. काँग्रेस ७७ वरून १७ वर खाली. भाजपला आव्हान देणाऱ्या आम आदमी पक्षाला जेमतेम पाच जागा. ईकडे भाजपच्या मतांचा वाटा निम्म्याहून अधिक, ५२.५० टक्क्यांवर पोहोचला, काँग्रेस २७.२८ टक्क्यांवर घसरली आणि 'आप'ने १२.९२ टक्के मते मिळवली.

केवळ पाच वर्षांत एवढा मोठा 'उलटफेर' फक्त प्रचाराने होत नाही...त्यामागे प्रचंड राजकीय घडामोडी घडत असतात. जे करण्यात भाजपने सर्वच विरोधी पक्षाच्या नेत्यांना मागे टाकले आहे... या राजकीय बदलाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सर्वांगीण अभ्यास व्हायला पाहिजे,दुर्दैवाने,तसे घडताना दिसत नाही.याआधी काँग्रेसने वर्षानुवर्षे राबवलेली हि सत्तेवर पकड ठेवण्यासाठी तयार केलेली 'सर्वसमावेशक' कार्यपद्धती, आज भाजपच्या माध्यमातून राबविली जातेय.कोणत्याही समाज घटकातील भाजप विरोधी नेता तयार झाला की,त्याला स्थानिक पातळीवर पराभूत करा. आणि शक्य झाले तर,आपल्या बाजूला घ्या. त्याच्यासोबत त्याचे समर्थक येतील, त्याची सामाजिक ताकद येईल, त्याचे स्थानिक नेटवर्क येईल. भाजपने देशभरात वापरलेल्या 'गुजरात मॉडेल'ची हीच खरी कार्यपद्धती आहे. आणि आज महाराष्ट्राकडे पाहताना अस्वस्थ करणारे काही साम्य दिसते.

२०१९ पर्यंत महाराष्ट्रात चार स्वतंत्र राजकीय शक्तिकेंद्रे होती. भाजप, शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस. प्रत्येकाची स्वतंत्र ओळख होती. प्रत्येकाचा स्वतंत्र मतदार होता. प्रत्येकाकडे जिल्ह्याजिल्ह्यांत नेतृत्व होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्रत्येक पक्षाच्या कार्यकर्त्याला एक दिवस आपला पक्ष सत्तेत येऊ शकतो, अशी खात्री किंवा आशा होती.आज तेच २०१९ चे चित्र राजकीय अनिश्चिततेच्या धुक्यात हरवून गेले आहे.गेल्या चार वर्षात,शिवसेना फुटली. राष्ट्रवादी काँग्रेस फुटली.एकनाथ शिंदे शिवसेनेचा,अजित पवार राष्ट्रवादीचा मोठा तुकडा घेऊन भाजपसोबत सत्तेत गेले.काँग्रेसमधूनही अशोक चव्हाणांपासून,युवा आमदार सत्यजित तांबेंपर्यंतचे नेते गेल्या काही वर्षांत सातत्याने बाहेर पडत आहेत.





**गेल्या पाच-सहा वर्षांत महाराष्ट्रातील 'राजकीय नकाशा' इतक्या वेगाने बदलला की, आज घडणारी एकेक घटना वेगळी न पाहता तिच्यामागची सलग प्रक्रिया समजून घेतली पाहिजे. तसे केले, तर महाराष्ट्राच्या राजकारणाचा एक वेगळाच आकृतिबंध पुढे येताना दिसतो.आणि तो पाहताना गुजरातची आठवण झाल्याशिवाय राहत नाही.**

परिणामी,भाजपशी निकराची लढाई देईल,असा पक्ष आज राज्यात दिसत नाही. खरेतर २०२४ च्या विधानसभा निवडणुकीने, या महाराष्ट्रातील बदलत्या राजकीय चित्रावर बहुमताने शिक्कामोर्तब केले होते. त्यावेळी भाजपने १३२ जागा जिंकल्या. शिंदे यांच्या शिवसेनेने ५७, स्व अजित पवारांच्या राष्ट्रवादीने ४१. दुसऱ्या बाजूला उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला २०, काँग्रेसला १६ आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीला फक्त १० जागा मिळाल्या.हे फक्त महायुतीचे बहुमत नव्हते, ते महाराष्ट्राच्या पारंपरिक राजकीय शक्तिसंतुलनाचे आजवरचे सर्वात मोठे स्थित्यंतर ठरले होते.म्हणूनच, एकनाथ शिंदे यांच्या परवाच्या दिल्ली दौऱ्याकडे, केवळ नियमित प्रशासकीय भेट, म्हणून पाहून चालणार नाही.पंतप्रधान मोदी यांनी त्यांच्या खासदारांना 'भिऊ नका,आम्ही तुमच्या पाठीशी आहोत' असा दिलासा दिल्याचे सांगितले जाते. उद्धव ठाकरे यांनी त्यावर अत्यंत आक्रमक प्रतिक्रिया दिली. सर्वोच्च न्यायालयात पक्षफुटीशी संबंधित प्रश्न प्रलंबित असताना असा संदेश नेमका कुणासाठी आहे, असा त्यांचा सवाल आहे.

उद्या सर्वोच्च न्यायालयाचा निकाल नेमका काय असेल, त्याचे राजकीय परिणाम काय असतील, हे आज सांगता येणार नाही. प्रतिकूल निकाल लागला म्हणजे शिंदे यांच्या पक्षाला भाजपमध्ये विलीन होण्याशिवाय दुसरा मार्गच उरणार नाही, असेही आज म्हणता येणार नाही.पण एक गोष्ट मात्र स्पष्ट आहे. शिंदेसेनेचे स्वतंत्र अस्तित्व जितके अस्थिर होईल, तितके त्यांचे भाजपवरील राजकीय अवलंबित्व वाढेल.म्हणुनच कदाचित, या ठिकाणी गुजरातचा संदर्भ पुन्हा महत्त्वाचा ठरतो.गुजरातमध्ये भाजपने काँग्रेस संपविण्याची घोषणा केली नाही. पण त्यांच्या प्रभावी नेतृत्वाला एकामागोमाग एक करून आपल्या राजकीय कक्षेत आणले. आपल्यात सामावून घेतले.काँग्रेसचा एक आमदार फोडणे, या एका कृतीने, प्रतिस्पर्ध्याने वर्षानुवर्षे तयार केलेले 'राजकीय भांडवल' सत्ताधारी पक्षाच्या खात्यात जमा होत गेले.

महाराष्ट्रात तर भाजपने त्याहून अधिक सूक्ष्म पद्धत वापरली आहे. एकनाथ शिंदे भाजपमध्ये गेले नाहीत. त्यांनी सेना फोडली, पण त्यांची शिवसेना भाजपच्या नेतृत्वाखालील सत्ताव्यवस्थेचा भाग झाली. अजित पवार भाजपमध्ये गेले नाहीत. पण राष्ट्रवादीचा मोठा गट घेऊन भाजपच्या सत्ताकक्षेत आले. म्हणजे पक्ष पूर्णपणे गिळण्याची, त्यासाठी मेहनत करण्याची गरजच उरली नाही .त्याच वेळी या महायुतीत सामील झालेल्या पक्षांची ताकद भाजपच्या बाजूला उभी राहिली. भाजपचा राजकीय उद्देश साध्य झाला . अशा पद्धतीने, भाजपने महाराष्ट्रात 'राजकीय स्थलांतर' अधिक सोपे केले.पण तरीही महाराष्ट्रात हा 'सत्ता खेळ' सोपा राहिलेला नाही.कारण शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे केवळ राजकीय पक्ष नव्हते. ते ग्रामीण आणि शहरी भागातील 'नेतृत्व तयार करणारे कारखाने' होते. शिवसेनेच्या शाखेतून शाखाप्रमुख तयार झाला, नगरसेवक झाला, आमदार झाला, खासदार झाला.राष्ट्रवादी आणि काँग्रेसच्या सहकारी संस्थांमधून, साखर कारखान्यांतून, दूध संघांतून, जिल्हा बँकांतून, बाजार समित्यांतून तालुका आणि जिल्हास्तरीय नेतृत्व तयार झाले.महाराष्ट्राचे अनेक मुख्यमंत्री, मंत्री आणि मोठे नेते या राजकीय साखळीतून आले आहेत.

उद्या जर महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, सहकारी बँका, साखर कारखाने, दूध संघ, बाजार समित्या, अशा या प्रत्येक पायरीवर सत्ताधारी आघाडीचे वर्चस्व वाढत गेले, तर दहा वर्षांनी विरोधी पक्षाकडे आमदार होऊ शकतील अशी नवी माणसे उरणार नाहीत.गुजरातमध्ये अशाच पद्धतीने नेतृत्वनिर्मितीची साखळी खंडित झाली. ज्याची पुनरावृत्ती महाराष्ट्रात होऊ घातली आहे.

गुजरातमध्ये २०१३ पासून सुरु झालेल्या या राजकीय स्थित्यंतराच्या टप्प्यांचा अभ्यास करताना एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी. ती म्हणजे, मोदी जी दिल्लीला गेले, पण ते गुजरातच्या राजकारणातून कधी बाजूला गेले नाहीत. आनंदीबेन पटेल आल्या, विजय रुपाणी आले, भूपेंद्र पटेल आले; पण मोदींच्या तोडीचे स्वतंत्र राज्यव्यापी शक्तिकेंद्र भाजपमध्ये उभे राहिले नाही. त्याचप्रमाणे विरोधी पक्षातही राज्यस्तरीय नेतृत्व उभे राहिले नाही . मुख्यमंत्री बदलले. मात्र, राज्यात,'ब्रँड मोदी' कायम राहिला.

महाराष्ट्रात राजकीय परिस्थिती अधिक गुंतागुंतीची आहे. मुख्यमंत्री या नात्याने, देवेंद्र फडणवीस यांनी आपले राज्यव्यापी नेतृत्व सिद्ध केले आहे. त्यांच्या सोबतच्या एकनाथ शिंदे यांना स्वतंत्र सामाजिक आणि संघटनात्मक आधार आहे. स्व अजित पवार यांच्या पक्षाचेही पश्चिम महाराष्ट्रासह अनेक भागांत राजकीय वजन आहे. महाराष्ट्राचा प्रचंड भौगोलिक विस्तार, मराठा-ओबीसी समीकरण, आरक्षणाचे राजकारण, विदर्भाची वेगळी राजकीय मानसिकता, पश्चिम महाराष्ट्रातील सहकार, मराठवाड्याचे स्थानिक प्रश्न, मुंबई-कोकणातील शिवसेनेची ताकद , हे सारे गुजरातपेक्षा वेगळे आहे.म्हणून आजच महाराष्ट्र 'गुजरात झाला' असे आजच म्हणणे अतिशयोक्ती ठरेल.

विरोधी पक्षाच्या आघाडीचे उद्धव ठाकरे, शरद पवारांसारखे नेते अजूनही मोठ्या जनसमूहाला आकर्षित करू शकतात.काँग्रेसकडे अजूनही राज्यातील काही विभागांत परंपरागत जनाधार आहे.आणि मुख्य म्हणजे, महाराष्ट्राची अस्मिता आणि मानसिकता, दिल्लीने तयार केलेल्या चौकटी सहज स्वीकारणारी नाही. पार अगदी संयुक्त महाराष्ट्र आंदोलनापासून शेतकरी चळवळीपर्यंत आणि शिवसेनेच्या उदयापासून शरद पवारांच्या बंडापर्यंत, अगदी अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन आणि अभिजीत दीपके यांच्या विद्यार्थी आंदोलनापर्यंत आपण पाहिले तर, महाराष्ट्राने वेळोवेळी स्वतःचे स्वतंत्र राजकारण निर्माण केले आहे, हे लक्षात येते.

या सर्व पार्श्वभूमीवर खरा प्रश्न वेगळा आहे. गुजरातमध्येही २०१७ मध्ये हार्दिक पटेल भाजप विरोधात होते, त्यांच्यासोबत अल्पेश ठाकोर, जिग्नेश मेवाणी दिसत होते. भाजपसमोर समाजाच्या सर्व थरातून नवे नेतृत्व उभे राहत असल्याचा तो भास होता.हार्दिक,अल्पेश पुढे भाजपमध्ये गेले. काँग्रेसमधील प्रभावी नेत्यांची रांग भाजपकडे वळली. आणि अखेर विरोधी पक्ष उरला. पण राज्याची सत्ता बदलू शकेल, असा राज्यव्यापी चेहरा उरला नाही.शेजारच्या गुजरातमधील हा धडा, महाराष्ट्रासाठी एक खूप काही सांगून जातो.

दिल्लीत आज कोण कुणाला भेटते,यावरून उद्याचे विलिनीकरण निश्चित होते, असे म्हणणे राजकीय अतिशयोक्ती ठरेल. पण त्या भेटींच्या पलीकडे चाललेली प्रक्रिया पाहिली पाहिजे. पक्षांतरे कुठे होत आहेत? स्थानिक सत्ताकेंद्रे कुणाकडे जात आहेत? नवे नेतृत्व कुठे तयार होत आहे? विरोधी पक्षातील तरुणाला स्वतःचे राजकीय भविष्य कुठे दिसते?या आजच्या प्रश्नांची उत्तरे, महाराष्ट्राचा उद्याचा राजकीय नकाशा ठरवतील.आणि त्यामुळे शेवटी जेव्हा मतदारालाच प्रश्न पडेल की, 'मी विरोधी पक्षाचा उमेदवार निवडून दिला, तरी उद्या तो त्याच पक्षात राहणार आहे याची खात्री काय...?'हा प्रश्न ज्या दिवशी महाराष्ट्रामधील मतदाराच्या मनात येईल, त्या दिवशी महाराष्ट्राची गुजरातप्रमाणे 'विरोधकमुक्त' राजकारणाच्या दिशेने वाटचाल पूर्ण झालेली असेल.कारण गुजरातने एक गोष्ट निर्विवादपणे शिकवली आहे.

'लोकशाही प्रक्रियेत सत्ताधारी पक्ष विरोधकांना संपवण्याचा प्रयत्न करत राहतो ... राज्यात तसा आरोप भाजपावर अनेकदा केला जातो. पण, प्रत्यक्षात, ज्याक्षणी विरोधातील पक्ष स्वतःचा पुढचा नेता निर्माण करू शकत नाहीत, तिथूनच त्यांचा राजकीय अस्त सुरू होतो.'महाराष्ट्रातील विरोधी पक्षांनी, त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या विचारवंतांनी,हा धडा आज समजून घेतला नाही, तर उद्या राज्यात विरोधी पक्ष असतील, त्यांच्या कार्यालयांवर झेंडेही असतील, विधानसभेत विरोधी बाकांवर काही आमदार बसलेलेही असतील, सरकारविरोधात पत्रकार परिषदाही होतील.पण प्रत्यक्ष सत्ता बदलण्याची क्षमता असलेला विरोधक उरणार नाही. हे निरोगी लोकशाहीसाठी चांगले लक्षण नाही.

**महेश म्हात्रे**
संपादक - संचालक महाराष्ट्र रिसर्च सेंटर

# चीनच्या AI प्रयोगांमधून भारताने काय शिकले पाहिजे?

**चीनने प्रगत चिप्सशिवाय,फक्त हुशारीने आणि जिद्दीने AI मध्ये सुपरपॉवर बनण्याचा मार्ग शोधला. पाच भागांच्या या लेखमालेचा हा शेवटचा भाग यातून भारताने,आणि आपल्या तरुण पिढीने, नेमके काय शिकायला हवे?आपले उत्तर आपण कसे द्यायचे.**

मागच्या भागात आपण बघितले चीनने AI साठी लागणारी कॉम्प्युटिंग पॉवर, वीज किंवा पाण्यासारखी एक पब्लिक सुविधा बनवली.चिप्स नाहीत, तर स्वतःचे बनवले. जुने तंत्रज्ञान होते,तर ते हुशारीने वापरले. आणि मग या सगळ्याला जोडणारे एक देशव्यापी जाळे उभे केले. पण या पूर्ण प्रवासामागे एक साधा,खोल विचार आहे आणि तो समजला की चीनने जे केले ते 'एका देशाची यशोगाथा' न राहता, प्रत्येक देशासाठी अगदी भारतासाठीही एक धडा बनतो.


पहिला धडा-तुमचे AI तुमच्याच हातात असायला हवे..

कल्पना करा,तुमच्या घरातले पाणी, वीज, अन्न सगळे दुसऱ्या देशावर अवलंबून आहे.आज ते देतायत म्हणून सगळे व्यवस्थित चालले.पण उद्या त्या देशाने काही राजकीय कारणावरून 'आता आम्ही देणार नाही' असे ठरवले,तर?तुमचे अख्खे आयुष्य ठप्प होईल.

AI च्या बाबतीत आज बरोबर हीच परिस्थिती अनेक देशांची आहे. त्यांचे हॉस्पिटल्स, बँका,सरकारी यंत्रणा सगळे परदेशी बनवलेल्या AI मॉडेल्सवर चालते.ते मॉडेल्स कोण चालवते, त्याचा डेटा कुठे जातो, उद्या ती सेवा बंद झाली किंवा महाग झाली तर काय यावर त्या देशाचे काहीच नियंत्रण नाही.

याला म्हणतात `Sovereign AI' म्हणजे स्वतःच्या देशाचे, स्वतःच्या भाषेत,स्वतःच्या गरजांसाठी बनवलेले आणि स्वतःच्या ताब्यात असलेले AI चीनने हेच सुरुवातीपासून ओळखले. चिप्सवरच्या बंदीने त्यांना हे लवकर शिकवले, इतकेच.

दुसरा धडा-नुसते क चांगले मॉडेल पुरेसं नाही, AI साठी संपूर्ण व्यवस्था (infrastructure) लागते. मागच्या भागांमध्ये आपण चीनच्या ज्या गोष्टी बघितल्या स्वतःचे चिप्स, DeepSeek चा जुगाड, आणि देशव्यापी कॉम्प्युटिंग नेटवर्क या तिन्ही गोष्टी वेगळ्या वाटत असल्या, तरी त्या एकाच मोठ्या रणनीतीचे भाग आहेत.एकट्या हुशार इंजिनियरने एक भारी AI मॉडेल बनवणं हे कौतुकास्पद आहे, पण त्याने देश AI सुपरपॉवर बनत नाही. त्यासाठी लागते एक संपूर्ण साखळी वीज हवी, चिप्स हव्यात, ती चालवायला स्वस्त आणि विश्वासार्ह कॉम्प्युटिंग सुविधा हवी, त्यावर संशोधन करणारी हुशार माणसे हवीत, आणि या सगळ्याला चालना देणारा डेटा हवा.चीनने नेमके हेच केले एका ठिकाणी नाही, तर या संपूर्ण साखळीत गुंतवणूक केली. हीच खरी 'national strategic infrastructure' ची कल्पना जसे एखादा देश रस्ते, रेल्वे, बंदरे बांधतो कारण त्याशिवाय व्यापारच होऊ




शकत नाही.तसंच AI साठी लागणारी मूलभूत सुविधा (energy, efÛehme, cloud, data) हे आता रस्ते-रेल्वेइतकंच महत्त्वाचे झालेय.

भाग ५

तिसरा धडा-ही सुविधा फक्त मोठ्या कंपन्यांसाठी नाही, ती छोट्या स्टार्टअप्ससाठीही असायला हवी.आणि इथे चीनने सगळ्यात हुशारीचे काम केले.त्यांनी ही सगळी सुविधा फक्त मोठ्या टेक कंपन्यांपुरती मर्यादित ठेवली नाही. जर कॉम्प्युटिंग पॉवर फक्त काही मोजक्या श्रीमंत कंपन्यांनाच परवडत असेल, तर नवीन कल्पना असलेला एखादा तरुण, एखादी छोटी टीम, कधीच त्या स्पर्धेत उतरूच शकणार नाही. मोठे भांडवल नसेल तर दार आधीच बंद.म्हणून चीनने ही सुविधा वीज-पाण्यासारखी 'pay per use' पद्धतीने खुली केली. याचा अर्थ असा की आज हैनानमधल्या एखाद्या छोट्या गावातला तरुण इंजिनियर, आणि शांघायमधली मोठी कंपनी दोघांनाही तेवढीच कॉम्प्युटिंग पॉवर तेवढ्याच किमतीत उपलब्ध आहे. गरज तितकाच खर्च, आणि मोठी सुरुवातीची गुंतवणूक करायची गरजच नाही.

याचा परिणाम काय झाला? हजारो छोटे स्टार्टअप्स, विद्यापीठातले संशोधक, अगदी वैयक्तिक डेव्हलपर्ससुद्धा कमी खर्चात AI वर प्रयोग करू शकतायत, नवीन apps बनवू शकतायत,आणि जगाला दाखवून देतायत की चांगली कल्पना असेल, तर मोठे भांडवल नसतानाही पुढे जाता येते.

शेवटी-आता प्रश्न आपला आहे.भारताने आणि इतर देशांनी ह्यातून काय घ्यायचे?आपली स्वतःची AI क्षमता उभी करायची, की कायमची दुसऱ्यावर अवलंबून राहायचे? फक्त मोठ्या कंपन्यांना संधी द्यायची, की आपल्या तरुण मुला-मुलींना, छोट्या गावातल्या इंजिनियर्सनासुद्धा स्वस्तात संधी मिळेल अशी व्यवस्था उभी करायची?

चीनने त्यांचे उत्तर दिले. आपण आपले शोधले पाहिजे.आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षित युवक आहेत. अत्यंत उत्साही, कल्पक आणि प्रचंड ऊर्जा असलेले entrepreneurs आहेत. स्वतःचे सार्वभौम AI असण्याची आणि त्यासाठी लागणारी ecosystem निर्माण करण्याची व्हिजन आणि राजकीय इच्छाशक्ती आपल्याकडे असेल आणि ती इच्छाशक्ती प्रत्यक्ष चिप्स, ऊर्जा आणि कॉम्प्युटिंग नेटवर्कमधल्या ठोस गुंतवणुकीत रूपांतरित झाली तर आपणही AI महासत्ता बनण्याच्या स्पर्धेत पुढे जाऊ शकू.ते घडावे ही मनोमन इच्छा!

- प्रसाद शिरगावकर

मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# कुंपणानेच खाल्ले शेत!

## ५०० महिलांच्या रोजगाराचे उभारलेले धामणगाव देव चे गारमेंट क्लस्टर काही महिन्यांतच बंद

**✦जनमाध्यम | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. १० :** महिलांच्या हाताला काम, घराला आधार आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देण्याच्या गोंडस उद्देशाने उभारलेले धामणगाव देव येथील गारमेंट क्लस्टर काही महिन्यांतच बंद पडल्याने शासनाच्या महिला सक्षमीकरणाच्या योजनांच्या अंमलबजावणीचे अक्षरशः धिंडवडे निघाल्याची चर्चा सुरू झाली आहे. तब्बल ५०० महिलांना रोजगार देण्याचे स्वप्न दाखविणाऱ्या या प्रकल्पासाठी कोट्यवधींचा निधी खर्च झाला. यंत्रणा उभी राहिली, उद्घाटन झाले, अपेक्षा निर्माण झाल्या. मात्र, रोजगाराचे चाक फिरण्याआधीच प्रकल्पाचे चाक थांबले. त्यामुळे 'निधी खर्च झाला, पण महिलांच्या हाताला काम कुठे गेले?' हा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे. दारव्हा तालुक्यातील धामणगाव देव येथे जिल्हा वार्षिक योजना तसेच महिला व बालविकास विभागाच्या तीन टक्के निधीतून हा गारमेंट क्लस्टर उभारण्यात आला. ग्रामीण महिलांना प्रशिक्षण देऊन त्यांना प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रियेत सहभागी करून रोजगाराचे कायमस्वरूपी साधन उपलब्ध करून देण्याचा त्यामागील हेतू होता. पालकमंत्री संजय राठोड यांच्या संकल्पनेतून या प्रकल्पाला चालना मिळाल्याचे सांगण्यात आले होते. त्यामुळे परिसरातील महिलांच्या अपेक्षा मोठ्या होत्या. मात्र उद्घाटनानंतर काही महिन्यांतच या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला घरघर लागल्याचे समोर आले.

क्लस्टर चालविणाऱ्या कंपनीला शासनाकडून मिळणारी विविध देयके आणि बिले वेळेवर मिळाली नसल्याचा दावा करण्यात येत आहे. त्यातच महिला आर्थिक विकास महामंडळातील तत्कालीन अधिकारी आणि त्यांच्या निकटवर्तीय लेखाधिकाऱ्याकडून देयके मंजूर करण्यासाठी कथितरीत्या 'टक्केवारी'ची मागणी होत असल्याचा गंभीर आरोप संबंधितांकडून करण्यात आला आहे. या कथित मागणीमुळे कंपनी आर्थिक कोंडीत सापडल्याचे सांगण्यात येते. कंपनीने सुरुवातीला स्वतःच्या पातळीवर निधी उभा करून क्लस्टर सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला. मात्र, शासना कडील देयके रखडत गेल्याने आर्थिक भार वाढत गेला आणि अखेर उत्पादन व्यवस्था बंद करण्याची वेळ आल्याचा दावा आहे. या प्रकरणाला आणखी गंभीर वळण देणारा दावा म्हणजे संबंधित अधिकाऱ्याने एका नामांकित ज्यूस सेंटरमध्ये कंपनीच्या प्रतिनिधींकडून कथितरीत्या पैसे स्वीकारल्याचा व्हिडिओ तयार करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. या कथित व्हिडिओवरून संबंधितांमध्ये वाद निर्माण झाला होता. पत्रकार परिषदेत हा व्हिडिओ सादर करण्याची तयारी झाल्याचेही सूत्रांचे म्हणणे आहे. त्यानंतर कथितरीत्या स्वीकारलेली रक्कम परत करण्यात आल्याचा दावाही करण्यात आला आहे. मात्र, या आर्थिक व्यवहाराच्या आरोपांची किंवा कथित व्हिडिओची अधिकृत स्वतंत्र पुष्टी झालेली नाही. त्यामुळे आरोपांमागील सत्यता तपासण्यासाठी सक्षम आणि निष्पक्ष यंत्रणेमार्फत चौकशी होणे अत्यावश्यक आहे. दरम्यान, प्रश्न केवळ धामणगाव देवच्या क्लस्टरपुरता मर्यादित राहिलेला नाही. दिग्रस आणि नेर तालुक्यातील गारमेंट क्लस्टरचीही सद्यस्थिती तपासण्याची मागणी होत आहे. महिला सक्षमीकरणाच्या नावाखाली उभारलेल्या या प्रकल्पांवर किती कोटी रुपये खर्च झाले? किती महिलांना प्रशिक्षण मिळाले? प्रत्यक्ष किती महिलांना रोजगार मिळाला? कंपन्यांना किती देयके अदा करण्यात आली? किती देयके आजही प्रलंबित आहेत? प्रकल्प बंद पडण्यामागे नेमकी कारणे कोणती? या प्रश्नांची उत्तरे महामंडळाने सार्वजनिक करण्याची वेळ आली आहे. चौकशीची कात्री चालली तर निधीपासून देयकांपर्यंत आणि निर्णयापासून कथित आर्थिक व्यवहारांपर्यंत अनेक धागे उलगडण्याची शक्यता आहे. निविदा प्रक्रिया, कंपनीची निवड, मंजूर निधी, प्रत्यक्ष खर्च, बिले, देयके, अधिकाऱ्यांच्या नोंदी, महिलांचे प्रशिक्षण, रोजगाराची संख्या आणि प्रकल्प बंद होण्याची कारणे यांची स्वतंत्र तपासणी झाल्यास वस्तुस्थिती समोर येऊ शकते. महिलांना स्वावलंबी करण्यासाठी शासन कोट्यवधी रुपये खर्च करीत असताना प्रत्यक्ष रोजगारनिर्मितीची यंत्रणाच काही महिन्यांत ठप्प होत असेल, तर ही केवळ एका कंपनीची आर्थिक अडचण नसून महिला सक्षमीकरणाच्या संपूर्ण योजनेच्या अंमलबजावणीवरच प्रश्नचिन्ह आहे. ५०० महिलांच्या डोळ्यांत रोजगाराचे स्वप्न दाखवून उभारलेला हा प्रकल्प नेमका कुणाच्या चुकीमुळे बंद पडला? देयके का रखडली? कथित 'टक्केवारी'चा तगादा खरोखर झाला का? आणि कोट्यवधींच्या निधीतून उभी राहिलेली यंत्रणा महिलांच्या हाताला काम देण्याआधीच का कोलमडली? या प्रश्नांची उत्तरे आता कागदोपत्री नव्हे, तर निष्पक्ष चौकशीतून मिळणे गरजेचे आहे.

पुढील भागासाठी 'ई-रिक्षा योजनेतील कथित घोळ'

# आदिवासी दिनी 'सावित्रीच्या लेकीं'चे शासनाला साकडे



**✦जनमाध्यम | प्रतिनिधी**

**यवतमाळ , दि. १० :** पारधी समाजातील मुलींच्या शिक्षणासाठी कार्यरत असलेल्या 'आम्ही साऱ्या सावित्रीच्या लेकी – शैक्षणिक आश्रयालय, वाघाडी' येथे जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी क्रांतिकारक भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून जल, जंगल आणि जमीन तसेच आदिवासी हक्कांच्या संघर्षाला उजाळा देण्यात आला.

यावेळी ज्योती केने यांनी 'सावित्रीच्या लेकीं'शी संवाद साधत शिक्षण, आत्मविश्वास, स्वाभिमान आणि हक्कांची जाणीव याबाबत मार्गदर्शन केले. संस्थेचे सचिव ईसु माळवे व अधीक्षिका पपीता ईसु माळवे यांनी आश्रयालयाच्या अडचणी मांडताना आदिवासी मुलींच्या शिक्षणासाठी उभारलेल्या आश्रयालयालाच अद्याप हक्काची आणि कायमस्वरूपी जागा मिळालेली नसल्याची खंत व्यक्त केली. आम्हालाही सुरक्षित निवारा आणि शिक्षणाचा अधिकार आहे. शासनाने आश्रयालयाला हक्काची जागा द्यावी,अशी मागणी यावेळी करण्यात आली. बिरसा मुंडांचे विचार केवळ पूजनापुरते न ठेवता आदिवासी मुलींच्या भवितव्यासाठी कृती करण्याचा निर्धार करण्यात आला.

# आठ वर्षांपासून कर्जमाफीच्या प्रतीक्षेत २,५०० शेतकरी..!

## दिग्रस मध्ये मनसेचा तहसीलवर धडक मोर्चा

**✦जनमाध्यम | प्रतिनिधी**



**दिग्रस,, दि. १० :** शासनाच्या कर्जमाफी योजनांचा लाभ न मिळाल्याने दिग्रस तालुक्यातील सुमारे २ हजार ते २ हजार ५०० शेतकरी मागील आठ वर्षांपासून कर्जाच्या ओझ्या खाली असल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केला आहे. या वंचित शेतकऱ्यांना तातडीने न्याय मिळावा, या मागणीसाठी मनसेच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

मनसे कृषी जिल्हा उपाध्यक्ष गजानन खांदवे व जिल्हा उपाध्यक्ष दिनेश सुकाडे यांच्या स्वाक्षरीचे हे निवेदन तहसील कार्यालयात सादर करण्यात आले. २०१६ ते २०१८ दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना तसेच महात्मा ज्योतिबा फुले शेतकरी कर्जमाफी योजनेत तालुक्यातील अनेक शेतकरी वंचित राहिल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. २०१९ मध्ये सरसकट कर्जमाफी जाहीर होऊनही संबंधित शेतकऱ्यांना लाभ मिळाला नसल्याने त्यांच्यावर अन्याय झाल्याचा आरोप मनसेने केला. २०२६ मध्ये प्रस्तावित पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर कर्जमाफी योजनेत या सर्व शेतकऱ्यांचा समावेश करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही मनसेने दिला आहे.

# आदिवासी विद्यार्थ्यांचा आवाज दाबू नका..!

## ५ ऑगस्टच्या शासन निर्णयाविरोधात बिरसा ब्रिगेड आक्रमक

**✦जनमाध्यम | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि. १० :** आदिवासी विकास विभागाने ५ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयातील काही तरतुदी आदिवासी विद्यार्थ्यांच्या मूलभूत व संविधानिक अधिकारांवर गदा आणणाऱ्या असल्याचा आरोप करीत बिरसा ब्रिगेड, यवतमाळने राज्यपाल, मुख्यमंत्री, आदिवासी विकास मंत्री व विभागाच्या सचिवांकडे निवेदन सादर केले आहे. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत दिलेल्या या निवेदनातून संबंधित जाचक तरतुदी तात्काळ स्थगित अथवा रद्द करण्याची ठाम मागणी करण्यात आली आहे. शासन निर्णयात विद्यार्थ्यांच्या आंदोलनातील सहभागावर, संघटनात्मक सहभागावर तसेच प्रसारमाध्यमे व पत्रकारांशी संवाद साधण्यावर निर्बंध असल्याचा दावा बिरसा ब्रिगेडने केला आहे. विद्यार्थ्यांच्या आश्रमशाळा व वसतिगृहांमध्ये पालकांव्यतिरिक्त इतरांच्या प्रवेशासंबंधी निर्बंध, भोजन कक्ष व स्वयंपाकगृहातील प्रवेशाच्या अटी आणि वसतिगृह प्रवेशासाठी निश्चित करण्यात आलेली कमाल वयोमर्यादाही अन्यायकारक असल्याचे निवेदनात म्हटले आहे. एका अभ्यासक्रमातून दुसऱ्या अभ्यासक्रमात किंवा एका फॅकल्टीमधून दुसऱ्या फॅकल्टीमध्ये प्रवेश घेतल्यास पूर्वीचा शासकीय लाभ परत केल्यानंतरच वसतिगृहासाठी पात्रता राहण्याची अटही मागे घेण्याची मागणी करण्यात आली आहे. अभ्यासक्रम बदलणे हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाचा भाग असून, त्यासाठी वसतिगृहाची सुविधा हिरावून घेऊ नये, अशी भूमिका संघटनेने मांडली. विद्यार्थ्यांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र निवारण यंत्रणा, विद्यार्थी-पालक संवाद समित्या आणि संविधान व लोकशाही मूल्यांवरील मार्गदर्शन कार्यक्रम सुरू करण्याची मागणीही करण्यात आली आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना गप्प करणारे नव्हे, तर घडवणारे शिक्षण महाराष्ट्राला हवे, असा टोकदार संदेश देत शासनाने संघर्षा ऐवजी संवादातून या निर्णयाचा पुनर्विचार करावा, असे बिरसा ब्रिगेडने म्हटले आहे.

# थोडक्यात



## झरी-जामणीत जागतिक आदिवासी दिन उत्साहात

**जल, जंगल, जमीन आणि संस्कृतीच्या संवर्धनाचा निर्धार..!**

**झरी-जामणी :** जागतिक आदिवासी दिनानिमित्त झरी-जामणी तालुक्यात आदिवासी समाजाच्या वतीने विविध ठिकाणी उत्साहात कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. तालुक्याच्या ठिकाणी आदिवासी बांधव मोठ्या संख्येने एकत्र येत आदिवासी अस्मिता, हक्क, संस्कृती आणि परंपरा जपण्याचा निर्धार केला. झरी-जामणीसह माथार्जुन व शिबला येथील आश्रमशाळांमध्ये ही जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा, नृत्य, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध सादरीकरणांतून आदिवासी समाजाच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडविले.

यावेळी आदिवासी समाजाच्या शिक्षण, रोजगार, सामाजिक प्रगती आणि आर्थिक विकासावर मार्गदर्शन करण्यात आले. बदलत्या काळात शिक्षणाला बळ देतानाच जल, जंगल, जमीन आणि सांस्कृतिक वारशाचे संरक्षण करण्याचे आवाहन करण्यात आले.

विविध गावांतून आलेल्या आदिवासी बांधवांच्या सहभागामुळे कार्यक्रमाला एकतेचे स्वरूप प्राप्त झाले. संस्कृतीचे जतन आणि विकासाची वाटचाल, हाच आदिवासी समाजाच्या सशक्त भविष्यासाठी संदेश यानिमित्ताने देण्यात आला.



## 'एक तीर, एक कमान'च्या घोषणांनी पुसद दुमदुमले..! आदिवासी एकजुटीचा जागर

**पुसद :** क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा चौकात ९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी गौरव दिन उत्साहात आणि पारंपरिक जल्लोषात साजरा करण्यात आला. 'आदिवासी गौरव दिन चिरायू होवो''बिरसा मुंडा अमर रहे','एक तीर, एक कमान, सारे आदिवासी एक समान' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद व भारतीय आदिवासी पँथर संघटनेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात आदिवासी संस्कृती, सामाजिक हक्क आणि आर्थिक विकासाच्या प्रश्नांवर प्रकाश टाकण्यात आला. ॲड. सुनील ढाले यांनी आदिवासी समाजाच्या प्रश्नांसाठी संघटितपणे आवाज उठविण्याचे आवाहन केले.

अध्यक्षस्थानी रामकृष्ण चौधरी होते. माधवराव वैद्य यांच्या हस्ते उद्घाटन झाले. प्रा. नरेंद्र जाधव यांनी सर्व आदिवासी संघटनांनी समाजहितासाठी एका झेंड्याखाली एकत्र येण्याची गरज व्यक्त केली. सुरेश धनवे यांनी शिक्षणक्रांतीला सर्वोच्च प्राधान्य देत जनगणनेच्या पार्श्वभूमीवर संघटित पुढाकाराचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी पारंपरिक लोकगीत व सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

# सात दिवसांत नियुक्तीचे लेखी आश्वासन..!

## पूजा भांडवले यांचे सहकुटुंब आमरण उपोषण अखेर मागे

**✦जनमाध्यम | प्रतिनिधी**




**यवतमाळ, दि. १० :** महागाव तालुक्यातील राहूर येथील पूजा अनिल भांडवले यांच्या अंशकालीन स्त्री परिचर पदावरील नियुक्तीचा प्रश्न अखेर प्रशासनाच्या दारी पोहोचलेल्या आंदोलनामुळे चर्चेत आला आहे. नियुक्तीच्या मागणीसाठी जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयासमोर सहकुटुंब आमरण उपोषणाला बसलेल्या पूजा भांडवले यांच्या आंदोलनाची अखेर प्रशासनाने दखल घेतली.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले यांनी सात दिवसांच्या आत नियुक्तीची कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर भांडवले यांनी उपोषण मागे घेतले. पूजा भांडवले यांच्या नियुक्तीचा प्रश्न गेल्या काही दिवसांपासून प्रलंबित होता. राहूर ग्रामपंचायतीच्या ठरावानुसार संबंधित पदासाठी उमेदवारांची पात्रता तपासून नियमानुसार नियुक्ती प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले होते. मात्र, आपल्या हक्काच्या नियुक्तीसाठी पूजा भांडवले यांनी कुटुंबासह आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारला. प्रशासनाकडून सुरुवातीला आंदोलनाची अपेक्षित गांभीर्याने दखल घेतली जात नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. दरम्यान, मातंग समाजातील विविध कार्यकर्ते आणि सामाजिक नेत्यांनी एकजूट दाखवत प्रशासनावर पाठपुराव्याचा दबाव वाढविला. माजी आमदार नामदेवराव ससाने, प्रा. संजय वानखडे (विदर्भ मातंग समाज संघटना), मनोज रणखांब (अण्णाभाऊ साठे स्मारक समिती), अरविंद वानखडे, पंडित वानखडे, गणेश भांडवले, गोविंदराव वानखडे, ज्ञानेश्वर डोंगरे, दिलीप तेलंग, विशाल तेलंग, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते देवीदास महाले, सचिन मनवर तसेच शेतकरी नेते प्रा. पंढरी पाटे यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. राहूर ग्रामपंचायतीचे दिलीप जाधव तसेच ग्रामस्थांनीही आंदोलनादरम्यान पूजा भांडवले आणि त्यांच्या कुटुंबीयांना सहकार्य केले. संबंधित पदासाठी पूजा भांडवले या पात्र उमेदवार असल्याचा दावा त्यांच्या समर्थकांकडून करण्यात आला आहे. अखेर जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले यांनी उपोषणस्थळी भेट देऊन सात दिवसांच्या आत अंशकालीन स्त्री परिचर पदावरील नियुक्तीची कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासन दिले. या आश्वासनानंतर पूजा भांडवले यांनी आमरण उपोषण मागे घेतले. या निर्णयामुळे भांडवले कुटुंबाला तूर्त दिलासा मिळाला असला, तरी आता खरा प्रश्न प्रशासन आपल्या लेखी आश्वासनाची अंमलबजावणी किती गांभीर्याने करते, हा आहे. सात दिवसांची मुदत संपण्यापूर्वी नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण होते की पुन्हा आश्वासनांचीच पुनरावृत्ती होते, याकडे राहूरसह संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. मातंग समाजाच्या एकजुटीच्या पाठपुराव्यामुळे आंदोलनाला तूर्त यश मिळाले असले, तरी अंतिम न्याय नियुक्ती आदेश हातात पडल्यानंतरच मिळाल्याचे मानले जाणार आहे.

# आधी ग्रामसभा, मग RTI अन् आठवड्यातच पुन्हा विशेष ग्रामसभा

**✦जनमाध्यम | प्रतिनिधी**

**पांढरकवडा, दि. १० :** बोरगाव ग्रामपंचायतीच्या ग्रामसभा आयोजनासह GPDP आणि १६ व्या वित्त आयोगाच्या प्रक्रियेवर ग्रामस्थांकडून प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. ३ ऑगस्ट रोजी ग्रामसभा झाल्याचे समोर आले असताना, या सभेची पूर्वसूचना अनेक ग्रामस्थांना देण्यात आली नसल्याचा दावा करण्यात आला आहे.

त्यानंतर ग्रामसभेची माहिती व कागदपत्रे मिळविण्यासाठी माहितीच्या अधिकारात अर्ज करण्यात आला. विशेष म्हणजे, त्यानंतर अवघ्या सात दिवसांत १० ऑगस्ट रोजी पुन्हा विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात आली. या सभेची नोटीस त्याच दिवशी काढण्यात आल्याचे निवेदनात नमूद आहे. त्यामुळे ग्रामसभा घेण्यापूर्वी नियमानुसार पूर्वसूचना देण्यात आली होती का, असा सवाल उपस्थित होत आहे. १० ऑगस्ट रोजी ग्रामस्थ उपस्थित असताना ग्रामसभा तहकूब करण्यात आल्याचे सांगण्यात आले. हजेरीपत्रक, इतिवृत्त आणि तहकुबीचे कारण विचारले असता "इतिवृत्त नाही" असे सांगण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. संबंधित कागदपत्रांच्या प्रती देण्यास नकार देण्यात आल्याचेही निवेदनात नमूद आहे. तसेच या सभेला पंचायत समितीचा कोणताही अधिकारी उपस्थित नसल्याचा दावा करण्यात आला आहे. दरम्यान, ग्रामस्थ अश्विन मुरलीधर ठाकरे यांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे निवेदन देऊन संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे. ३ व १० ऑगस्टच्या ग्रामसभांच्या नोटिसा, हजेरीपत्रक, इतिवृत्त, GPDP आणि १६ व्या वित्त आयोगाशी संबंधित अभिलेख तपासण्याची मागणी करण्यात आली आहे. अशी मागणी ग्रामस्थांकडून होत

# पुसद हादरले! सांडवा रोडवर महिलेचा गळा चिरलेला मृतदेह, हत्येचा संशय

### डोक्यावरही गंभीर जखमा ग्रामीण पोलिसांकडून तपासाला वेग, काही तासांत मृत महिलेची ओळख पटली

**✦जनमाध्यम | प्रतिनिधी**



**पुसद , दि. १० :** पुसद ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत मौजा सांडवा परिसरात एका महिलेचा गळा चिरलेल्या आणि डोक्यावर गंभीर जखमा असलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

महिलेची हत्या झाल्याचा प्रथमदर्शनी संशय पोलिसांनी व्यक्त केला असून, या धक्कादायक घटनेमागील नेमके कारण आणि आरोपी कोण, याचा शोध घेण्यासाठी तपास सुरू करण्यात आला आहे. सोमवारी (दि. १० ऑगस्ट) सकाळी सुमारे ८ वाजताच्या सुमारास सांडवा-मांडवा-शेंबाळपिंपरी मार्गावर, सांडवाकडे जाणाऱ्या हनुमान मंदिरापासून सुमारे ५०० मीटर अंतरावरील मोकळ्या जागेत महिलेचा मृतदेह आढळून आला. राज सांडवा येथील पोलीस पाटील संजय बापूजी सांडवकर यांनी याबाबत ग्रामीण पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेहाची अवस्था पाहता महिलेच्या गळ्यावर धारदार शस्त्राने वार केल्याचे तसेच डोक्याला गंभीर दुखापत झाल्याचे प्राथमिक तपासात निदर्शनास आले. त्यामुळे हा प्रकार अपघाती नसून घातपाताचा असल्याचा संशय अधिक बळावला आहे. दरम्यान, मृत महिलेची ओळख पटविण्यासाठी पोलिसांनी शोध पत्रिका व विविध माध्यमांचा वापर केला. काही तासांतच मृत महिला अल्का सुखदेव सोयाम (वय ४०, रा. वसंतनगर) असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी त्यांच्या कुटुंबीयांना माहिती दिली असून मृतदेह शवविच्छेदनासाठी पुसद उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, ग्रामीण पोलीस ठाण्याचे ठाणेदार व कर्मचारी पुढील तपास करीत आहेत.

# स्वातंत्र्यदिनी भव्य रक्तदान शिबिरासाठी आयोजन..!

**✦जनमाध्यम | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. १० :** रक्तदान हे श्रेष्ठदान असून, एका रक्तदात्यामुळे गरजू रुग्णाला जीवनदान मिळू शकते. याच सामाजिक भावनेतून 'चला रक्तदान करूया, नातं नव घडवूया!' या उपक्रमांतर्गत स्वातंत्र्यदिनी, १५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी ३ वाजेपर्यंत शिवशक्ती लॉन, स्टेट बँक चौक, यवतमाळ येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या रक्तदान शिबिराच्या नियोजनासाठी आयोजन समितीतील विविध सामाजिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक रविवार, ९ ऑगस्ट रोजी दुपारी १२ ते २ वाजेपर्यंत बुंदेला ॲड्स, चापमानवाडी, जस्मित कॉम्प्लेक्स, तलाठी कार्यालयासमोर, यवतमाळ येथे आयोजित करण्यात आली होती. बैठक संयोजक शैलेश करिहार यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात संपन्न झाली. हे १९वे रक्तदान शिबिर असून, विविध सामाजिक संस्थांना एकत्रित आणून रक्तदानाचा सामाजिक संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी विविध सूचना, नियोजन व जबाबदाऱ्यांबाबत चर्चा केली. या उपक्रमात यवतमाळ का राजा सेवा परिवार नवयुवक गणेश मंडळ, माजी खासदार विजयबाबू दर्डा फॅन्स असोसिएशन, केंद्रीय मानव अधिकार संघटन, श्री हनुमान मंदिर भक्त मंडळ, यवतमाळ मॉम्स क्लब, सुनीता फॅशन ड्रेस डिझायनिंग अँड मॅन्युफॅक्चरिंग प्रशिक्षण केंद्र, एस.एल. फाउंडेशन, आंतरराष्ट्रीय मानव अधिकार संघटन, जैन क्लब, प्रतिभा फाउंडेशन सेवाभावी संस्था, कलाकुंज बहुउद्देशीय महिला प्रशिक्षण संस्था, आंतरराष्ट्रीय अग्रवाल महिला संमेलन, प्रज्वल सेवा फाउंडेशन, कुलमुखत्यार महाराणी येसूबाई सामाजिक संस्था, महिला सक्षमीकरण केंद्र, वसुंधरा फाउंडेशन, दैनिक अमरावती दर्शन प्रणित सखी समर्पण, प्रिया नर्सरी यवतमाळ.डॉक्टर भारतीय स्वयंसेवी संस्था महासंघ, इनरव्हील क्लब ऑफ यवतमाळ, यवतमाळ ब्लड डोनर असोसिएशन, कमलादेवी तेजू फाउंडेशन, सकाळ तनिष्का व्यासपीठ, जिजाऊ फाउंडेशन, भारतीय नारी रक्षा संघटना, संत महादंबा सामाजिक संस्था, निःस्वार्थ सेवा फाउंडेशन धैर्य फाउंडेशन यवतमाळ आदी सामाजिक संस्थांचा सहभाग राहणार आहे. रक्तदान शिबिराच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन रक्तदान समितीचे संयोजक शैलेश करिहार यांनी केले आहे. तर शिबिराच्या आयोजनाबाबतची माहिती प्रचारप्रमुख विजयकुमार बुंदेला यांनी दिली.


# नावात बदल

सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, माझ्या इयत्ता १२ वी च्या गुणपत्रिकेवर माझे नाव सैय्यद साजीद तौफिक **(Sayyad Sajid Taufik)** आणि माझ्या आईचे नाव शबाना **(Shabana)** असे नोंदविले गेले आहे.

परंतु, माझ्या अधिकृत जन्मनोंदीनुसार माझे योग्य आणि अचूक नाव सैय्यद साजीद सैय्यद तौफिक **(Syed Sajid Syed Taufique)** असे असून, माझ्या आईचे नाव शबाना परवीन सैय्यद तौफिक **(Shabana Parveen Syed Taufique)** असे आहे.

तरी यापुढे सर्व शासकीय, निमशासकीय, शैक्षणिक व खाजगी व्यवहारांसाठी जन्मनोंदीवरील सदर नावच अधिकृत मानून ग्राह्य धरण्यात यावे, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**निवेदक:**

सैय्यद साजीद सैय्यद तौफिक

(Syed Sajid Syed Taufique)

पत्ता: ताज नगर दारव्हा ता. दारव्हा जिल्हा. यवतमाळ

दिनांक १०/०८/२०२६

# ‘मध्यान्ह भोजना’ला धान्य तुटवड्याचा फटका

## जिल्ह्यातील निम्म्याहून अधिक शाळांमध्ये उसनवारीवर स्वयंपाक; नियोजनावर प्रश्नचिन्ह

**अमरावती/का.प्र.**

शैक्षणिक वर्ष सुरू होऊन महिनाभराहून अधिक कालावधी उलटला असतानाही जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण (मध्यान्ह भोजन) योजनेसाठी आवश्यक धान्य व इतर साहित्याचा पुरवठा झालेला नाही. त्यामुळे जिल्ह्यातील निम्म्याहून अधिक शाळांना विद्यार्थ्यांचे मध्यान्ह भोजन सुरू ठेवण्यासाठी स्थानिक पातळीवर उसनवारी करावी लागत असल्याचे समोर आले आहे.

काही तालुक्यातील शाळांना फक्त तांदुळ देण्यात आला आहे पण इतर धान्य,साहीत्य मिळाले नाही.त्यामुळे पोषण आहाराची चव बिघाडली असून मुख्याध्यापक व शिक्षक यांच्यावर या खर्चाचा आर्थिक भार पडला आहे. मध्यान्ह भोजन ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची योजना आहे.मात्र, पुरवठ्यातील विलंबामुळे विद्यार्थ्यांच्या पोषणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. शाळांच्या नियोजनावरही याचा परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे.

जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना भोजन मिळावे यासाठी मुख्याध्यापकांना स्थानिक पातळीवरून धान्याची



व्यवस्था करावी लागत आहे. काही ठिकाणी शाळांनी उसनवारीवर धान्य घेऊन भोजन सुरू ठेवले आहे. त्यामुळे शाळांवर अतिरिक्त आर्थिक व प्रशासकीय भार पडत आहे. भातकुली,अमरावती तालुक्यातील शाळांना फक्त तांदुळ मिळाला आहे.पण इतर धान्य व साहीत्य मिळाले नाही.शिक्षण विभागाकडून धान्याचा पुरवठा वेळेवर होणे अपेक्षित असताना अद्यापही काही शाळांना पुरेसा साठा मिळालेला नाही. यामुळे विद्यार्थ्यांना भोजन देताना शाळांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील ५० टक्क्यांहून अधिक शाळांमध्ये ही परिस्थिती असल्याचे वृत्तात नमूद करण्यात आले आहे.भातकुली, अमरावती, चिखलदरा,धारणी आदी भागांतील शाळांमध्येही धान्याच्या उपलब्धतेचा प्रश्न निर्माण झाल्याचे सांगण्यात आले आहे.काही शाळांनी योजनेच्या शासकीय स्तरावरील प्रक्रियेमुळे धान्य मिळण्यास विलंब झाल्याने स्थानिक स्तरावरून धान्य घेऊन मध्यान्ह भोजन सुरू ठेवले आहे. मात्र, ही व्यवस्था किती दिवस चालणार,असा प्रश्न मुख्याध्यापकांकडून उपस्थित केला जात आहे.

शाळांनी पुरवठा व शाळेत येणाऱ्या धान्याचे नियोजन वेळेत करण्याची मागणी केली आहे. विद्यार्थ्यांना नियमित व पौष्टिक भोजन मिळण्यासाठी धान्याचा पुरवठा तातडीने सुरळीत करणे आवश्यक असल्याचेही सांगण्यात येत आहे.तसेच उत्तम पोषण आहारकरीता भाजीपाला विकत आणावा लागतो त्या करीता निधी वेळेवर दिला जात नाही.याकरीता शाळांना ऑडव्हान्स स्वरुपात निधी देण्याची मागणी होत आहे.तसेच स्वयंपाकी आणि मदतनिस यांच्या मानधनात वाढ होणे आवश्यक आहे.

## श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या वतीने क्रांतीदिनी मशाल रॅली

**अमरावती/का.प**

स्थानिक श्री शिवाजी शिक्षण संस्था अंतर्गत श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती यांच्या वतीने श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धनजी देशमुख व कोषाध्यक्ष मा. दिलीप बाबू इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली क्रांती दिनाचे औचित्य साधून भारत सरकारच्या नशामुक्त भारत अभियान अंतर्गत ‘DRUG FREE CAMPUS' ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्याच्या अनुषंगाने विद्यार्थी व नागरिकांमध्ये अमली पदार्थाच्या दुष्परिणामा विषयी तसेच स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारकांच्या त्याग, बलिदान व देशभक्तीच्या स्मृती जागृत ठेवणे तसेच विद्यार्थी व नवयुवकांमध्ये राष्ट्रप्रेम आणि सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण करण्यासाठी जनजागृतीचा संदेश देण्यासाठी मशाल रॅली आयोजित करण्यात आले



सदर रॅली डॉ.पंजाबराव देशमुख स्मृति भावनापासून प्रारंभ होऊन पूर्वनियोजित मार्गाने शहरातून काढण्यात आली. शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून जयस्तंभ चौक येथील महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून रॅली ची सांगता करण्यात आली.रॅलीमध्ये महाविद्यालयाचे ५०० विद्यार्थी व २५ प्राध्यापक व कर्मचारी सहभागी झाले तसेच सदर रॅलीदरम्यान कायदा व सुव्यवस्था, वाहतूक नियम तसेच सार्वजनिक सुरक्षिततेचे संपूर्ण पालन करण्यात करून काढण्यात आली असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे यांनी कळविले आहे. सदर रॅलीमध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक सिरसाट तसेच पोलिस विभागातील गजेंद्र गाडदे महाविद्यालयातील शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## शाळेजवळच चिखलाचे तळे; विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

### ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह; नागरिकांना फटका

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

पावसाळा सुरू होताच अंजनगाव बारीतील रस्त्यांच्या दुरवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. गावातील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी व चिखल साचल्याने नागरिकांसह विद्यार्थ्यांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

विशेषतः जिल्हा परिषद मुलांच्या शाळेजवळच मोठा खड्डा निर्माण होऊन त्यात पाणी साचले आहे. याच मार्गाने दररोज लहान मुले ये-जा करीत असल्याने घसरून पडण्याची किंवा अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पालकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

दरवर्षी पावसाळ्यात अशीच परिस्थिती निर्माण होत असताना नाल्यांची साफसफाई, पाण्याचा निचरा आणि रस्त्यांची दुरुस्ती याबाबत ग्रामपंचायतीकडून ठोस उपाययोजना का केल्या जात नाहीत, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे. दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने शाळेजवळील



खड्डा बुजवून पाण्याचा निचरा करावा, अशी मागणी होत आहे.

## पी.आर.पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये क्रांती दिन

**अमरावती/का.प्र.**

पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल येथे क्रांती दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील ‘भारत छोडो आंदोलन’ आणि स्वातंत्र्यवीरांच्या त्यागाचे स्मरण करून विद्यार्थ्यांनी देशभक्तीची भावना जागृत केली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतिकारकांना आदरांजली अर्पण करण्यात आली. विद्यार्थ्यांनी क्रांती दिनाचे ऐतिहासिक महत्त्व,



स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी केलेल्या त्यागाविषयी मनोगते व्यक्त केली. देशभक्तीपर घोषवाक्ये व विचारांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या शौर्याला अभिवादन केले.या प्रसंगी विद्यार्थ्यांना ‘करेंगे या मरेंगे’ या ऐतिहासिक घोषणेचा आणि भारत छोडो आंदोलनाचा इतिहास समजावून सांगण्यात आला. शाळेचे प्राचार्य सचिन दुर्गे, उपप्राचार्या सोनल निस्ताने तसेच शिक्षकवृंद यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले.‘क्रांतीची ज्योत मनामध्ये तेवत ठेवूया,

स्वातंत्र्यवीरांच्या त्यागाचे सदैव स्मरण करूया!’अशा देशभक्तीपूर्ण वातावरणात क्रांती दिनाचा कार्यक्रम उत्साहात झाला.

## मिलिंद विद्यालयात शिक्षक-पालक सभा

**खल्लार/वार्ताहर**

नजिकच्या गौरखेडा येथिल मिलिंद विद्यालयात शैक्षणिक सत्र २६-२७ मधली पहिली शिक्षक-पालक सभा नुकतीच उत्साहात पार



पडली.अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक ए. बी.वानखडे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून वर्ग पाच ते दहा चे पालक उपस्थित होते.

यावेळी सभेमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसह त्यांच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित विविध विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. शाळेतील उपलब्ध सोयी- सुविधा तसेच विविध शिष्यवृत्ती योजनांची माहिती पालकांना देण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त व संस्कार देण्याचे काम कुटुंब व शाळा यांचे असून पालकांनी व शिक्षकांनी मिळून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा साध्य करता येईल याविषयी सभेमध्ये सांगोपांग चर्चा करण्यात आली. या चर्चेमध्ये बहुतांश पालकांनी सहभाग घेतला.

वर्षभर विद्यालयांमध्ये विविध उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची आवड अधिकाअधिक कशी निर्माण करता येईल यासाठी कोणकोणते उपक्रम घेता येतील यावर चर्चा झाली.सभेचे संचालन अमोल बोबडे यांनी केले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व माता पालक वर्ग आणि बहुतांश पालक उपस्थित होते.

## जुळ्या शहरातील ‘तो’ ॲप अचानक बंद

### अनेकांची हजारो रुपयांची गुंतवणूक अडकली

**अचलपूर/वार्ताहर**

विदेशातील असल्याचे सांगितले जाणारे एक अर्निंग ॲप अचानक बंद झाल्याने अचलपूर-परतवाडा जुळ्या शहरातील अनेक नागरिकांची हजारो रुपयांची गुंतवणूक अडकल्याची चर्चा सध्या जोरात सुरू आहे. या प्रकरणात विद्यार्थी, शासकीय व खासगी क्षेत्रातील नोकरदार तसेच व्यापारी वर्गातील अनेकांनी पैसे गुंतविल्याची माहिती समोर येत असून, संबंधित व्यक्तींकडे जाब विचारण्यासाठी आर्थिक नुकसान झालेल्या नागरिकांच्या चकरा सुरू असल्याचे सांगितले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुरुवातीला मोबाईलवर सोपे टास्क देऊन त्याबदल्यात पैसे मिळण्याचे आमिष दाखवण्यात आले. यामध्ये युट्यूब व्हिडिओला लाईक करणे, रेटिंग देणे यासारखी कामे दिली जात होती. सुरुवातीला १०० ते ५०० रुपयांपर्यंत रक्कम मिळत असल्याने संबंधित ॲपवर नागरिकांचा विश्वास निर्माण झाला. त्यानंतर अधिक कमिशन मिळविण्यासाठी VIP मेंबरशिप किंवा ‘प्रीपेड टास्क’च्या



नावाखाली ५ हजारांपासून ५० हजार रुपये किंवा त्याहून अधिक रक्कम गुंतविण्यास सांगितले जात असल्याची माहिती आहे.अनेकांनी सुरुवातीला कमी रक्कम गुंतविल्यानंतर ॲपवर वाढलेली कमाई आणि बॅलन्स पाहून मोठ्या प्रमाणात पैसे गुंतविल्याची चर्चा आहे.मात्र,त्यानंतर अचानक ॲपवरील विथड्रॉलची प्रक्रिया बंद झाल्याचे सांगण्यात येत आहे. पैसे काढण्याचा प्रयत्न केल्यावर ‘टॅक्स भरा’, ‘सिस्टम एरर’, ‘आयडी फ्रीझ झाली आहे’ आदी कारणे सांगून आणखी पैसे भरण्यास सांगितले जात असल्याची माहिती काही नागरिकांकडून मिळत आहे.

विशेष म्हणजे, या ॲपशी संबंधित टेलिग्राम किंवा व्हॉट्सॲप ग्रुपच्या माध्यमातून नागरिकांना जोडले जात असल्याची चर्चा आहे. मोठ्या प्रमाणात रक्कम जमा झाल्यानंतर संबंधित ॲप तसेच काही टेलिग्राम अकाउंट्स अचानक बंद झाल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे जुळ्या शहरातील विविध भागात या प्रकरणाची चर्चा सुरू असून, नेमकी किती नागरिकांनी या ॲपमध्ये गुंतवणूक केली आणि किती रक्कम अडकली, याबाबत अद्याप अधिकृत माहिती उपलब्ध झालेली नाही.या व्यवहारांपैकी अनेकांनी UPI किंवा नेट बँकिंगच्या माध्यमातून पैसे पाठविल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.त्यामुळे संबंधित नागरिकांनी आपल्या बँकांना व्यवहाराची माहिती दिली आहे का, संशयास्पद व्यवहारांवर तत्काळ काही कारवाई होऊ शकते का, तसेच या प्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल होणार का, असे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

## संक्षिप्त

### विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**ब्राह्मणवाडा थडी -** येथील श्री नागनाथ विद्यालयात श्री संत गाडगेबाबा आश्रम शाळेच्या वतीने इयत्ता ५ वी ते १० वीच्या सर्व



विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक जयदीप देशमुख प्रमुख अतिथी म्हणून संत गाडगेबाबा आश्रम शाळा नागरवाडीचे संचालक सागर देशमुख आणि संत गाडगेबाबा धर्मशाळा नाशिकचे संचालक कुणाल देशमुख उपस्थित होते.विद्यालयाचे मुख्याध्यापक जयदीप देशमुख यांनी आपल्या प्रास्ताविकेतून कार्यक्रमाची रूपरेषा व उद्देश उपस्थितांसमोर मांडला. यानंतर मान्यवरांच्या हस्ते गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले.या कार्यक्रमाला व्ही. एन. देशमुख, एन. देशमुख , पी. पी. मोहोड, ए. डी. ठाकरे, व्हि. एस. काळे, आर. बी. केवट,पी. बी. अगुधरे, एस. के. वेलकर, वर्षा मेसकर, धनंजय इंगळे, रसिका तायडे यांच्यासह नागरवाडी आश्रम शाळेचे शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी तसेच श्री नागनाथ विद्यालयाचे सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.संचालन पी.पी.मोहोड यांनी तर उपस्थितांचे आभार व्ही.एन. देशमुख यांनी मानले.

### जिल्हास्तरीय योगासन निवड चाचणी १६ ऑगस्टला

**अमरावती-** महाराष्ट्र योगासन स्पोर्ट्स असोसिएशनच्या मान्यतेने अमरावती जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने अमरावती जिल्हास्तरीय योगासन निवड चाचणी २०२६–२७ आयोजित करण्यात आली आहे. सदर निवड चाचणी शनिवार १६ ऑगस्ट २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती येथे होणार असून खेळाडूंचे रिपोर्टिंग सकाळी ९.०० वाजता तर स्पर्धेला सकाळी १०.०० वाजता सुरुवात होणार आहे.चाचणीमध्ये ट्रेडिशनल योगासन, आर्टिस्टिक योगासन (एकेरी), आर्टिस्टिक योगासन (जोडी) आणि रिदमिक योगासन (जोडी) या प्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. कट-ऑफ १ जानेवारी २०२६ नुसार सब-ज्युनियर गटात १० ते १४ वर्षे वयोगटातील खेळाडू सहभागी होऊ शकतील. ज्युनियर गटासाठी १४ ते १८ वर्षे वयोगट आहे. सिनियर गटासाठी १८ ते २८ वर्षे वयोगट आहे.याकरीता ऑनलाइन नोंदणी लिंक Registration Form – https://forms.gle/HiP2qERpFRV7smMd8 स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंनी आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत.अधिक माहितीसाठी डॉ. विशाल खोडस्कर,(७०२१७ ७६६४०),संदीप मांदळे,(८२७५७ ५३६४८),संतोष चंदेल (९४२१७ ८८३५६) व स्वाती गडेकर (९४०३३ ९०८७७) यांच्याशी संपर्क साधावा.

### उद्या सावंगा येथे श्रावण मास मांड शुभारंभ व चंदनउटी उत्सव



**चांदूर रेल्वे-** तालुक्यातील श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे बुधवार,१२ ऑगस्ट रोजी श्रावण मास मांड (अखंड भजन) शुभारंभ तसेच अमावस्येनिमित्त चंदनउटी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. श्रावण मास मांडची सुरुवात सकाळी ५ वाजता लहान मंदिरात ढाल बसवून करण्यात येणार असून, त्यानंतर मुख्य मंदिरात या मांडीचा शुभारंभ महाराजांच्या गणाने विश्वस्त मंडळ व भाविक भक्तांच्या उपस्थितीत हा धार्मिक विधी पार पडणार आहेत. तसेच दुपारी ४ वाजता संस्थानच्या वतीने अमावस्येनिमित्त भव्य चंदनउटी उत्सव आयोजित करण्यात आला आहे.मास मांडदरम्यान बाहेरगावातील विविध अवधूत भजन मंडळांचा दैनंदिन सहभाग राहणार आहे. यासाठी संस्थानच्या वतीने भजन मंडळांच्या पाळीचे नियोजन करण्यात आले आहे.या भाविक भक्तांनी तन-मन-धनाने कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### आदर्श हायस्कूलमध्ये क्रांती दिन

**खल्लार-** आदर्श हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, दर्यापूर येथे क्रांती दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या



अध्यक्षस्थानी उपमुख्याध्यापक व्ही. पी. मुळे प्रमुख अतिथी म्हणून पी. एम. काळे शिक्षकेतर कर्मचारी प्रतिनिधी प्रदीप भारसाकळे, शिक्षिका पी. पी. होले, कार्यक्रम प्रभारी एस. एस. राठोड व चंद्रशेखर माहुरे उपस्थित होते.यावेळी विद्यालयातील टोपले कनखर,एच.एस. सोळंके, सिरसाट, भोगे,राखोंडे, बिहाडे, बिराजदार,कलाने,मानवते शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आझाद हिंद मंडळ साकारणार

# ‘हारे के सहारे भगवान श्री खाटू श्याम बाबा’चा देखावा

### ९९ व्या गणेशोत्सवासाठी कार्यकारिणीची निवड

**अमरावती/का.प्र.**

शहरातील गणेशोत्सवाच्या परंपरेत आपल्या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांमुळे नावलौकिक मिळविणाऱ्या आझाद हिंद मंडळ, बुधवाराच्या वार्षिक आमसभेत यंदाच्या ९९ व्या गणेशोत्सवासाठी ‘हारे के सहारे भगवान श्री खाटू श्याम बाबा’ यांचा भव्य व आकर्षक देखावा साकारण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच २०२७ मध्ये होणाऱ्या मंडळाच्या शताब्दी महोत्सवाच्या तयारीलाही याच बैठकीत प्रारंभ करण्यात आला.

मंडळाची वार्षिक आमसभा मंडळाचे कार्याध्यक्ष, माजी महापौर तथा विरोधी पक्षनेते विलास इंगोले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सभेच्या प्रारंभी मंडळाच्या ज्येष्ठ सदस्यांच्या हस्ते श्री गणरायाचे पूजन करण्यात आले. त्यानंतर मंडळाचे माजी अध्यक्ष स्व. हरिभाऊ कालोती यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.सभेच्या प्रारंभी मंडळाचे सचिव दिलीप कालोती यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले.त्यानंतर मंडळाचा ९८ वा गणेशोत्सव अत्यंत यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल गणेशोत्सव कार्यकारिणीचे अभिनंदन करण्यात आले. आगामी २०२७ चे शताब्दी वर्ष भव्य आणि ऐतिहासिक स्वरूपात साजरे करण्याबाबतही सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली.९९ व्या गणेशोत्सवासाठी नवी कार्यकारिणी यंदाच्या ९९ व्या गणेशोत्सवासाठी कार्याध्यक्षपदी श्यामभक्त दीपकजी सम्राट साहू, तर उपाध्यक्षपदी श्यामभक्त नितीनजी पांडे यांची निवड करण्यात आली. सचिवपदी रेवण पुसतकर तर कोषाध्यक्षपदी मयूर जलतारे यांची निवड करण्यात आली.सहसचिवपदी राजेश जायदे, राजेश ढोले, सतीश बद्रे, प्रवीण चौधरी आणि कृष्णा हिवसे यांची निवड करण्यात आली.मंडळाचे सचिव दिलीप कालोती यांनी यावेळी वार्षिक अहवालाचे वाचन केले. खाटू श्याम बाबांचा भव्य देखावा ठरणार यंदाचे प्रमुख आकर्षण यंदाच्या गणेशोत्सवात साकारण्यात येणाऱ्या ‘हारे के सहारे भगवान श्री खाटू श्याम बाबा’ या भव्य देखाव्याची माहिती नवनियुक्त सचिव रेवण पुसतकर व सहसचिव कृष्णा हिवसे यांनी सभेत दिली.कार्याध्यक्ष दीपकजी सम्राट व उपाध्यक्ष नितीन पांडे यांनी भगवान श्री खाटू श्याम बाबांची महती सांगत, अमरावती शहरातील सर्व श्यामभक्त या भव्य देखाव्यासाठी आणि गणेशोत्सवासाठी सहकार्य



करतील, असा विश्वास व्यक्त केला.

आमसभेला विवेक कालोती,राजाभाऊ माजलगावकर,लक्ष्मणराव शिरभाते, रमेश उंडे, दिलीप दाभाडे, किशोर कालोती, प्रवीण मानेकर, भूषण पुसतकर, संतोष बद्रे, संजय मुचळंबे, प्रसाद मोरे, सतीश चौधरी, नितीन सराफ, ॲड. विजय संगेकर, ॲड. राजेंद्र पांडे, मयूर जलतारे, राजेश जायदे, सुनील सरोदे, सुधीर जोशी, जयंत कालोती, नंदू गुम्बळे, विकास केमदेव, सुरेश रतावा, मुकेश छान्गानी, निलेश सराफ, गुड्डू ढोले, संतोष चिखलकर,अजय इंगोले, उदापूरे बंधू, प्रा. गणेश मलोकर, भैया इंगोले,अण्णा करणें, नितीन इंगोले, पांडुरंग रायकवार, राजू हिरपूरकर, सुनील महल्ले, संजय हिरपूरकर, नंदू माकवाने, सुरेश चिखलकर,अशोक बामनगांवकर, ॲड.चंदू डोरले,अजित वडवेकर, राजा पिंजरकर, विनय कोनलाडे, विशाल फाटे, डॉ. आकाश मोरे, विनोद घोडेगावकर, दीपक इंगळे,

#### राज्य नाट्य स्पर्धेतही आझाद हिंदची परंपरा कायम

मंडळाचे ज्येष्ठ नाट्यकलावंत अजित वडवेकर व ॲड. चंदू डोरले यांनी यंदाही मंडळाचे माजी कार्याध्यक्ष स्व. राजाभाऊ मोरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राज्य नाट्य स्पर्धेत मंडळाचे नाटक सादर करण्यात येणार असल्याची माहिती दिली. त्यामुळे गणेशोत्सवासोबतच नाट्य क्षेत्रातील मंडळाची सांस्कृतिक परंपराही यंदा कायम राहणार आहे.सभेत विविध विषयांवरील चर्चेत किशोर कालोती, दिलीप दाभाडे, सतीश चौधरी, ज्ञानेश्वर हिवसे, भूषण पुसतकर, मयूर जलतारे, प्रवीण चौधरी, राजेश ढोले, पंकज सराफ, प्रवीण मानेकर आणि विवेक कालोती यांनी सहभाग घेतला.

तन्मय पिंजरकर, बाळ वानखडे, किरण उदापुरे, नाना उदापुरे, सागर इंगोले, अनिकेत नवघरे, परेश कोरे, सचिन कोहळे, सुधीर कुटारिया, जयंत देशपांडे, प्रवीण सोईतकर, रघु निमगावकर, दीपक माजलगावकर,सुनील तिप्पट, मनीष काजणेकर, मुन्ना दुलारे, किरण विंचूरकर,प्रेमानंद पुसतकर, प्रथमेश बाखडे, कृष्णा हिवसे,वेदांत डांगे, अमित काजणेकर, शेखर कुळकर्णी, अंकुश गायकवाड, विजय कालोती, अर्जुन इंगोले, शुभम निहाटकर, लोखंडे यांच्यासह अनेक ज्येष्ठ सदस्य व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सीजेपी आणि लोकनीती

दिल्लीतले आंदोलन संपल्यानंतर कॉक्रोच जनता पार्टीच्या कोअर टीमची बैठक छत्रपती संभाजी नगर मध्ये अभिजित दिपके यांच्या घरी झाली आणि दीड-दोन दिवसांच्या विचारमंथनानंतर दिपके यांनी प्रेससमक्ष जे मुद्दे स्पष्ट केले, ते ऐकून, पाहून व वाचून समाधान वाटले. त्यांनी स्पष्ट केलेल्या बाबी अश्या होत्या:-

सीजेपीचे राजकीय पक्षात रुपांतर करण्याची सध्या कोणतीही योजना नाही. एक सोशल प्रेशर ग्रुप म्हणून ही संघटना काम करेल. गांधी,आंबेडकर व नेहरू यांच्या आदर्शांवर त्यांना पुढील वाटचाल करायची आहे. त्यांचा लोकशाही, अहिंसा व संविधानावर अतूट विश्वास आहे. सप्टेंबर पासून सीजेपी देशभरातील युवा पिढीचे प्रश्न व समस्या समजून घेण्यासाठी 'क्या बोलती पब्लिक' नावाचे अभियान चालविणार आहे.

समाजमाध्यमांमधून नुकतीच निर्माण झालेली ही संघटना कशी आहे?तिचे उद्दिष्ट काय?या संघटनेमागे कोणत्या शक्तींचे पाठबळ आहे?असे अनेक प्रश्न संघटनेच्या निर्मितीपासूनच विचारले जाऊ लागले. विशेषतः पुरोगामी वर्तुळात शंका उपस्थित केल्या गेल्या.सोनम वांगचुक यांच्या सहभागामुळे संशयाचे धुके अधिक गडद झाले.राहूल गांधींना धक्का देण्यासाठी एक नवीन पक्ष भाजपनेच तयार केला की काय,अशी अनेकांच्या मनात शंका होती. कदाचित अजूनही असेल.

परंतु सीजेपीच्या स्थापनेपासून आतापर्यंत संस्थापक अभिजित दिपकेच्या देहबोलीचे (Body language) बारकाईने निरीक्षण करीत असता मला तरी त्या युवकात एक सच्चेपणा, साधेपणा आणि देशापुढील मोठ्या समस्यांची जाण असल्याचे आढळून आले.ते कोणत्याही राजकीय पक्षाच्या अजेंड्याशी बांधलेले दिसले नाहीत.जे जे विरोधी पक्षनेते त्यांना जाऊन भेटले,त्या सर्वांचे त्यांनी मनापासून आभार मानले.

सत्ताधारी पक्षाने जर तत्परतेने दखल घेऊन संवाद साधला असता तर कदाचित त्यांचे आंदोलन इतके चिघळलेही नसते.

सीजेपीचे हे धोरण ऐकल्यावर मला विनोबांची आठवण झाली.१९५० ते ६०



च्या दशकात विनोबा लोकनीती वर बोलत असत. दंडशक्तीहून भिन्न, हिंसाशक्तीच्या विरोधी अशी लोकशक्ती भारतीय समाजात निर्माण व्हावी; राजनीतीला पर्याय म्हणून लोकनीती वाढावी असे विनोबांचे सांगणे असायचे. बाबुराव चंदावार (उत्पल व. बा. यांचे वडील) सर्व सेवा संघाचे सदस्य आणि विनोबांचे अनुयायी होते. परंतु लोकनीतीची जी व्याख्या विनोबांनी केली, त्यात एक दुरुस्ती करावी असा बाबूरावांचा आग्रह असे. 'हिंसाशक्तीहून भिन्न व दंडशक्तीच्या विरोधी' अशी लोकशक्ती उभी राहावी असे बाबूराव म्हणत. त्या काळात साम्यवादाचा जोर होता.नक्षलवादी चळवळ उभी राहू पाहत होती.संसदीय राजकारणाच्या बाहेर राहून सामाजिक,राजकीय,आर्थिक परिवर्तनासाठी झटणारे अनेक समूह होते.लोकशाही मध्ये दंड देण्याचा, हिंसा करण्याचा अधिकार हा फक्त राज्य संस्थेला (यात न्यायालयांचाही समावेश होतो) असून अन्य कोणत्याही व्यक्तीसमूहाला तो अधिकार असणार नाही, अशी जागतिक मान्यता आहे. परंतु राज्यसंस्था हीच हळूहळू विसर्जित व्हावी व लोकसमूहांकडे स्वशासनाची जबाबदारी टप्प्याटप्प्याने सोपविण्यात यावी,हे तत्व मार्क्सवादी आणि गांधीवादी अश्या दोन्ही विचारसरणींना मान्य असते. हिंसा ही प्रस्थापित व्यवस्थेमध्ये अंगभूत असल्यामुळे व्यवस्था बदलण्यासाठी गरज पडल्यास हिंसेचा आधार घेण्यास हरकत नाही,किंबहुना तो घ्यावा लागणारच असे मार्क्सवाद्यांचे प्रतिपादन असायचे. उलटपक्षी लोकांच्या सहभागाने व्यवस्थापरिवर्तन घडवून आणावयाचे असल्यास अहिंसक मार्गच अवलंबिणे योग्य आहे,असे गांधीवादी तत्वज्ञ म्हणायचे. बाबुराव चंदावार यांचा मुद्दा हा होता की,आम्ही स्वतःला हिंसाशक्तीच्या विरोधी म्हणवून घेण्यापेक्षा दंडशक्तीच्या विरोधी म्हणजेच राज्यसंस्थेच्या विरोधात व हिंसाशक्तीहून भिन्न अशी लोकशक्ती उभी करण्याचा संकल्प करावा.

सीजेपीच्या दिल्लीच्या आंदोलनात हिंसेचे वावडे नसलेले काही निवडक समूह नंतरच्या काळात सहभागी झाले असू शकतात. परंतु तिथे जमलेले बहुसंख्य युवक युवती हे हिंसेचे समर्थक नव्हते. त्यांचा राग हा व्यवस्थेवर होता, कोणत्याही एका राजकीय पक्षावर नव्हे. सीजेपीने पुढील कार्यक्रमाचे जे धोरण जाहीर केले आहे, त्याचे स्वागत व्हायला हवे. एखाद्या झापडबंद विचारसरणीला बांधून घेऊन त्याच चष्म्यातून घटनांकडे व समस्यांकडे न पाहता खुल्या मनाने समस्यांना सामोरे जाणे आवश्यक आहे. एक गाठ सोडविण्याचा प्रयत्न करताना दुसऱ्या गाठी लक्षात आल्या तर त्यांचा ही विचार होऊ शकतो. युवक-युवतींना त्यांच्यातील क्षमतांचा विकास होऊ देणारे आणि उदरनिर्वाहाची संधी देणारे शिक्षण मिळत नाही, ही त्यांच्या लक्षात येत असलेली पहिली गाठ आहे. तिची उकल करण्याचा त्यांचा प्रयत्न सुरु झाला आहे. समस्या सोडविण्याचे प्रयत्न करताना दडपशाही होऊ शकते, याचे भानही त्यांना आलेले आहे. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा हे आमच्या आंदोलनाचे मुख्य यश नसून तरुणांच्या मनातील भय नाहीसे होत आहे, आणि हे खरे यश आहे असे अभिजित दिपके म्हणतात. यात त्यांचा निगर्वीपणा दिसून येतो.

**किशोर देशपांडे**

# निमित्त मक्का संयुक्त संरक्षण कराराचे..

सौदी अरेबिया, पाकिस्तान आणि तुर्कस्तान यांनी नुकताच संयुक्त संरक्षण करार केला आहे.अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धामुळे मध्यपुर्वेत जे तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे,तेच या करारासाठी निमित्त ठरले आहे.या कराराला 'मक्का जॉईंट डिफेन्स पॅक्ट'या नावाने ओळखले जाईल.या करारावर सौदी अरेबिया मधील मक्का येथे सौदीचे क्राऊन प्रिन्स मोहंमद बीन सलमान यांनी तसेच तुर्कस्तानचे अध्यक्ष एर्डोगन यांनी आणि पाकिस्तानचे पंतप्रधान शेहबाज शरीफ यांनी नुकत्याच सह्या केल्या.या करारानुसार पाकिस्तान, सौदी अरेबिया आणि तुर्कस्तान यांपैकी कोणत्याही देशावर इतर देशाने हल्ला केल्यास तो हल्ला तिन्ही देशांवरील हल्ला समजला जाईल आणि वरील देश एकमेकांच्या मदतीला धावून जातील.

पाकिस्तानी परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या स्टेटमेंट नुसार हा संयुक्त संरक्षण करार तीन देशांतील ऐतिहासिक संबंधांवर आधारित आहे.मध्यपुर्वेमध्ये शांतता, सुरक्षा आणि स्थिरता मजबूत करणे हे या कराराचे उद्दिष्ट आहे.अशा प्रकारच्या संयुक्त संरक्षण करारा बाबत अंकारा,रियाध आणि इस्लामाबाद यांच्या मध्ये बरेच दिवस चर्चा सुरू होती.मात्र ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमस संघटनेच्या अतिरेक्यांनी इस्त्रायलवर हल्ला केल्या नंतर आणि त्याची प्रतिक्रिया म्हणून इस्त्रायलने गाझा पट्टीत नरसंहार सुरू केल्यानंतर हा संयुक्त संरक्षण करार करण्यास गती मिळाली.नंतर अमेरिका आणि इस्त्रायल यांनी इराणवर हल्ला केल्यानंतर या कराराला अंतिम स्वरुप देण्याचे ठरवण्यात आले.अमेरिकेने इराणवर युद्ध लादल्यानंतर मध्यपुर्वेत जो तणाव निर्माण झाला आहे त्याची झळ अद्याप पाकिस्तान आणि तुर्कस्तान यांना लागलेली नाही.तसेच इराण समर्थित हुथी अतिरेक्यांकडून सौदी अरेबियावर हल्ले केले जात आहेत.थोडक्यात करार झाले ल्या तीन देशांपैकी सौदी अरेबियाला, अमेरिका आणि इराण मधील संघर्षाची मोठ्या प्रमाणात झळ बसत आहे.

पाकिस्तान, तुर्कस्तान आणि सौदी अरेबिया यांना चिंता वाटत आहे ती इराणच्या हल्ल्यांची आणि मध्यपुर्वेतील इस्त्रायलच्या वाढत्या प्रभावाची.इराणचे समर्थन असलेल्या हेजबुल्ला अतिरेकी संघटनेला धडा शिकविण्यासाठी इस्त्रायलचे लेबनॉनवर सतत हल्ले सुरू आहेत.इस्त्रायलने लेबनॉनचा जवळ जवळ एक पंचमांश प्रदेश ताब्यात घेतला आहे.इराकमधील इराण समर्थित अतिरेकी सौदी अरेबियावर ड्रोन्सच्या सहाय्याने हल्ला करत आहेत.त्यामुळे सर्वात जास्त टेन्शन हे सौदी अरेबियाला आहे.त्यामुळेच वरील तीन देशांतील संयुक्त संरक्षण करार करण्याबाबत सौदी अरेबियाने पुढाकार घेतलेला दिसत आहे.मार्च २०२६ मध्ये पाकिस्तान, तुर्कस्तान आणि सौदी अरेबिया



यांचे परराष्ट्र मंत्री रियाध येथे इस्लामिक समिटच्या दरम्यान भेटले होते.त्यावेळी त्यांनी संयुक्त संरक्षण कराराबाबत चर्चा केली होती.सप्टेंबर २०२५ मध्ये कतारची राज धानी दोहावर इस्त्रायलने हल्ला केला होता.

संयुक्त संरक्षण करार केलेल्या तीन देशांचे वैशिष्ट्य म्हणजे तुर्कस्तान हा नाटोचा(नॉर्थ अटलांटिक ट्रिटी ऑर्गनायझेशन) सदस्य आहे.तुर्कस्तान कडे ड्रोन्सचे आधुनिक तंत्रज्ञान आहे. सौदी अरेबिया हा जगातील सर्वात मोठा तेल निर्यातदार देश आहे आणि आर्थिक दृष्ट्या अतिशय मजबूत आहे.पाकिस्तान कडे अण्वस्त्रे आहेत आणि पाकिस्तान हा अण्वस्त्रे असलेला जगातील एकमेव मुस्लिम देश आहे. हा अतिशय खर्चिक व्यवहार असल्याने सौदीला स्वतःचा डिफेन्स सेक्टर उभारणे गरजेचे आहे.या बाबतीत सौदीला पाकिस्तान व तुर्कस्तान यांचे सहाय्य मिळू शकेल.हे तिन्ही देश उर्जा, संरक्षण आणि उत्पादन त्या संदर्भात त्याने अमेरिकेचे उदाहरण देऊन सांगितले की इतकी वर्षे सौदी अरेबिया अमेरिकेवर सुरक्षेसाठी अवलंबून आहे,मात्र सौदीला खरोखर सुरक्षा मिळाली का?त्याने सौदीला सल्ला दिला की, तुम्ही तुमची धोरणे सुधारलीत तर तुम्हाला सुरक्षेसाठी इतरांकडे भीक मागावी लागणार नाही. तुर्कस्तान कडून स्पष्ट करण्यात आले की संयुक्त संरक्षण करार हा एखाद्या देशाला समोर ठेवून करण्यात आलेला नाही.तो डिफेन्सिव्ह नेचरचा आहे. मध्यपुर्वेतील इतर देशांचे यामध्ये स्वागत आहे.इराण आणि अमेरिका यांच्यातील युद्धबंदी करार यशस्वी होऊ नये म्हणून इस्त्रायल कडून जे प्रयत्न सुरू आहेत त्याचा तिन्ही देशांनी निषेध केला आहे.

लेबनॉन,सिरिया आणि गाझा पट्टीवर इस्त्रायलकडून होणाऱ्या हल्ल्यांची या तिन्ही देशांकडून निंदा करण्यात आली आहे.गाझा पट्टीमध्ये इस्त्रायलकडून जो नरसंहार सुरू आहे, त्यामध्ये ऑक्टोबर २०२३ पासून आजपर्यंत ७१ हजार लोक मृत्युमुखी पडले आहेत.पाकिस्तान एकीकडे सौदी अरेबिया आणि तुर्कस्तान यांच्याबरोबर संयुक्त संरक्षण करार करत असताना, दुसरीकडे अमेरिका व इराण यांच्यात मध्यस्थाची भूमिका बजावत आहे.अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी तथाकथित 'अब्राहमकॉर्ड' वर सही करण्यासाठी सौदी अरेबियाचे मन वळवण्याचा प्रयत्न केला.ट्रंप यांच्या मते त्यामुळे इस्त्रायल आणि मुस्लिम देश यांच्यातील संबंध सुधारतील.मात्र सौदीने त्याला अद्याप प्रतिसाद दिलेला नाही. पाकिस्तान तुर्कस्तान व सौदी अरेबिया हे देश आपापसातील मतभेद बाजूला ठेवून परिस्थितीच्या रेट्यामुळे संयुक्त संरक्षण कराराच्या निमित्ताने एकत्र आले आहेत.या बाबतीत सौदीचे उदाहरण देणे गरजेचे आहे.२०१८ साली सौदीचे पत्रकार जमाल खाशोग्गी यांची इस्तंबूल (तुर्कस्तान) मधील सौदीच्या दुतावासा मध्ये हत्या करण्यात आली होती.त्या नंतर सौदी अरेबिया आणि तुर्कस्तान यांच्यातील संबंध कमालीचे बिघडले होते नंतर २०२२ मध्ये सौदीच्या पुढाकाराने हे संबंध सुधारण्यात आले.इस्त्रायलचे पंत प्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी सौदी, तुर्कस्तान आणि पाकिस्तान यांच्या एकत्र येण्याला 'सुन्नी ॲक्सिस 'असे संबोधले आहे.याचा अर्थ संयुक्त संरक्षण कराराचे निमित्त साधून, पाकिस्तान,तुर्कस्तान आणि सौदी अरेबिया हे सुन्नी मुस्लिमांची मेजॉरिटी असलेले देश एकत्र आले आहेत.तिन्ही देशांतील संयुक्त संरक्षण कराराचा फायदा त्यांना कितपत होईल या प्रश्नाचे उत्तर येणारा काळच देऊ शकेल.

**अभय गोखले**

## क्रांतीकारांचे मनोगत

व्यक्तिपेक्षा पक्ष मोठा
पक्षापेक्षा देश
हुतात्मे देती आम्हाला
हाच खरा संदेश..!

देशाच्या स्वातंत्र्यासाठी
त्यांनी गमावले सर्वस्व
त्या देशावर दिसतेय
भ्रष्ट लोकांचे वर्चस्व..!

भ्रष्टाचा-यांनी केली
देशाची ऐसी तैसी
क्रांतीदिनाच्या मुहुर्तावर
द्याना त्याहीले फाशी..!



**प्रा. अशोक सारडा,मेहकर**
मो.९४२१३९४३३९

# शिवसेना प्रकरण:आता ठोस न्यायाची गरज

महाराष्ट्राच्या राजकारणाला हादरवून सोडणाऱ्या शिवसेना प्रकरणाची सुनावणी पुन्हा सर्वोच्च न्यायालयात सुरू होत आहे. हे प्रकरण केवळ उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे या दोन गटांमधील राजकीय संघर्ष म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. या प्रकरणातून भारतीय लोकशाहीतील जनादेश, पक्षशिस्त,दलबदलविरोधी कायदा आणि घटनात्मक संस्थांच्या अधिकारांची कसोटी लागणार आहे.



निवडणुकीच्या वेळी मतदार केवळ व्यक्तीला मतदान करत नाही.तो पक्षाचे विचार,नेतृत्व, चिन्ह आणि धोरण यावर विश्वास ठेवून आपले मत देतो.त्यामुळे निवडून आल्यानंतर एखाद्या आमदाराने पक्षाच्या राजकीय भूमिकेपासून वेगळी भूमिका घेतल्यास त्याचा थेट संबंध मतदाराच्या जनादेशाशी येतो.

दहावी अनुसूची म्हणजेच Anti-Defection Law यामागचा प्रमुख उद्देश राजकीय दलबदलाला आळा घालणे हा आहे. मात्र या कायद्याच्या अंमलबजावणीत मोठा विलंब झाला तर त्याचा उद्देशच कमकुवत होण्याची शक्यता असते. म्हणूनच अशा घटनात्मक वादांमध्ये केवळ न्याय मिळणे पुरेसे नाही,तर न्याय वेळेत मिळणेही आवश्यक आहे.या प्रकरणातील विधानसभा अध्यक्षांची भूमिका देखील महत्त्वाची आहे. दहाव्या अनुसूचीनुसार आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय घेण्याचे अधिकार अध्यक्षांकडे आहेत. मात्र अध्यक्ष हे राजकीय प्रक्रियेतून निवडून येतात. त्यामुळे अशा निर्णयांवर न्यायालयीन पुनरावलोकनाची भूमिका आणि त्याच्या मर्यादा स्पष्ट असणे आवश्यक आहे.

आजचा प्रश्न केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नाही. उद्या देशातील कोणत्याही राज्यात अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणातून भविष्यासाठी स्पष्ट घटनात्मक मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करणे आवश्यक आहे.याच प्रकरणाशी संबंधित आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे गटाला अधिकृत शिवसेना म्हणून दिलेली मान्यता. एखाद्या राजकीय पक्षाची ओळख ठरवताना विधिमंडळातील बहुमत, पक्षाची संघटनात्मक रचना आणि मतदारांनी दिलेला जनादेश यांचा विचार कोणत्या पद्धतीने करायचा, हा देखील महत्त्वाचा घटनात्मक प्रश्न आहे.

सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय कोणत्याही एका गटाचा राजकीय विजय किंवा पराभव म्हणून पाहिला जाऊ नये.त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे या निर्णयातून भारतीय लोकशाहीसाठी स्पष्ट आणि दीर्घकालीन कायदेशीर तत्त्वे निश्चित झाली पाहिजेत.आज जनतेसमोर अनेक प्रश्न आहेत.आमदारांना पक्ष बदलण्याचे स्वातंत्र्य किती असावे?

दहावी अनुसूची नेमकी कोणत्या परिस्थितीत लागू होते?विधानसभा अध्यक्षांची भूमिका किती स्वतंत्र असावी?निवडणूक आयोगाने राजकीय पक्षाची ओळख कोणत्या निकषांवर ठरवावी?आणि अशा घटनात्मक वादांचा अंतिम निर्णय किती काळात झाला पाहिजे? या सर्व प्रश्नांची स्पष्ट उत्तरे मिळणे आवश्यक आहे.कारण लोकशाही केवळ निवडणुकीच्या दिवशी अस्तित्वात नसते. निवडणुकीनंतर मतदाराच्या मताचा आणि त्याच्या जनादेशाचा किती सन्मान केला जातो, यावर लोकशाहीची खरी ताकद अवलंबून असते.

म्हणूनच आज महाराष्ट्राची अपेक्षा कोणत्याही एका पक्षासाठी किंवा नेत्यासाठी नाही. अपेक्षा आहे ती स्पष्ट कायदेशीर भूमिकेची,घटनात्मक तत्त्वांची आणि जनादेशाचा सन्मान करणाऱ्या ठोस न्यायाची.शिवसेना प्रकरणाचा अंतिम निकाल भविष्यातील अनेक राजकीय आणि घटनात्मक वादांसाठी मार्गदर्शक ठरू शकतो. त्यामुळे या प्रकरणाचा निर्णय केवळ एका राजकीय संघर्षाचा शेवट न ठरता, भारतीय लोकशाहीतील दलबदलविरोधी कायद्याला अधिक प्रभावी आणि स्पष्ट करणारा टप्पा ठरला पाहिजे.आता गरज आहे ती केवळ न्यायाची नाही, तर ठोस, स्पष्ट आणि वेळेत मिळणाऱ्या न्यायाची.

**ॲड.धनंजय देशमुख**
९२८४३८२१०२

# गटारी नव्हे, 'दीप अमावास्या' !

श्रावण मासारंभाच्या आदल्या दिवशी म्हणजे आषाढ अमावास्येला अखेरचे मांसाहार आणि आणि दारू ढोसण्याची प्रथा गेल्या काही वर्षांपासून पडली आहे, काहींच्या मते या अमावास्येला 'गतहारी अमावास्या' म्हटले जाई म्हणून पुढे गतहारी शब्दाचा अपभ्रंश म्हणून 'गटारी' नाव प्रचलित झाले. गटारी या नावाला कोणताही शास्त्राधार नाही त्यामुळे हा हिंदु धर्मातील सण किंवा उत्सव नाही, तर ती केवळ एक अनिष्ट प्रथा आहे.



हिंदू धर्मात आषाढ अमावास्या ही 'दीप अमावस्या' म्हणून प्रचलित आहे. या दिवशी घरातील सर्व समया, निरांजने, दिवे स्वच्छ धुऊन पुसून सभोवती रांगोळी काढून पाटावर त्यांना आसनस्थ केले जाते. दिवे प्रज्वलित करून त्यांची मनोभावे पूजा केली जाते. त्यांना पक्वानांचा नेवैद्य दाखावला जातो.'तमसो मा ज्योतीर्गमय' म्हणजे अंधारातून प्रकाशाकडे वाटचाल करण्याची महान शिकवण दीप आपल्याला देत असतो. दीपच नसता तर मानवाचे जीवन अंधकारमय झाले असते त्यामुळे दिव्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस आहे. काळाच्या ओघाने आणि भारतीयांवरील पाश्चिमात्यांच्या प्रभावामुळे या सणावर भोगवादाचे सावट आले, परिणामी सध्याच्या ३ पिढ्यांपैकी अनेकांना या दिवसाचे खरे महत्व ज्ञात नाही. किमान नव्या पिढीला तरी आषाढ अमावास्या ही गटारी अमावास्या नसून दीप अमावस्या आहे याविषयीची माहिती ती योग्यरीत्या साजरी करूनच देऊया.

**-जगन घाणेकर**

# सिंगल स्क्रीन थिएटर्स



सिनेमाला जाणे याचा अर्थ एके काळी नीलायमला जाणे,राहुलला जाणे, अलकाला जाणे, विजयला जाणे, मंगलाला जाणे, लक्ष्मीनारायणला जाणे, प्रभातला जाणे, वेस्ट एंडला जाणे असा होता. अर्थात माझ्यासारख्या पुण्यातल्या माणसांसाठी.इतर शहरांमधल्या, गावांमधल्या माणसांसाठी ही नावे वेगळी होती. पण थिएटर ही एक स्वतंत्र व्यक्तिमत्व असणारी चीज होती. आता सिंगल स्क्रीन थिएटर्स जवळजवळ इतिहासजमा झाली आहेत.नव्वदच्या दशकापर्यंत भारतात सुमारे पंचवीस हजार सिंगल स्क्रीन थिएटर्स होती.गेल्या तीन दशकांत सुमारे वीस हजार थिएटर्स बंद पडली. आज भारतात पाच एक हजार सिंगल स्क्रीन थिएटर्स आहेत.सर्वांना परवडेल अशा दरात सिनेमा उपलब्ध करून देण्याचे काम या थिएटर्सनी केले. श्रमिक वर्गाला सिनेमा पाहता आला तो याच थिएटर्समुळे.अर्थात सिंगल स्क्रीनचा नॉस्टॅल्जिया सर्वच बाजूंनी रम्य आहे असेही नाही.काही बाबतीत सिंगल स्क्रीनचे अनुभव तापदायकही होते.पण तरी नॉस्टॅल्जिया आहे हे खरं!

माझ्यासाठी सिंगल स्क्रीनचा काळ हा अमोल पालेकर आणि विद्या सिन्हा 'जॉक्सन-तोलाराम'मध्ये नोकरीला जायचे आणि समोवरला कॉफी प्यायचे त्या काळाशी समकक्ष आहे.तो एक 'थांबलेला काळ' होता आणि आजचा काळ हा 'अजिबात न थांबणारा'काळ आहे असे वाटत राहते. आता मल्टिप्लेक्सला सरावलेलो असलो तरी काही महिन्यांपूर्वी अलकावरून जाताना अखेरीस अलका कायमचे बंद झाल्याची पाटी पाहिली तेव्हा 'एंड ऑफ ॲन एरा' असे वाटले.(आमचे इंग्लिश सिनेमाचे शिक्षण प्रामुख्याने अलकाने केले होते!).मला तर केवळ नावांमुळेच काही थिएटर्सबद्दल आपुलकी वाटायाची/वाटते. 'सपाटीकरण'(मला वाटते हा समर्पक शब्द मराठीत मिलिंद बोकीलांनी आणला आहे.टू बी कन्फर्म्ड!)होण्याच्या काळात बहुधा विशिष्ट,देशी-परदेशी संदर्भ असलेले नाव, वेगळे व्यक्तिमत्व याचे मोल वाटतेच. 'मराठा मंदिर', 'प्लाझा',' इरॉस', 'मिनर्व्हा', 'चित्रा', 'रीगल', 'एडवर्ड', 'कॅपिटोल', 'रॉयल ऑपेरा', 'न्यू एम्पायर'.... अहाहा! एकदम खणखणीत आवाज असलेली नावे! असो यावेळच्या 'काथ्याकूट' मध्ये आम्ही सिंगल स्क्रीनबाबत गप्पा मारल्या आहेत. मल्टिप्लेक्स आणि ओटीटीच्या आधीचा हा काळ कसा होता,सिंगल स्क्रीनशी जोडलेले बरे-वाईट अनुभव कोणते, प्रेक्षक आणि पडद्यामधील नाते कसे बदलत गेले अशा मुद्द्यांचा धांडोळा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

# इंधनातील भेसळीबाबत सतर्कता बाळगण्याची आवश्यकता

समाजमाध्यमावर इथेनॉल मिश्रित इंधनामुळे आपली वाहने खराब होत असल्याचे अनेक व्हिडीओ आणि पोस्ट व्हायरल होत आहेत. असे पोस्टकर्ते थेट केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांना जाब विचारत आहेत. भारतामध्ये ऐंशी टक्क्यांच्यावर इंधन आखाती देशातून आयात करावे लागते. तेथून आलेल्या कच्च्या तेलावर भारतातील रिफायनरीमध्ये प्रक्रिया केली जाते. त्यानंतर ते इंधन सामान्य ग्राहकांना वापरण्यासाठी खुले होते. इंधनाचे दर वाढतच चालल्यामुळे लोकांमध्ये त्याच्या शुद्धतेविषयी शंका निर्माण होत असाव्यात का, असाही प्रश्न उपस्थित होतो. अलीकडेच देशभरातील पेट्रोल पंपाच्या दहा हजार आकस्मिक तपासण्या आणि ८५०० हून अधिक गुणवत्ता चाचण्या केल्या गेल्या आहेत. यासाठी संपूर्ण देशात शेकडो विशेष तपासणी पथके तैनात करण्यात आली आहेत. इंधनाची गुणवत्ता ही केवळ तेल कंपन्यासाठीच नव्हे तर सामान्य ग्राहकांसाठीदेखील महत्वाचा विषय आहे. ग्राहकांना निर्धारित मानकानुसारच इंधन मिळावे यासाठी आपली पथके कार्यरत असल्याचे तेल कंपन्या सांगत आहेत. इंधनातील भेसळ किंवा कोणत्याही प्रकारच्या नियमांच्या उल्लंघनाबाबत कंपन्यांकडून पूर्णपणे पारदर्शकता अवलंबली जात असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. या मोहिमेदरम्यान दूषित इंधनाचे एकही प्रकरण समोर आले नसल्याचा दावा कंपन्या करत आहेत.

इथेनॉलच्या वापराबाबत मोठा अपप्रचार सुरु असल्याचे दिसून येत आहे. देशातील इथेनॉलचे प्रमाण किती असावे हेदेखील निश्चित करणे आवश्यक ठरते. अलीकडे त्याचे प्रमाण वाढवले असल्याचा आरोप सामान्य ग्राहकांकडून सुरु आहे.

**प्रा. मधुकर चुटे**

# चुलत भावांनीच अमोलवर झाडल्या गोळ्या; ९ तासांत पाच जण जेरबंद

## पहिल्या गोळीबारातून अमोल बचावले, पण 'जिवंत असल्याचे' कळताच आरोपी पुन्हा परतले

### पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्नही फसला, देऊळगाव राजापर्यंत पाठलाग

■ प्रतिनिधी | अकोला ■

शेतातील रस्त्याचा वाद... त्यातून पेटलेला कौटुंबिक संघष... आणि काही क्षणांतच बंदुकीच्या गोळ्यांनी हादरलेले शेतशिवार! अकोला तालुक्यातील निंबी मालोकार येथे रविवारी घडलेल्या अमोल गजानन मालोकार यांच्या हत्येने परिसरात खळबळ उडाली. धक्कादायक म्हणजे या हत्येप्रकरणी मृतकाचेच चुलत भाऊ पोलिसांच्या ताब्यात आले आहेत. घटनेनंतर आरोपींनी पलायनाचा प्रयत्न केला; मात्र स्थानिक गुन्हे शाखेने तांत्रिक तपासाची कास धरत अवघ्या नऊ तासांत पाच आरोपींना जेरबंद केले.

९ ऑगस्ट रोजी दुपारच्या सुमारास निंबी मालोकार येथील शेतशिवारात अमोल मालोकार हे आपल्या शेतात असताना त्यांचे चुलत भाऊ अजय श्रीकृष्ण मालोकार, विजय श्रीकृष्ण मालोकार आणि त्यांच्या साथीदारांमध्ये शेतातील रस्त्याच्या कारणावरून वाद झाला. सुरुवातीचा वाद काही क्षणांतच टोकाला गेला आणि आरोपींनी बंदुकीचा वापर करत अमोल मालोकार यांच्यावर गोळीबार केला. हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.(घटनेची माहिती मिळताच मृतकाचे भाऊ उमेश गजानन मालोकार यांनी पोलिसांना कळविले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाली.

दरम्यान, तपासात समोर आलेला पुढचा घटनाक्रम आणखी धक्कादायक आहे. पहिल्या हल्ल्यानंतर अमोल मालोकार यांचा मृत्यू झाला नसून ते जखमी अवस्थेत असल्याचे आरोपींना कळले. त्यानंतर आरोपी पुन्हा घटनास्थळी परतले आणि पुन्हा अमोल यांच्यावर गोळ्या झाडल्याचा पोलिसांचा दावा आहे. या वेळी मृतकाचा चुलत भाऊ ज्ञानेश्वर मालोकार याच्या समक्ष हा गोळीबार झाल्याची माहिती त्याने पोलिसांना दिली आहे. हत्येनंतर आरोपींपैकी विजय मालोकार याने स्वतः पोलिसांना खुनाची माहिती देण्याचा बनाव करून तपासाची दिशा बदलण्याचा प्रयत्न केल्याचेही पोलिसांच्या तपासात समोर आले. मात्र, पोलिसांनी या कथित माहितीवर विसंबून न राहता तांत्रिक तपास सुरू ठेवला. आरोपींच्या हालचाली आणि उपलब्ध तांत्रिक माहितीचा माग काढत पोलिसांनी तपासाची दिशा निश्चित केली.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस




अधीक्षक अर्चित चांडक यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांना फरार आरोपींना तातडीने अटक करण्याचे आदेश दिले. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेची तीन पथके तयार करण्यात आली. एका बाजूला तांत्रिक तपास सुरू असतानाच दुसरीकडे गोपनीय बातमीदारांचे जाळे सक्रिय करण्यात आले. तपासादरम्यान आरोपी उमरी परिसरात असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तेथे सापळा रचला. विजय मालोकार, विजय बुटे आणि एका विधी संघर्षग्रस्त बालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले. मात्र, अजय मालोकार आणि राजकुमार मालोकार हे दोघे पोलिसांना गुंगारा देत पुढे निघून गेले होते. तांत्रिक तपासातून हे दोघे छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने पळून जात असल्याची माहिती मिळाली. क्षणाचाही विलंब न करता पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक त्या दिशेने रवाना केले. आरोपींच्या वाहनाचा पाठलाग सुरू झाला आणि अखेर बुलडाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा येथे मध्यरात्री पोलिसांनी दोघांनाही ताब्यात घेतले. अशाप्रकारे निंबी मालोकारच्या शेतातून सुरू झालेला खुनाचा तपास उमरीमार्गे देऊळगाव राजापर्यंत पोहोचला आणि अवघ्या नऊ तासांत पाचही संशयित आरोपी पोलिसांच्या ताब्यात आले.

या प्रकरणात विजय श्रीकृष्ण मालोकार (३३), अजय श्रीकृष्ण मालोकार (३२), राजकुमार शिवचरण मालोकार (२५), विजय कैलास बुटे (३०) आणि एका विधी संघर्षग्रस्त बालकाचा समावेश आहे. विजय व अजय हे

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश देशमुख, गोपाल जाधव, पोलीस उपनिरीक्षक माजिद पठाण, विष्णू बोडखे, अनिल चव्हाण यांच्यासह पोलीस अंमलदार शेख हसन, सुलतान पठाण, महेंद्र मलीये, रवि खंडारे, अब्दुल माजिद, किशोर सोनोने, वसिमोद्दीन, उमेश पराये, अमित दुबे, भास्कर धोत्रे, फिरोजखान, एजाज अहमद, खुशाल नेमाडे, मंगेश इंगळे, स्वप्नील खेडकर, अन्सार अहमद, श्रीकांत पातोंड, भीमराव दिपके, अभिषेक पाठक, पवन डंबलकर, आकाश मानकर, धीरज वानखडे, सतीश पवार, राज चंदेल, अशोक सोनवणे, राहुल गायकवाड, मोहम्मद आमीर, चालक मनीष ठाकरे, देवानंद खरात आणि रामकिसन डोईफोडे यांनी सहभाग घेतला.

निंबी मालोकार येथील असून सध्या उमरी येथे राहत असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. राजकुमार मालोकार हा निंबी मालोकार येथील रहिवासी असून विजय बुटे हा कावसा, ता. अकोट येथील असून सध्या मोठी उमरी येथे राहत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. आरोपी गुन्हा करून पुढे पसार होण्याच्या तयारीत असताना पोलिसांनी त्यांच्या ताब्यातील स्विफ्ट डिझायर, एर्टिगा आणि बुलेट अशी तीन वाहने जप्त केली. याशिवाय पाच मोबाईल फोन आणि १ लाख ७ हजार ७६० रुपयांची रोकड असा मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे. या हत्येमागे केवळ शेतातील रस्त्याचा वाद होता की त्यामागे आणखी काही जुना कौटुंबिक किंवा जमीनविषयक वाद दडला होता, याचा तपास आता पोलिसांकडून केला जात आहे. तसेच गोळीबारासाठी वापरण्यात आलेले शस्त्र, हत्येचे पूर्वनियोजन, प्रत्येक आरोपीची नेमकी भूमिका आणि हत्येनंतर पलायनासाठी करण्यात आलेली तयारी याबाबतही तपासाची चक्रे फिरत आहेत.

या प्रकरणातील आरोपींना पुढील तपासासाठी बाळापूर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले असून भारतीय न्याय संहिता व शस्त्र अधिनियमातील विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

निंबी मालोकारच्या शेतात गोळीबाराने सुरू झालेल्या या थरारक प्रकरणाचा पोलिसांनी अवघ्या नऊ तासांत लावलेला छडा चर्चेचा विषय ठरला आहे. मात्र, पाचही आरोपी ताब्यात आल्यानंतर आता त्यांच्या चौकशीतून हत्येचा खरा सूत्रधार कोण, गोळीबारामागील नेमके कारण काय आणि या हत्येचे नियोजन किती आधीपासून करण्यात आले होते, याचा उलगडा होणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# रेल्वे स्थानकातील गांजा प्रकरणातील आरोपीला जामीन; १.१५२ किलो गांजासह पकडल्याचा आरोप

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला रेल्वे स्थानकावर १.१५२ किलो गांजासह पकडण्यात आल्याचा आरोप असलेल्या गणेश अनिल बांगर याला जिल्हा व सत्र न्यायालयाने नियमित जामीन मंजूर केला. ७ ऑगस्ट रोजी न्यायालयाने अटी व शर्तींसह जामीन अर्ज मंजूर केला.

१४ जुलै २०२६ रोजी अकोला रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर पोल क्रमांक ५८३/३१ जवळ एक युवक संशयास्पदरीत्या आढळून आला. त्याच्याकडे 'स्पाय बॅग्स' असे लिहिलेली काळ्या रंगाची बॅग होती. रेल्वे सुरक्षा दलाच्या पथकाने त्याची तपासणी केली असता बॅगेत खाकी रंगाच्या सेलोटेपने गुंडाळलेले तीन

### जिल्हा व सत्र न्यायालयाचा आदेश

बंडल आढळून आले. या बंडलांमध्ये बिया, फुल व काडीसह ओला गांजा असल्याचे तपासणीत निष्पन्न झाल्याचे पोलिसांच्या फिर्यादीत नमूद आहे. जप्त केलेल्या गांजाचे वजन १.१५२ किलो असून त्याची किंमत २ लाख ५७ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. याप्रकरणी गणेश बांगर याच्याविरुद्ध NDPS कायद्यातील कलम २०(बी) (ii) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी गणेश बांगर याच्या वतीने ॲड. विशाल घुगे आणि ॲड. श्रीकांत बी. वाहूरवाघ यांनी जिल्हा व सत्र न्यायालयात नियमित जामिनासाठी अर्ज दाखल केला. सुनावणीदरम्यान ॲड. श्रीकांत बी. वाहूरवाघ यांनी आरोपीच्या बाजूने युक्तिवाद केला. न्यायालयाने बचाव पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरत ७ ऑगस्ट रोजी अटी व शर्तींसह नियमित जामीन मंजूर केला. या प्रकरणात ॲड.यथार्थ आर. वानखडे, ॲड. वैष्णवी हागोने तसेच ज्युनिअर अमोल धारपवार यांनी सहकार्य केले.

**Change In Name**

I Have Change My Name in My Passport No is K6774464 From **PRAVEENKUMAR SWAROOPCHAND AGRAWAL** --TO-- **PRAVIN SWARUPCHAND AGRAWAL** My Residential Address is - Sr. 26/1A, Plot No 3/4, Gaurakshan Road Laxmi Narayan temple Agrasen Nagar Akola Maharashtra 444001.

**Change In Name**

I Have Change My (Wife Name) in My Passport No is K6774464 From **RUPALI PRAVEENKUMAR AGRAWAL** -- TO -- **RUPALI PRAVIN AGRAWAL** My Residential Address is - Sr. 26/1A, Plot No 3/4, Gaurakshan Road Laxmi Narayan temple Agrasen Nagar Akola Maharashtra 444001.

# कोहा (कुंड) येथे जागतिक आदिवासी दिन उत्साहात; कोरकू भाषेतून मार्गदर्शन



### शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | अकोट ■

निसर्गाच्या कुशीत वसलेल्या अकोट तालुक्यातील कोहा (कुंड) येथे ९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. बिरसा क्रांती ग्रुप आणि अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे जिल्हाध्यक्ष अजाबराव उईके यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमाला गावातील आदिवासी महिला व पुरुषांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात भगवान बिरसा मुंडा आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन व अभिवादन करून करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे जिल्हा कार्याध्यक्ष दिगंबर सोळंके (वस्ताद), गुलघाट ग्रामपंचायतीचे सरपंच प्रकाशराव डाखोरे, समाजसेवक विठ्ठलराव मडावी, राहुल सोळंके, बळीराम कास्देकर, राजपाल बडगे, शंकर बागळे आणि केन्डे कास्देकर उपस्थित होते. मान्यवरांचा हार व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रस्तावक तथा अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे तालुकाध्यक्ष हिरालाल कास्देकर यांनी प्रास्ताविकातून उपस्थितांचे स्वागत केले. विशेष म्हणजे त्यांनी कोरकू भाषेतून संवाद साधत आदिवासी समाजाच्या प्रश्नांवर आणि समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक असलेल्या बाबींवर मार्गदर्शन केले. यावेळी दिगंबर सोळंके यांनी आदिवासी संस्कृती, परंपरा, संस्कार तसेच जागतिक आदिवासी दिनाचे महत्त्व विशद केले. आदिवासी समाजातील मुला-मुलींनी शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देऊन पुढे आले पाहिजे. समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी एकमेकांना सहकार्य करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन विठ्ठलराव मडावी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशाल ढीगर, सुनील बेलसरे, सुरेश दारशिंबे, दुवेश भिलावेकर आणि रतीराम कास्देकर यांनी परिश्रम घेतले. यावेळी नानाकरम कास्देकर, हरी धुर्वे, रामा कास्देकर, सतीश भिलावेकर, बंशीलाल ढीगर, गोपाल मावस्कर, तुळशीराम ढीगर, आजीलाल कास्देकर, मुजीलाल ढीगर, फुलचंद बेलसरे, पवन ढीगर, अजय दारशिंबे, विनोद धुर्वे यांच्यासह गावातील महिला व पुरुष नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २४२**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# कोट्यवधींच्या भूखंडाचा वाद पेटला; मध्यस्थी करणा-या दलालांनाच मारहाण?

## वाशिम बायपासवरील कथित प्रकाराने व्यापारी वतुर्ळात खळबळ

### 'व्हाइट कॉलर' व्यवहारात गावगुंडांचा शिरकाव? पोलिस यंत्रणा मात्र अनभिज्ञ

■ विशेष प्रतिनिधी ■

**अकोला :** शहराच्या वाढत्या विस्तारासोबत जमिनींच्या व्यवहाराला कोट्यवधींची उलाढाल प्राप्त झाली आहे. मात्र, या व्यवहारांमध्ये कायदेशीर कागदपत्रे, मालकी हक्क आणि ताब्याचे प्रश्न निर्माण झाल्यानंतर काही ठिकाणी 'व्हाइट कॉलर' व्यवहारात गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींचा हस्तक्षेप होत असल्याची चर्चा सुरू आहे. वाशिम बायपाससमोरील धाबेकर फॉर्म हाऊस परिसरातील कोट्यवधी रुपये बाजारमूल्य असलेल्या एका भूखंडाच्या वादाने याच चर्चेला पुन्हा तोंड फुटले आहे.

गत आठवड्यात या भूखंडाच्या वादातून ऐन रहदारीच्या ठिकाणी मध्यस्थीची बैठक झाल्याची माहिती असून, बोलणी फिस्कटल्यानंतर मध्यस्थी करणाऱ्या दलालांनाच कथितरीत्या मारहाण करण्यात आल्याची चर्चा व्यापारी व दलालांच्या वर्तुळात आहे. विशेष म्हणजे, या प्रकाराची अधिकृत पोलिस नोंद झाल्याचे अद्याप समोर आलेले नसले तरी घटनेची शहरातील विविध वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे.

#### वाद मिटविण्यासाठी बैठक; वातावरण तापले

व्यवहार घडवून आणण्यात मध्यस्थीची भूमिका बजावणाऱ्या काही दलालांनी हा वाद चर्चेतून मिटविण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले जाते. त्यासाठी संबंधित भूखंडाच्या ठिकाणीच बैठक आयोजित करण्यात आल्याची माहिती आहे. मात्र, चर्चेदरम्यान वातावरण तापल्याचे आणि दोन्ही पक्षांमध्ये शाब्दिक वाद झाल्याचे सांगितले जाते. त्यानंतर खरेदीदार पक्षासोबत आलेल्या काही व्यक्तींनी मध्यस्थी करणाऱ्या दलालांशी हुज्जत घालत त्यांच्यावर हात उगारल्याची चर्चा आता शहरात रंगली आहे.

या कथित प्रकारामुळे काही काळ परिसरातील व्यापारी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचेही सांगितले जाते. विशेष म्हणजे, कोट्यवधी रुपयांच्या व्यवहारातील वाद मिटविण्यासाठी गेलेल्या मध्यस्थांनाच कथितरीत्या मारहाण होत असेल, तर जमीन व्यवहाराच्या आडून कायदा हातात घेण्याचे धाडस नेमके कुणाच्या बळावर केले जात आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.

#### 'व्हाइट कॉलर' व्यवहारात गावगुंडांचा हस्तक्षेप?

जमिनींचे व्यवहार हे सामान्यतः कागदपत्रे, कायदेशीर प्रक्रिया आणि आर्थिक देवाणघेवाणीच्या माध्यमातून होणे अपेक्षित असतात. मात्र, कोट्यवधींच्या व्यवहारात वाद निर्माण झाल्यानंतर कायदेशीर मार्गाऐवजी दबाव, दहशत किंवा बळाचा वापर होत असल्याची चर्चा असेल तर ही बाब केवळ दोन पक्षांमधील वाद न राहता कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ठरू शकतो. वाशिम बायपासवरील कथित घटनेनंतर व्यापारी वर्तुळात काही व्यक्तींच्या नावांचीही चर्चा सुरू झाली आहे. तथापि, संबंधित व्यक्तींची भूमिका किंवा कथित मारहाणीतील सहभाग अधिकृतरीत्या सिद्ध झालेला नसल्याने त्याबाबत पोलिस तपासातूनच वस्तुस्थिती स्पष्ट होणे आवश्यक आहे.

#### व्यवहार कोट्यवधींचा, वाद मात्र ताब्यावरून?

मिळालेल्या माहितीनुसार, वाशिम बायपाससमोरील धाबेकर फॉर्म हाऊसजवळील एका मौल्यवान भूखंडाचा व्यवहार दोन व्यापारी पक्षांमध्ये ठरल्याची चर्चा आहे. संबंधित जागेचे बाजारमूल्य कोट्यवधी रुपयांमध्ये असल्याने या व्यवहाराकडे व्यापारी आणि जमीन व्यवहारातील मध्यस्थांचे लक्ष होते. मात्र, व्यवहार अंतिम टप्प्यात असतानाच काही कारणामुळे त्यात अडथळा निर्माण झाल्याचे सांगितले जाते. त्यानंतर खरेदीदार पक्षाकडून संबंधित जागेवर अनधिकृतरीत्या ताबा मिळविण्याचा प्रयत्न झाल्याची चर्चा आहे. जागेचा ताबा, व्यवहारातील अटी आणि आर्थिक देवाणघेवाण या मुद्द्यांवरून दोन्ही बाजूंमध्ये मतभेद निर्माण झाल्याचे समजते.

#### पोलिसांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह

या संपूर्ण प्रकरणात सर्वात गंभीर बाब म्हणजे कथित घटना सार्वजनिक ठिकाणी घडल्याची चर्चा असूनही त्याची अधिकृत नोंद पोलिसांकडे झाल्याचे समोर आलेले नाही. जर खरोखरच मध्यस्थी करणाऱ्या व्यक्तींवर मारहाण झाली असेल, तर त्यामागील कारण काय? संबंधित भूखंडाचा ताबा नेमका कुणाकडे आहे? व्यवहारातील आर्थिक देवाणघेवाण किती झाली? अनधिकृत ताब्याचा प्रकार घडला आहे का? आणि या सर्व प्रकरणात बाहेरील व्यक्तींचा हस्तक्षेप कितपत आहे, याची चौकशी होणे गरजेचे आहे. जमिनीच्या वादातून अकोला शहर व परिसरात यापूर्वीही गंभीर गुन्हे घडल्याच्या घटना आहेत. त्यामुळे कोट्यवधींच्या भूखंडाचा वाद, कथित अनधिकृत ताबा आणि मध्यस्थांशी झालेला वाद या घटनाक्रमाकडे केवळ व्यावसायिक वाद म्हणून दुर्लक्ष करणे भविष्यात महागात पडू शकते.

#### वाद वाढण्यापूर्वी पोलिसांनी 'फॉलोअप' करणे गरजेचे

सध्या या प्रकरणाबाबत शहरात चर्चांना उधाण आले असले तरी अधिकृत तक्रार किंवा गुन्हा दाखल झाला नसल्यास पोलिसांना स्वतःहून कारवाईची मर्यादा असू शकते. मात्र, एखाद्या मौल्यवान भूखंडाच्या वादातून तणाव वाढत असल्याची माहिती पोलिसांच्या निदर्शनास येत असेल, तर संबंधित पक्षांची माहिती घेणे, घटनाक्रमाची पडताळणी करणे आणि कायदा हातात घेणाऱ्यांना वेळीच इशारा देणे आवश्यक ठरते. अन्यथा, आज मध्यस्थीच्या बैठकीत झालेला कथित वाद उद्या हाणामारीत आणि त्यानंतर गंभीर गुन्ह्यात रूपांतरित होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

#### 'जागेचा वाद' की मोठ्या खेळीची सुरुवात?

कोट्यवधींच्या भूखंडाचा व्यवहार, त्यानंतर निर्माण झालेला ताब्याचा कथित वाद, मध्यस्थीचे प्रयत्न आणि त्यातून दलालांनाच कथितरीत्या मारहाण—या संपूर्ण घटनाक्रमामुळे अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत.

#### या भूखंडाची मूळ मालकी कोणाची?

व्यवहाराची कायदेशीर स्थिती काय? ताबा कोणाकडे आहे? व्यवहारात आर्थिक देवाणघेवाण झाली आहे का? अनधिकृत ताब्याचा आरोप खरा आहे का? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, या वादात गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींचा हस्तक्षेप झाला आहे का? या प्रश्नांची उत्तरे तपासातूनच समोर येतील. मात्र, शहरात सुरू असलेल्या चर्चांची पोलिसांनी गांभीर्याने दखल घेऊन वस्तुस्थितीची पडताळणी केली, तर संभाव्य मोठी घटना वेळीच टाळता येऊ शकते. कोट्यवधींच्या मालमत्तेचा वाद असला तरी कायदा आणि सुव्यवस्था कोणाच्याही पैशापेक्षा किंवा दबावापेक्षा मोठी आहे, हे स्पष्ट करण्याची वेळ पोलिसांसमोर आली आहे.

### जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०६५/२०२६ — प्रोसेस नं.८७८०/२०२६
चौ.ता. १९/०८/२०२६ — दिनांक : १४/०७/२०२६

**अर्जदार :** १ १. स्वप्नाली अवधूत तेल्हारकर २. अनुज अवधूत तेल्हारकर दोघेही रा. साई वाटिका अपार्टमेंट, स्टेशन रोड, आयुर्वेद हॉस्पिटल जवळ, जुना राधाकिसन प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अवधूत महादेवराव तेल्हारकर
**पत्ता :-** रा. साई वाटिका अपार्टमेंट, स्टेशन रोड, आयुर्वेद हॉस्पिटल जवळ, जुना राधाकिसन प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अवधूत महादेवराव तेल्हारकर यांचे दि. ३०/०९/२०२४ रोजी आयकॉन हॉस्पिटल, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १४/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२२६/२०२६ — प्रोसेस नं.९६९३/२०२६
चौ.ता. १९/०९/२०२६ — दिनांक : २९/०७/२०२६

**अर्जदार :** १. विठ्ठल महादेव तराळे २. पुरूषोत्तम महादेव तराळे नं. १ व २ रा. पाळोदी, पोस्ट खांबोरा, ता. जि. अकोला. ३. मंगला मनोहर वानखडे रा. टाकळी बु, पोस्ट चोहोट्टा, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. महादेव तुळशीराम तराळे २. दुर्गाताई महादेव तराळे
**पत्ता :-** रा. पाळोदी, पोस्ट खांबोरा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत महादेव तुळशीराम तराळे यांचे दि. २८/०७/२०१० रोजी व मयत दुर्गाताई महादेव तराळे यांचे दि. २९/०३/२०२६ रोजी राहते घरी पाळोदी, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. १९/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९७१/२०२६ — प्रोसेस नं.८०६२/२०२६
चौ.ता. १५/०९/२०२६ — दिनांक : २९/०६/२०२६

**अर्जदार :** १. देवकाबाई मधुकर भांबेरे २. सचिन मधुकर भांबेरे ३. दत्तात्रय मधुकर भांबेरे सर्व रा. मु. धामणा, पोस्ट खांबोरा बु. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : मधुकर देविदास भांबेरे
**पत्ता :-** रा. मु. धामणा, पोस्ट खांबोरा बु. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मधुकर देविदास भांबेरे यांचे दि. २३/०५/२०२६ रोजी धामणा. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १५/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# आयुष्मान कार्ड नोंदणीसाठी शहरीभागात वार्डनिहाय मोहिम राबवा

## जिल्हास्तरीय एकात्मिक आरोग्य वर्धीनी समितीचा आढावा



**वर्धा/जनमाध्यम**

आयुष्मान भारत जनआरोग्य योजना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची महत्वाकांक्षी योजना आहे. या योजनेतून सर्वसामान्य नागरिकांना विनामुल्य आरोग्य सुविधा उपलब्ध होतात. त्यामुळे जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिक योजनेंतर्गत पात्र होण्यासाठी शहरी भागात वार्डनिहाय मोहिम राबवा, अशा सूचना पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात पालकमंत्र्यांनी जिल्हास्तरीय एकात्मिक आरोग्य वर्धीनी समितीचा आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी या सूचना केल्या. बैठकीला आ.सुमित वानखेडे, जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुमंत वाघ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्नील बेले, कुष्ठरोगचे सहाय्यक संचालक डॉ.रा.ज. पराडकर यांच्यासह सर्व वैद्यकीय अधीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यात आयुष्मान कार्ड नोंदणीचे ग्रामीण भागातील प्रमाण ९० टक्केपेक्षा अधिक आहे. परंतू शहरी भागात नोंदणी कमी असल्याने ही नोंदणी वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. शहरी भागात नगरसेवकांना सोबत घेऊन त्यांच्या सहकार्याने वार्डनिहाय मोहिम राबविणे अधिक उपयुक्त ठरेल. यासाठी जिल्ह्यातील सर्व नगरसेवक, तहसिलदार, गटविकास आधिकारी, मुख्याधिकारी यांची स्वतंत्र बैठक घेण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

जिल्ह्यातील शासकीय आरोग्य संस्थांमधील आरोग्य सुविधा अधिक अद्यावत कशा करता येतील तसेच या संस्थांसाठी कोणत्या पायाभूत सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे, याबाबत सविस्तर प्रस्ताव करण्यात यावा. याबाबत आरोग्यमंत्र्यांची भेट घेऊन सुविधांच्या पुर्ततेसाठी त्यांच्याकडे पाठपुरावा करु. जिल्ह्यातील रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकारी, आवश्यक आरोग्य कर्मचारी उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्याची खात्री विभागाने करावी. ज्याज्या ठिकाणी शस्त्रक्रियागृह आहेत, ते सुस्थितीत आणि वापरात असणे आवश्यक असल्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी केल्या.

बहुतांश प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये सोलर यंत्रणा बसविण्यात आली आहे, परंतू वानरांच्या उपद्रवामुळे काही ठिकाणी ही यंत्रणा नादुरुस्त होते. सोलर बसवितांनाचा संबंधित कंत्राटदाराने दहा वर्ष या यंत्रणेची देखभाल दुरुस्ती करावी, अशी अट ठेवण्यात यावी. यापुढे सोलर बसवितांना संरक्षक पिंजरा त्याभोवती असावा, अशी तरतूद करण्यात यावी. जिल्ह्याला क्षयरोगमुक्त करण्यासाठी डिसेंबर अखेरचे उद्दिष्ट ठेवण्यात यावे, असे निर्देशही पालकमंत्र्यांनी दिले

केंद्र शासनाच्या नव्या व्हीबीजी रामजी या योजनेतून आरोग्य संस्थांची दुरुस्ती, वॉल कम्पाऊंडसारखी कामे करता येऊ शकतात. त्यामुळे या योजनेतून कामे प्रस्तावित करावी, असे आ.वानखेडे म्हणाले. आष्टी तालुक्यात आणखी एक १०८ रुग्णवाहिका उपलब्ध करून द्यावी, कारंजा येथील ट्रॉमा केअर सेंटर पुर्ण क्षमतेते कार्यान्वित व्हावे, आर्वी येथे वैद्यकीय अधिकारी पदे देण्यात यावी, उपजिल्हा रुग्णालयांमध्ये बायोमेट्रीक प्रणाली बसवावी, असे आ.वानखेडे म्हणाले. सुरुवातीस जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुमंत वाघ यांनी जिल्ह्याच्या आरोग्य विषयक कामकाजाचा आढावा सादर केला.

सेवाग्रामच्या मातीतून 'चले जाव'चा विचार

# प्रहारच्या २५ व्या ऑगस्ट क्रांती मॅरेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद



**वर्धा/जनमाध्यम**

'चले जाव' चळवळीच्या ८५व्या वर्धापनदिनानिमित्त प्रहार समाज जागृती संस्थेच्या वतीने आयोजित २५ व्या ऑगस्ट क्रांती मॅरेथॉनला रविवारी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शालेय, महाविद्यालयीन आणि खुल्या गटातील तब्बल ३२५ धावपटूंनी सहभाग नोंदवत सेवाग्रामच्या क्रांतिकारी भूमीला धावण्याच्या माध्यमातून मानवंदना दिली. विकास भवन येथे झालेल्या बक्षीस वितरण समारंभात पालकमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले, सेवाग्राम-वर्धा ही चले जाव चळवळीची वैचारिक भूमी आहे. तरुण पिढीला इतिहास, राष्ट्रभक्ती आणि क्रीडेशी जोडणारे उपक्रम गरजेचे असून पालक, प्रशिक्षक व संस्था करीत असलेले प्रयत्न कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खा.रामदास तडस होते. त्यांनी खेळाडूवृत्तीमुळे व्यक्ती सक्रिय, स्पर्धात्मक आणि सकारात्मक बनते. अशा उपक्रमांतून भावी सुजाण नागरिक घडतात, असे सांगितले. ६ किलोमीटर पुरुष खुल्या गटात ऋषिकेश नरताम, श्रीराम व मंथन घुडे यांनी अनुक्रमे प्रथम तीन क्रमांक मिळविले. ४ किलोमीटर महिला खुल्या गटात नंदिनी सावरकर, सेजल चौधरी व रागिनी मांढवे यांनी बाजी मारली. तीन किलोमीटर शालेय मुलांच्या गटात काव्य भिसे, कुलभूषण लोखंडे व अधिराज पहाडे, तर दोन किलोमीटर मुलींच्या गटात हर्षिता मांढवे, पायल राऊत व निधी भिवणगडे विजेते ठरले. यावेळी डॉ. भोयर, रामदास तडस, दूरदर्शन प्रतिनिधी उज्वला सचिन घोडे व सुबेदार अशोक सातपुते यांचा ऑगस्ट क्रांती सन्मानचिन्हा'ने गौरव करण्यात आला. एनसीसी छात्र सैनिकांनी सादर केलेल्या देशभक्तीपर गीतांवरील नृत्याने वातावरण भारावून गेले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पोलिस, वाहतूक विभाग व जिल्हा रुग्णालयाचे सहकार्य लाभले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## संक्षिप्त

### क्षुल्लक कारणातून मारहाण

**वर्धा-**क्षुल्लक कारणातून झालेल्या वादात ७३ वर्षीय इसमास दोघांनी मारहाण केल्याची घटना हिरापूर (तळणी) येथे घडली. रमेश दशरथ राऊत हे घरासमोरील रस्त्यावर उभे असताना जितेंद्र चिंचे आणि कोशिक गोले यांनी त्यांच्याशी वाद घालत मारहाण केली.या मारहाणीत राऊत जखमी झाले. घटनेनंतर त्यांनी पुलगाव पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी जितेंद्र चिंचे आणि कोशिक गोले यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. क्षुल्लक कारणातून झालेल्या या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

### लेन बदलताना निष्काळजीपणा

**वर्धा-**लेन बदलताना इंडिकेटर न देता भरधाव वेगाने वाहन चालविल्याने झालेल्या अपघातात चौघे जखमी झाले. हा अपघात रामपूर फाट्याजवळ घडला. चंद्रपूर येथील दिनेशकुमार मलावी हे नातेवाइकांसह एमएच ४९ बीडब्ल्यू ८४५१ क्रमांकाच्या वाहनाने नागपूरकडे जात होते. दरम्यान, एमएच ४० बीएल ५९७४ क्रमांकाच्या वाहनचालकाने कोणताही इंडिकेटर न देता अचानक लेन बदलली. भरधाव आणि निष्काळजीपणे वाहन चालविल्याने दोन्ही वाहनांची धडक झाली. या अपघातात दिनेशकुमार मलावी, त्यांची पत्नी, मावशी आणि मुलगी जखमी झाले. याप्रकरणी मलावी यांच्या तक्रारीवरून समुद्रपूर पोलिसांनी संबंधित वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### काठीने मारहाण; युवक जखमी

**वर्धा-**क्षुल्लक कारणातून शिवीगाळ करीत युवकास काठीने मारहाण करण्यात आल्याची घटना अंतरगाव येथे घडली.शुभम देवेंद्र आस्कर (२७) हा गावात असताना विजय गणवीर याने त्याच्याशी क्षुल्लक कारणावरून वाद घातला.वाद वाढल्यानंतर गणवीर याने शिवीगाळ करीत आस्कर याला काठीने मारहाण केली. या घटनेत शुभम आस्कर याला दुखापत झाली.घटनेनंतर त्याने सेलू पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीची दखल घेत पोलिसांनी विजय गणवीर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. क्षुल्लक कारणातून झालेल्या या मारहाणीमुळे परिसरात चर्चा सुरू झाली आहे.

### दुचाकीच्या धडकेत भावाचा मृत्यू, बहिण जखमी

**वर्धा-**दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात युवकाचा मृत्यू झाला, तर त्याची बहिण जखमी झाली. हा अपघात मिरापूर शिवारात घडला. वरुड जहागीर येथील हर्षल बंडुजी घोडाम (२३) हा बहिणीसह एमएच २९ बीटी ३४३९ क्रमांकाच्या दुचाकीने वर्ध्याकडे जात होता. दरम्यान, वायगावकडून येणाऱ्या एमएच ३५ एएल ४७१४ क्रमांकाच्या दुचाकीने हर्षलच्या दुचाकीला धडक दिली.

# रानभाज्यांच्या स्वादाने पारगोठाणात रंगला महोत्सव

## आदिवासी दिनाचे औचित्य साधून पारंपरिक खाद्यसंस्कृतीचे दर्शन



**आर्वी/जनमाध्यम**

राष्ट्रीय आदिवासी दिनाचे औचित्य साधून आर्वी तालुक्यातील पारगोठाण ग्रामपंचायत कवाडी येथे रानभाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. निसर्गाच्या सानिध्यात वाढणाऱ्या आणि औषधी गुणधर्मांनी समृद्ध असलेल्या रानभाज्यांचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित या महोत्सवाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

महोत्सवात गावातील शिवराय किशोर गट आणि नम्रता किशोरी गटातील मुलांनी विविध पारंपरिक रानभाज्यांचे पदार्थ तयार करून आणले होते. अंबाडीची भाकर, अंबाडीची चटणी, धोप्याच्या पानाचे वडे, बांबूची भाजी आणि कटुल्याची भाजी यासह विविध रानभाज्यांनी महोत्सवाची रंगत वाढविली. मुलांनी स्वतः तयार केलेल्या या पदार्थांचे उपस्थित मान्यवर आणि ग्रामस्थांनी आस्वाद घेत त्यांचे कौतुक केले.

कार्यक्रमाला ग्रामपंचायत कवाडीचे उपसरपंच अविनाश आत्राम, पोलीस पाटील मुकुंद इरपाचे आणि अंगणवाडी सेविका पंछफुला तलांजी यांची प्रमुख उपस्थिती होती.स्वराज्य मित्र सामाजिक संस्थेचे ईशान पोकळे आणि प्रिया गेडे यांनीही उपस्थित राहून उपक्रमाचे कौतुक केले.

यावेळी मान्यवरांनी रानभाज्यांचे आरोग्यदायी महत्त्व विशद केले. रासायनिक पदार्थांचा वाढता वापर आणि बदलती जीवनशैली लक्षात घेता नैसर्गिक व पौष्टिक रानभाज्यांचा आहारात समावेश करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. पारंपरिक खाद्यसंस्कृती आणि निसर्गसंपत्तीचे जतन करण्याचा संदेश देणारा हा महोत्सव उत्साहात पार पडला.

# कर्जमाफीच्या लाभासाठी शेतकऱ्यांच्या चकरा थांबवा

## मृत शेतकऱ्यांच्या कुटुंबांना न्याय द्या, अमर काळेंची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी



**वर्धा/जनमाध्यम**

शेतकरी कर्जमाफीची घोषणा झाली, मात्र योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना पुन्हा कागदपत्रे आणि कार्यालयांच्या फेऱ्यांत अडकविले जात असेल तर कर्जमाफीचा अर्थ काय असा थेट प्रश्न उपस्थित होत आहे. मयत शेतकऱ्यांच्या वारसांची नोंद झालेली नसणे, केवायसी अपूर्ण असणे आणि बँक खात्याशी संबंधित त्रुटींमुळे अनेक पात्र कुटुंबे कर्जमाफीपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खा.अमर शरदराव काळे यांनी अमरावती आणि वर्धा जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देत प्रशासनाला धारेवर धरले आहे.

सावित्रीबाई फुले शेतकरी कर्जमाफी योजनेचा लाभ शेवटच्या पात्र शेतकऱ्यापर्यंत पोहोचला पाहिजे. विशेषतः कर्जबाजारी शेतकऱ्याचा मृत्यू झाल्यानंतर त्याच्या कुटुंबावर आर्थिक संकट अधिकच गंभीर होते.अशा वेळी वारसांची नोंद वेळेत न झाल्याने कर्जमाफीची प्रक्रिया थांबणे म्हणजे संकटात सापडलेल्या कुटुंबावर अन्यायच आहे.

खा.काळे यांनी ७ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून गावपातळीवर विशेष शिबिरे आयोजित करण्याची मागणी केली आहे.या शिबिरांमध्ये मृत शेतकऱ्यांच्या वारसांची नोंद, केवायसी प्रक्रिया, बँक खात्यातील त्रुटी आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता एकाच ठिकाणी करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांना तहसील कार्यालय, बँक आणि अन्य विभागांच्या चकरा मारायला लावण्याऐवजी प्रशासनाने गावात जाऊन समस्या सोडवावी, अशी भूमिका खासदार काळे यांनी मांडली आहे. कर्जमाफीची घोषणा कागदावर राहता कामा नये. पात्र शेतकरी आणि त्यांच्या वारसांच्या हातात प्रत्यक्ष कर्जमुक्तीचा आधार पोहोचला पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. प्रशासनाने या मागणीची तातडीने दखल घेऊन गावागावांत विशेष शिबिरे घेऊन प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करावा, अशी मागणी आता जोर धरत आहे.

# घराचे कुलूप तोडून हजारांचा ऐवज लंपास

**वर्धा-**घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी सोन्याच्या दागिन्यांसह ५६ हजार १०० रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना विक्रमशिला नगर, सिंदी (मेघे) परिसरात घडली. प्रज्ञा डांगरे यांच्या घराच्या दरवाजाचे कुलूप तुटलेले आढळून आले. घरात प्रवेश करून पाहणी केली असता साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसले. चोरट्यांनी घरातील मंगळसूत्रे, सोन्याची चेन, सोन्याचे मनी, सोन्याची अंगठी असा एकूण ५६ हजार १०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. घटनेची माहिती मिळताच डांगरे यांनी रामनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. परिसरातील चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# तीर्थयात्रेतून जपली संस्कारांची नाळ

## मारकंडेश्वर धामच्या यात्रेत १५० भाविकांचा सहभाग



**वर्धा/जनमाध्यम**

तीर्थयात्रा म्हणजे केवळ देवदर्शन नव्हे, तर संस्कृती, संस्कार आणि माणसामाणसांतील नाती अधिक घट्ट करणारा प्रवास असतो. बदलत्या जीवनशैलीत ताणतणाव दूर करून मनाला प्रसन्नता देतानाच नव्या पिढीला आपल्या संस्कृतीशी जोडण्यासाठी अशा धार्मिक यात्रांची गरज आहे, असे मत माहेश्वरी मंडळ वर्धाचे अध्यक्ष नंदकिशोर भूतडा यांनी व्यक्त केले.

माहेश्वरी मंडळाच्या वतीने रविवारी विदर्भातील प्रसिद्ध मारकंडेश्वर धाम येथे एकदिवसीय तीर्थयात्रेचे आयोजन करण्यात आले. पहाटे ५ वाजून ३० मिनिटांनी सुरू झालेली ही यात्रा रात्री २ वाजता वर्ध्यात परतल्यानंतर संपन्न झाली. यात्रेत १५० हून अधिक समाजबांधव सहभागी झाले. विशेष म्हणजे महिला आणि युवकांची लक्षणीय उपस्थिती ही यात्रेचे प्रमुख आकर्षण ठरली.

यात्रेदरम्यान चितपल्ली येथील हनुमान मंदिर, चंद्रपूरचे महाकाली मंदिर, श्री बालाजी मंदिर तसेच वैनगंगा नदीकाठी वसलेल्या लघु काशी मारकंडेश्वर धाम येथे भाविकांनी दर्शन घेतले. भजन कीर्तनामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला.

यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी तीन बस, पायलट वाहन, अल्पोपहार, भोजन, विश्रांती आणि सुरक्षेची चोख व्यवस्था करण्यात आली होती. गडचिरोलीचे नंदकिशोर काबरा यांनी मारकंडेश्वर येथे विशेष सहकार्य केले. तसेच दामोदर सारडा यांच्या फार्महाउसवर भाविकांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली.

तीर्थ म्हणजे केवळ दगड नाही, ते आपल्या पूर्वजांच्या आस्थेचे प्रतीक आहे. अशा यात्रांमुळे समाज एकत्र येतो आणि नव्या पिढीची संस्कारांशी नाळ जोडली जाते, असे मंडळ समन्वयक राजकुमार जाजू यांनी सांगितले. सचिव हरीश गांधी यांनी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

# हिंगणघाट येथे ४०० खाटाच्या रुग्णालयाचे भूमिपूजन

## उपचारासाठी नागपूर-वर्धा येथे जाण्याची गरज भासणार नाही : मेघना साकोरे-बोर्डीकर

पान १ वरून

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील प्रत्येक शेवटच्या घटकापर्यंत मोफत व दर्जेदार आरोग्य सुविधा पोहोचवण्याचे काम सुरू आहे. आयुष्मान भारत आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून नागरिकांना ५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार मिळत आहेत. आमदार समीर कुणावर यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे हिंगणघाटमध्ये मोफत डायलिसिस आणि सिटीस्कॅन सुविधा आधीच सुरू झाली. आता ४०० खाटांचे रुग्णालय आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभे राहत असल्याने या भागातील रुग्णांना स्थानिक स्तरावरच चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध होती, असा विश्वास आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी व्यक्त केला.



### ४०० खाटांचे रुग्णालय हिंगणघाटच्या विकासातील मैलाचा दगड: डॉ.पंकज भोयर

हिंगणघाट, समुद्रपूर आणि लगतच्या ग्रामीण भागातील सुमारे ३०० गावांचा विचार करता येथे मोठे रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयाची नितांत गरज होती. आमदार समीर कुणावार यांनी स्वतः मंत्रालयाच्या पातळीवर पाठपुरावा करून हा मोठा प्रकल्प मतदारसंघासाठी मंजूर करून आणाला. अत्याधुनिक सुविधा असलेले ४०० खाटांचे रुग्णालय हिंगणघाटच्या विकासातील मैलाचा दगड ठरेल, पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी सांगितले. नागरिकांना आरोग्य योजनांचा पूर्ण लाभ मिळावा यासाठी नगरपरिषदेच्या माध्यमातून शहरी भागात 'आयुष्मान भारत कार्ड' नोंदणीची विशेष मोहीम राबविण्यात येणार असल्याचे पालकमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

### हिंगणघाटकरांच्या स्वप्नांची पूर्ती : आ.समीर कुणावार

हिंगणघाटमध्ये ४०० खाटांचे रुग्णालय आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारण्याचे गेल्या २० ते २५ वर्षांपासून पाहिलेले स्वप्न अखेर साकार होत असल्याने हा स्वप्नपूर्तीचा दिवस आहे. हा दिवस हिंगणघाटच्या विकासाच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाल्यानंतर हिंगणघाटसह समुद्रपूर आणि परिसरातील ग्रामीण नागरिकांना मोठा फायदा होईल.

गंभीर आजारांच्या उपचारासाठी रुग्णांना इतरत्र जाण्याची गरज भासणार नाही, स्थानिक पातळीवरच दर्जेदार उपचार उपलब्ध होतील, असे आ.कुणावार म्हणाले. यावेळी नगराध्यक्षा डॉ. नयना तुळसकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.सुमंत वाघ यांनी केले.

### ४०० खाटांच्या रुग्णालयातील सुविधा

हिंगणघाट येथे आ.समीर कुणावार यांच्या प्रयत्नाने ४०० खाटांचे रुग्णालय मंजूर झाले आहे. हे रुग्णालय जवळपास ३०,७६६ चौरस मीटर क्षेत्रफळात १५१ कोटी १० लक्ष रुपये खर्च करुन बांधण्यात येणार आहे. पर्यावरण पूरक डिझाईन, छतावर सौर पॅनल, तापमान नियंत्रणासाठी जाळीदार रचना, रेन वॉटर हार्वेस्टिंग व मजले निहाय नवीन सुविधा व विभाग असणार आहे.

या चार मजली रुग्णालयामध्ये प्रतीक्षा कक्ष व माहिती केंद्र, आपत्कालीन विभाग, प्रगत निदान केंद्र, रक्तपेढी, विशेष उपचार कक्ष, प्रशासकीय विभाग, शस्त्रक्रिया गृह, तीव्र निगा विभाग, सर्जिकल आयसीयू, हाय डिपेंडन्सी युनिट, मेडिकल आयसीयू, स्त्रीरोग व बालसंगोपन विभाग, लेबर रूम व प्रसूती वॉर्ड, नवजात शिशू निगा विभाग, बालकांची तीव्र निगा विभाग, जनरल वॉर्ड आदी सुविधा राहणार आहे.

रुग्णांना अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा एमआरआय, सिटी स्कॅन, डायलासिस, आयसीयू, एनआयसीयू यासारख्या सुविधा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे नागरिकांना स्थानिक स्तरावरच उपचाराच्या सुविधा उपलब्ध होईल.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक- प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष- १४ अंक २५५
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# प्रा. डॉ. जयश्री वैष्णव बुधवारी दूरदर्शनवर

**अमरावती/प्रतिनिधीः-** जयपूर अत्रौली घराण्याच्या शास्त्रीय गायिका प्रा. डॉ. जयश्री वैष्णव यांची मुलाखत बुधवार दि. १२ ऑगस्टला रात्री १० वाजता सह्याद्री वाहिनीवरील 'नागपूर दर्पण' या कार्यक्रमातून प्रसारित होणार आहे.

महाराष्ट्रातील नामवंत निवेदक नितीन भट त्यांच्याशी संवाद साधणार आहेत. डॉ. जयश्री वैष्णव यांची सांगीतिक कारकीर्द या कार्यक्रमातून उलगडली जाणार आहे. विदर्भातील विविध क्षेत्रातील गुणी व्यक्तिमत्वांच्या कार्याची दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरील 'नागपूर दर्पण' या कार्यक्रमातून दखल घेण्यात येते. यात अमरावतीच्या व्यक्तीचा सहभाग ही आनंदाची बाब आहे.

गेल्या चार दशकांहून अधिक काळापासून डॉ. जयश्री वैष्णव या शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रात कार्यरत असून लोकप्रिय शास्त्रीय गायिका अश्विनी भिडे- देशपांडे यांच्या मातोश्री विदुषी माणिकताई भिडे यांच्याकडून त्यांनी शास्त्रीय गायनाचे धडे घेतले आहेत. स्थानिक महिला महाविद्यालयात त्या संगीत विभागात प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. त्यांचा मोठा शिष्य परिवार असून त्यांनी शास्त्रीय आणि सुगम गायनाच्या अनेक मैफिली गाजविल्या आहेत. या कार्यक्रमाचे निर्माता मनोज जैन असून अमरावतीकरांनी या कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पद भरण्याची जाहीरात

तल्हा एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती द्वारा संचालित एस.के.कासिम उर्दु हायस्कूल, दर्याबाद, ता.अचलपूर, जि.अमरावती

(संस्था अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त आहे व शाळा १०० टक्के अनुदानित आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१ | शिक्षण सेवक (वर्ग ९-१०) | ०१ | बी.ए., बी.एड. | शासन नियमा-प्रमाणे |

**वरील पात्र उमेदवारांनी दिनांक २२.०८.२०२६ शनिवार रोजी सकाळी ११.३० वाजता मूळ प्रमाणपत्रासह व झेरॉक्स प्रती मुलाखतीकरीता खालील पत्त्यावर स्वखर्चाने उपस्थित रहावे.**

**पत्ता-**

**एस.के.कासिम उर्दु हायस्कूल, दर्याबाद**
**ता.अचलपूर, जि.अमरावती**
**मुख्याध्यापक - अब्दुल नसीम गुलाम नबी**
**मो.नं.८२७५२८२७६१**

**मुख्याध्यापक,**
**एस.के.कासिम उर्दु हायस्कूल, दर्याबाद**
**ता.अचलपूर, जि.अमरावती**

## जाहीर नोटीस

**विद्यमान न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.४९७/२०२६ ने.ता.२८.०८.२०२६

**अर्जदार -**
१. बिसमिल्ला शाह मगबूल शाह, वय ६० वर्षे,
२. रसूल शाह मगबूल शाह, वय ५१ वर्षे,
दोघेही रा.कुरेशी पुरा, अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. झाकिर शाह इब्राहीम शाहा, वय ५२ वर्षे,
४. फारुक शाह इब्राहीम शाहा, वय ५१ वर्षे,
५. हरुन इब्राहीम शाहा, वय ४८ वर्षे,
अर्जदार ३ ते ५ रा.रामदरा वार्ड नं.१, तळेगांव शामजीपंत, ता.आष्टी, जि.वर्धा

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार-** निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ व २ हे मयत **मगबुल शाह अजिज शाह आणि इब्राहीम शाह** यांच्या बालपणीच **अजीज शाह** यांचे निधन झाले. त्यामुळे त्यांच्या मृत्यूची नोंद अभिलेखात नाही. **नसीब बी अजीज शाह** ही अर्जदाराची आजी असून त्यांच्या मृत्यू २८.०९.१९९६ रोजी अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे झाला असून अर्जदार हे अजीज शाह आणि नसीब बी अजीज शाह यांचे नातू आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०६.०८.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१५४३/२०२६
**किशोर व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१५.०९.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
१. किशोर दशरथ यादव, वय ६१ वर्षे, व्यवसाय - सेवानिवृत्त
रा.जनार्दन पेठ, अमरावती, ता.जि.अमरावती
२. रामदास भुजाई यादव, वय ७८ वर्षे, व्यवसाय - सेवानिवृत्त
रा.भारती प्लॉट बाळापूर रोड, अकोला, ता.जि.अकोला
३. रामसुंदर भुजाई यादव, वय ६९ वर्षे, व्यवसाय - सायकल दुकान
४. काशिनाथ भुजाई यादव, वय ७३ वर्षे, व्यवसाय - मजुरी
५. श्रीमती ताराबाई रामनाथ यादव, वय ७१ वर्षे, व्यवसाय - घरकाम
न.३ ते ५ सर्व रा.जनार्दन पेठ, अमरावती, ता.जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **सुखई जावत्या यादव** हे दिनांक **०७.०५.१९४८** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **किशोर व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **किशोर व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२३.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 98/19/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व **भारती चॅरिटेबल ट्रस्ट केवल कॉलनी, अमरावती**
नोंदणी क्रमांक
बाबत अर्जदार - **डॉ.श्रेयस बाबुराव तायडे**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - काही नाही**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२७.०७.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक- प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३३४**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## नगर परिषद कार्यालय
## अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती
## जाहीर सुचना

### पाळीव जनावरे मोकाट सोडुन वाहतुकीस अडथळा निर्माण करणा-यांना जाहीर सुचना

असे निर्देशनास येते की, आपण आपली गुरढोर पाळीव जनावरे मोकाट सोडुन रहदारीला अडथळा निर्माण करीत आहात. आपली मोकाट जनावरे ही सार्वजनिक रस्त्यावर रस्त्याच्या मधोमध बसत असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. तसेच नागरीकांचे गंभीर अपघात होवुन नागरीकांच्या जिवास धोका निर्माण होत आहे.

तरी आपण आपले मालकीची मोकाट जनावरे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन तिन दिवसाचे आत आपल्या मालकीच्या जागेत बंदीस्त करावी अन्यथा नगर परिषद अंजनगाव सुर्जी मार्फत सदर जनावरे जप्त करण्यात येवुन गौरक्षण येथे पाठविण्यात येईल व आपणावर नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

**(अविनाश कृ. गायगोले)**
अध्यक्ष नगर परिषद
अंजनगाव सुर्जी

**(सौ. प्रियंका शंकरदादा मालठाणे)**
उपाध्यक्ष नगर परिषद
अंजनगाव सुर्जी

**(प्रविण देविदास नेमाडे)**
सभापती नगर परिषद
अंजनगाव सुर्जी

**(विजय रु. लोहकरे)**
मुख्याधिकारी (गट - अ)
नगर परिषद अंजनगाव सुर्जी

## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात-२०२५

**शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५** **(मान्य दिनांक २०.०७.२०२६)** **(प्रसिध्दी दिनांक २४.०७.२०२६)**

**संस्थेचे नांव-** (270702SC003) Shivgirbaba Shikshan Sanstha (Secondary/Higher Secondary) - With Interview

**शैक्षणिक स्तर-** Secondary/Higher Secondary

Shivgirbaba Shikshan Sanstha या व्यवस्थापनाच्या शाळेमध्ये खाली नमुद केलेल्या पदांसाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशील**

| अ.क्र. | प्रवर्ग | महिला | माजी | अंशकालीन | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | खेळाडू | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त(उर्वरित) पदे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनु.जाती | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| २ | इ.मा.व | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| ३ | एसईबीसी | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | एकूण | १ | ० | ० | ० | ० | ० | ३ | ४ |

**शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशिल** **(मान्य दिनांक २४.०७.२०२६)**

| अ.क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकविण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET/CTET | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Marathi | Graduate Teacher Std.(6-8) | Consolidated Pay - UGT(6-8) (16000) | Aided | Mathematics-Science | Marathi | Graduation | Diploma/ Graduation | TET Paper 2(Math-Science)/ CTET Paper 2(Math-Science) | 2 |
| 2 | Marathi | Graduate Teacher Std.(9-10) | Consolidated Pay - GT(9-10) (18000) | Aided | Language (Marathi) | ---- | Graduation | Graduation | --- | 2 |
| | | | | | | | | Total | | 4 |

**सर्वसाधारण सुचना -**

१) अभियोग्यता व बुद्धिमत्ता चांचणी २०२५ (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारापैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2025mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे असे उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करु शकतील. २)ईच्छुक व अर्हता प्राप्त करणारे उमेदवार ऑनलाईन जाहिरातीच्या अनुषंगाने पात्र असलेल्या पदासाठी पसंती क्रमांक नमुद करुन पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करतील.
३) इ.१ ली ते इ.५ वी व इ.६ वी ते इ.८ वी या गटातील पदांसाठी अभियोग्यता व बुद्धिमत्ता चांचणी-२०२५ (TAIT) परीक्षेपुर्वी शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) उत्तीर्ण असणारे उमेदवारच अर्ज करु शकतील. ४)इ.६ वी ते इ.८ वी या गटातील इतिहास/भूगोल/सामाजिक शास्त्र या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) सामाजिकशास्त्र विषय घेऊन TET-Paper 2/CTET-Paper-2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
५) इ.६ वी ते इ.८ वी या गटातील विज्ञान/गणित-विज्ञान या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) गणित-विज्ञान विषय घेऊन TET-Paper-2/CTET-Paper2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
६) इ.६ वी ते इ.८ वी या गटातील भाषा या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) गणित-विज्ञान किंवा सामाजिक शास्त्र यापैकी कोणताही विषय घेऊन TET-Paper2/CTET-Paper-2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
७) इ.१ ली ते ८ वी/इ.९ वी ते १२ वी/अध्यापक विद्यालय, या गटातील पदांसाठी अर्ज करणारा उमेदवार अभियोग्यता व बुद्धिमत्ता चांचणी-२०२५ ((TAIT)) या चाचणीस प्रविष्ट असणे आवश्यक आहे. ८)शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व अध्यापनाचे विषय, वयोमर्यादा, आरक्षण, अन्य पात्रता व आवश्यक कागदपत्रे इत्यादीसाठी सर्वसाधारण सुचना सविस्तर तपशिलासहhttps://tait2025.mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर पवित्र प्रणालीमध्ये **उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना** या शिर्षाखाली उपलब्धआहेत. सदर सुचना व सुचनामध्ये नमुद आवश्यक शासन आवश्यक शासन निर्णय यांचे अवलोकन करुन स्वतःची खात्री करुनच ऑनलाईन अर्ज करावेत.
९) व्यवस्थापनाने जाहिरातीत दर्शविलेल्या एकुण पदांमध्ये दिव्यांग आरक्षणाच्या पदांचा समावेश आहे. १०)व्यवस्थापनाने जाहिरातीत दर्शविलेल्या एकुण पदांमध्ये अनाथ आरक्षणाच्या पदांचा समावेश आहे. ११)व्यवस्थापनाच्या जाहिरातीत दर्शविलेल्या आरक्षणामध्ये व पदसंख्येमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.
१२) उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयांच्या अध्यापनाच्या दोन विषयांसाठी एक पूर्णकालीन पदाची जाहिरात असल्यास, या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता दोन्ही विषयांमध्ये पदव्युत्तर पदवी (किमान द्वितीय श्रेणीमध्ये) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
१३) जिल्हा परिषद शाळांमध्ये नव्याने नियुक्त होणाऱ्या शिक्षकांना शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग दिनांक २१.०६.२०२३ मधील तरतुदीनुसार जिल्हा बदलीचा हक्क असणार नाही, याचीउमेदवारांनी नोंद घ्यावी. १४)महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम दि.२६.०२.२०२४ अनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीताआरक्षणाची तरतूद विहितकरण्यात आली आहे. या आरक्षणाची कार्यपध्दती सदर आरक्षणाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क.३४६८/२०२४ तसेचत्या अनुषंगिक इतर याचिकांवरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

**अध्यक्ष**
**शिवगिरबाबा शिक्षण संस्था**

## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात

**कृषक सुधार मंडळ, तळेगाव दशासर (270710SC010)** द्वारा संचालित माध्यमिक कन्या विद्यालय, तळेगाव दशासर, ता. धामणगाव रे, जि. अमरावती येथे खाली नमूद केलेल्या पदासाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशील**

आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशील **मान्य दिनांक २०.०७.२०२६**

| अ.क्र. | माध्यम | पद | मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकविण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET/CTET | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Marathi | Under Graduate Teacher Std.(1-4/5) | Consolidated Pay UGT Pay - (16000) | Aided | All Subject | Marathi | HSC | Diploma | TET/CTET Paper1 | 1 |
| 2. | Marathi | Graduate Teacher Std.(6-8) | Consolidated Pay UGT 6-8 (16000) | Aided | Mathematics Science | Marathi | Graduation | Diploma/ Graduation | TET/CTET Paper2 | 1 |

आरक्षणनिहाय रिक्त पदांचा तपशील अनुसूचित जाती-१, इतर मागासवर्गीय-१

सूचना :-
१) वरील सर्व पदांसाठी शिक्षक भरती संदर्भात पवित्र पोर्टलवर दिलेल्या अटी व नियम सर्व उमेदवारांना बंधनकारक राहतील
२) अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०२५ (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (http://tait2025.mahateacherrecruitment.org.in) संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे. असेच उमेदवार अर्ज करू शकतील.
३) अधिक माहिती करिता इच्छुक उमेदवारांनी संकेतस्थळावर भेट द्यावी.

**अध्यक्ष/सचिव**
**कृषक सुधार मंडळ, तळेगाव द.**
**मो.क्र.९८३४६४१२३३**

**मुख्याध्यापिका**
**माध्यमिक कन्या विद्यालय**
**तळेगाव दशासर**

## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात

**शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५** **(मान्य दिनांक २४.०७.२०२६)**

**संस्थेचे नांव-** (270711SC006) The Satpuda Welfare Society, Salbardi (Secondary/Higher Secondary) - With Interview

**शाळेचे नांव-** सातपुडा माध्यमिक विद्यालय, पाळा ता. मोर्शी जि. अमरावती

The Satpuda Welfare Society, Salbardi या व्यवस्थापनाच्या शाळेमध्ये खाली नमुद केलेल्या पदांसाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशील**

| अ.क्र. | प्रवर्ग | महिला | माजी | अंशकालीन | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | खेळाडू | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त(उर्वरित) पदे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| | एकूण | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |

**शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशिल** **(मान्य दिनांक २४.०७.२०२६)**

| अ.क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकविण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET/CTET | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Marathi | Graduate Teacher Std.(9-10) | Consolidated Pay -GT(9-10) (18000) | Aided | Language Marathi | --- | Graduation | Graduation | ---- | 1 |
| 2 | Marathi | Graduate Teacher Std.(9-10) | Consolidated Pay - GT(9-10) (18000) | Aided | Social Science | Marathi | Graduation | Graduation | --- | 1 |
| | | | | | | | | Total | | 2 |

**सर्वसाधारण सुचना -**

सर्वसाधारण सुचना तपशिलासह (https://tait2025 mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर पवित्र प्रणालीमध्ये उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना या शीर्षाखाली उपलब्ध आहे.

**अध्यक्ष**
**दि.सातपुडा वेलफेअर सोसायटी,**
**सालबर्डी ता. मोर्शी जि. अमरावती**
**मो.९६७३५३७०५३**

**सचिव**
**दि.सातपुडा वेलफेअर सोसायटी,**
**सालबर्डी ता. मोर्शी जि. अमरावती**
**मो.९४२०१२६२१९**

## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात-२०२५

**शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५** **(मान्य दिनांक २०.०७.२०२६)** **(प्रसिध्दी दिनांक २४.०७.२०२६)**

**संस्थेचे नांव-** (270713SC008) SHRI MASTARAM BABA SHIKSHAN SANSTHA TALEGAON THAKUR (Secondary/Higher Secondary) - With Interview

**शैक्षणिक स्तर-** Secondary/Higher Secondary

SHRI MASTARAM BABA SHIKSHAN SANSTHA TALEGAON THAKUR या व्यवस्थापनाच्या शाळेमध्ये खाली नमुद केलेल्या पदांसाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशील**

| अ.क्र. | प्रवर्ग | महिला | माजी | अंशकालीन | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | खेळाडू | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त(उर्वरित) पदे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भ.ज.(ब) | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | एकूण | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशिल (मान्य दिनांक २०.०७.२०२६)

| अ.क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकविण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET/CTET | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Marathi | Graduate Teacher Std.(9-10) | Consolidated Pay - GT 9-10 (18000) | Aided | Language Marathi | -- | Graduation | Graduation | -- | 1 |

**सर्वसाधारण सुचना -**

१) अभियोग्यता व बुद्धिमत्ता चांचणी २०२५ (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारापैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2025mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे असे उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करु शकतील.
२) ईच्छुक व अर्हता प्राप्त करणारे उमेदवार ऑनलाईन जाहिरातीच्या अनुषंगाने पात्र असलेल्या पदासाठी पसंती क्रमांक नमुद करुन पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करतील.
३) इ.१ ली ते इ.५ वी व इ.६ वी ते इ.८ वी या गटातील पदांसाठी अभियोग्यता व बुद्धिमत्ता चांचणी-२०२५ (TAIT) परीक्षेपुर्वी शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) उत्तीर्ण असणारे उमेदवारच अर्ज करु शकतील.
४) इ.६ वी ते इ.८ वी या गटातील इतिहास/भूगोल/सामाजिक शास्त्र या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) सामाजिकशास्त्र विषय घेऊन TET-Paper 2/CTET-Paper-2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
५) इ.६ वी ते इ.८ वी या गटातील विज्ञान/गणित-विज्ञान या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) गणित-विज्ञान विषय घेऊन TET-Paper-2/CTET-Paper2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
६) इ.६ वी ते इ.८ वी या गटातील भाषा या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) गणित-विज्ञान किंवा सामाजिक शास्त्र यापैकी कोणताही विषय घेऊन TET-Paper2/CTET-Paper-2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
७) इ.१ ली ते ८ वी/इ.९ वी ते १२ वी/अध्यापक विद्यालय, या गटातील पदांसाठी अर्ज करणारा उमेदवार अभियोग्यता व बुद्धिमत्ता चांचणी-२०२५ ((TAIT)) या चाचणीस प्रविष्ट असणे आवश्यक आहे.
८) शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व अध्यापनाचे विषय, वयोमर्यादा, आरक्षण, अन्य पात्रता व आवश्यक कागदपत्रे इत्यादीसाठी सर्वसाधारण सुचना सविस्तर तपशिलासह https://tait2025.mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर पवित्र प्रणालीमध्ये **उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना** या शिर्षाखाली उपलब्ध आहेत. सदर सुचना व सुचनामध्ये नमुद आवश्यक शासन आवश्यक शासन निर्णय यांचे अवलोकन करुन स्वतःची खात्री करुनच ऑनलाईन अर्ज करावेत.
९) व्यवस्थापनाने जाहिरातीत दर्शविलेल्या एकुण पदांमध्ये दिव्यांग आरक्षणाच्या पदांचा समावेश आहे.
१०) व्यवस्थापनाने जाहिरातीत दर्शविलेल्या एकुण पदांमध्ये अनाथ आरक्षणाच्या पदांचा समावेश आहे.
११) व्यवस्थापनाच्या जाहिरातीत दर्शविलेल्या आरक्षणामध्ये व पदसंख्येमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.
१२) उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयांच्या अध्यापनाच्या दोन विषयांसाठी एक पूर्णकालीन पदाची जाहिरात असल्यास, या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता दोन्ही विषयांमध्ये पदव्युत्तर पदवी (किमान द्वितीय श्रेणीमध्ये) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
१३) जिल्हा परिषद शाळांमध्ये नव्याने नियुक्त होणाऱ्या शिक्षकांना शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग दिनांक २१.०६.२०२३ मधील तरतुदीनुसार जिल्हा बदलीचा हक्क असणार नाही, याचीउमेदवारांनी नोंद घ्यावी.
१४) महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम दि.२६.०२.२०२४ अनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षणाची तरतूद विहितकरण्यात आली आहे. या आरक्षणाची कार्यपध्दती सदर आरक्षणाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क.३४६८/२०२४ तसेच त्या अनुषंगिक इतर याचिकांवरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

**अध्यक्ष**
**श्री मस्तराम बाबा शिक्षण संस्था तळेगाव ठाकुर**

## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात-२०२५

**शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५** **(मान्य दिनांक २०.०७.२०२६)** **(प्रसिध्दी दिनांक ०६.०८.२०२६)**

**संस्थेचे नांव-** (270715SC012) JANATA VIDYA MANDAL AMRAVATI (Secondary/Higher Secondary) - With Interview

**शैक्षणिक स्तर-** Secondary/Higher Secondary

JANATA VIDYA MANDAL AMRAVATI या व्यवस्थापनाच्या शाळेमध्ये खाली नमुद केलेल्या पदांसाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशील**

| अ.क्र. | प्रवर्ग | महिला | माजी | अंशकालीन | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | खेळाडू | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त(उर्वरित) पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एसईबीसी | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २ | इमाव | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | एकूण | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |

शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशिल (मान्य दिनांक २०.०७.२०२६)

| अ.क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकविण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET/CTET | एकुण पदे एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Marathi | Under Graduate Teacher Std.(1-4/5) | Consolidated Pay - UGT (16000) | Aided | All Subjects | Marathi | HSC (Std.12th) | Diploma | TET Paper 1 CTET Paper 1 | 1 १ २ |
| 2 | Marathi | Under Graduate Teacher Std.(9-10) | Consolidated Pay - GT(9-10) (18000) | Aided | Science | Marathi | Graduation | Graduation | --- | 1 |
| | | | | | | | | Total | | 2 |

**सर्वसाधारण सुचना -**

१) अभियोग्यता व बुद्धिमत्ता चांचणी २०२५ (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारापैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2025mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे असे उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करु शकतील. २)ईच्छुक व अर्हता प्राप्त करणारे उमेदवार ऑनलाईन जाहिरातीच्या अनुषंगाने पात्र असलेल्या पदासाठी पसंती क्रमांक नमुद करुन पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करतील.
३) इ.१ ली ते इ.५ वी व इ.६ वी ते इ.८ वी या गटातील पदांसाठी अभियोग्यता व बुद्धिमत्ता चांचणी-२०२५ (TAIT) परीक्षेपुर्वी शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) उत्तीर्ण असणारे उमेदवारच अर्ज करु शकतील. ४)इ.६ वी ते इ.८ वी या गटातील इतिहास/भूगोल/सामाजिक शास्त्र या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) सामाजिकशास्त्र विषय घेऊन TET-Paper 2/CTET-Paper-2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
५) इ.६ वी ते इ.८ वी या गटातील विज्ञान/गणित-विज्ञान या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) गणित-विज्ञान विषय घेऊन TET-Paper-2/CTET-Paper2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
६) इ.६ वी ते इ.८ वी या गटातील भाषा या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) गणित-विज्ञान किंवा सामाजिक शास्त्र यापैकी कोणताही विषय घेऊन TET-Paper2/CTET-Paper-2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
७) इ.१ ली ते ८ वी/इ.९ वी ते १२ वी/अध्यापक विद्यालय, या गटातील पदांसाठी अर्ज करणारा उमेदवार अभियोग्यता व बुद्धिमत्ता चांचणी-२०२५ ((TAIT)) या चाचणीस प्रविष्ट असणे आवश्यक आहे. ८)शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व अध्यापनाचे विषय, वयोमर्यादा, आरक्षण, अन्य पात्रता व आवश्यक कागदपत्रे इत्यादीसाठी सर्वसाधारण सुचना सविस्तर तपशिलासहhttps://tait2025.mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर पवित्र प्रणालीमध्ये **उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना** या शिर्षाखाली उपलब्धआहेत. सदर सुचना व सुचनामध्ये नमुद आवश्यक शासन आवश्यक शासन निर्णय यांचे अवलोकन करुन स्वतःची खात्री करुनच ऑनलाईन अर्ज करावेत.
९) व्यवस्थापनाने जाहिरातीत दर्शविलेल्या एकुण पदांमध्ये दिव्यांग आरक्षणाच्या पदांचा समावेश आहे. १०)व्यवस्थापनाने जाहिरातीत दर्शविलेल्या एकुण पदांमध्ये अनाथ आरक्षणाच्या पदांचा समावेश आहे. ११)व्यवस्थापनाच्या जाहिरातीत दर्शविलेल्या आरक्षणामध्ये व पदसंख्येमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.
१२) उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयांच्या अध्यापनाच्या दोन विषयांसाठी एक पूर्णकालीन पदाची जाहिरात असल्यास, या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता दोन्ही विषयांमध्ये पदव्युत्तर पदवी (किमान द्वितीय श्रेणीमध्ये) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
१३) जिल्हा परिषद शाळांमध्ये नव्याने नियुक्त होणाऱ्या शिक्षकांना शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग दिनांक २१.०६.२०२३ मधील तरतुदीनुसार जिल्हा बदलीचा हक्क असणार नाही, याचीउमेदवारांनी नोंद घ्यावी. १४)महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम दि.२६.०२.२०२४ अनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीताआरक्षणाची तरतूद विहितकरण्यात आली आहे. या आरक्षणाची कार्यपध्दती सदर आरक्षणाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क.३४६८/२०२४ तसेचत्या अनुषंगिक इतर याचिकांवरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

**अध्यक्ष**
**जनता विद्या मंडळ अमरावती**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# एफडीएच्या कारवाईनंतर पिवळा गूळ बाजारातून गायब

## धोकादायक रसायनांनी गूळ विकल्यास जन्मठेप आणि १० लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद

**अमरावती/का.प्र.**
साखरेला अधिक नैसर्गिक आणि आरोग्यदायी पर्याय मानल्या जाणाऱ्या गुळातील भेसळीच्या प्रकरणांवर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) कारवाई सुरू केली आहे. या कारवाईनंतर, बाजारात चमकदार पिवळ्या गुळाची उपलब्धता कमी होत असल्याचे दिसून येत आहे. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, गुळाला आकर्षक रंग देण्यासाठी धोकादायक रसायने वापरणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. अहवालानुसार, काही उत्पादक ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी गूळ चमकदार पिवळा आणि पारदर्शक दिसावा म्हणून ऑक्झॅलिक ॲसिड, सुपरफॉस्फेट आणि इतर रासायनिक हायड्रॉक्साईडचा वापर करत होते. अशा रसायनांचे सेवन केल्यास आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात.

भेसळयुक्त गुळापासून आरोग्याला होणारे धोके तज्ज्ञांच्या मते, रसायनांनी भेसळ केलेल्या गुळामुळे छातीत जळजळ, आम्लपित्त आणि अल्सर यांसारख्या पचनाच्या समस्या उद्भवू शकतात. याशिवाय, त्वचेची ॲलर्जी, दमा आणि दीर्घकाळ सेवन केल्यास यकृत आणि मूत्रपिंडावरही विपरीत परिणाम होऊ शकतात. शुद्ध गूळ कसा ओळखावा रंग जो गूळ खूप पिवळा, पांढरा किंवा चमकदार असेल तो भेसळयुक्त असू शकतो. नैसर्गिक गूळ सहसा गडद तपकिरी किंवा काळा असतो.चव - जर गुळाची चव खारट किंवा कडू असून त्यात गोडसर छटा असेल, तर तो भेसळयुक्त असण्याची शक्यता



आहे.पाण्याची चाचणी - गुळाचा तुकडा पाण्यात बुडवल्यावर तळाशी रासायनिक पावडरसारखा अवशेष जमा होत असेल, तर तो भेसळयुक्त असू शकतो.नैसर्गिक ओळख - शुद्ध गूळ रंगाने गडद असतो आणि त्याची चव फक्त गोड असते.

**भेसळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई**

एफडीए (FDA) नुसार, 'अन्नपदार्थांमधील घातक रसायने कायदा' (Hazardous Chemicals in Food Act) अंतर्गत ६ महिने ते जन्मठेपेपर्यंतच्या शिक्षेची आणि १० लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद आहे. भेसळ करणाऱ्यांवर कारवाई केली जाऊ शकते किंवा दोषी आढळल्यास उत्पादक किंवा व्यापाऱ्याचा परवाना रद्द केला जाऊ शकतो. गूळ विक्रेता रुपेश साहू यांनी सांगितले की, एफडीएच्या कारवाईनंतर भेसळयुक्त गुळाचा पुरवठा कमी झाला असून, आता त्यांना प्रत्येक खेपसोबत गुणवत्ता तपासणीचे प्रयोगशाळा अहवाल मिळत आहेत. एफडीएचे सहआयुक्त विनय चौहान यांनी नागरिकांना आवाहन केले की, बेकायदेशीर रसायने आणि भडक पिवळा रंग वापरणाऱ्या उत्पादकांकडून बनवलेला गूळ खरेदी करू नये, तर नैसर्गिक रंगाच्या शुद्ध गुळाला प्राधान्य द्यावे. त्यांनी व्यापाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही दिला.

संक्षिप्त



## रविंद्र मेटकर यांना 'राष्ट्रीय शाश्वत कृषी पुरस्कार'

**अंजनगाव बारी-** अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव बारी लगतच्या म्हसला येथील प्रगतिशील शेतकरी तथा आधुनिक कुक्कुटपालन व्यावसायिक रविंद्र माणिकराव मेटकर यांना कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'प्रगतिशील कृषी सन्मान' या राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले. नवी दिल्ली येथील इंडिया इंटरनॅशनल सेंटर येथे आयोजित तिसरे राष्ट्रीय शाश्वत कृषी शिखर संमेलन व पुरस्कार-२०२६ मध्ये मेटकर यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.'कृषी समृद्धी २०४७ : सक्षम व आत्मनिर्भर कृषी परिसंस्था उभारणी' या संकल्पनेवर आधारित या संमेलनात कृषी,दुग्ध व्यवसाय, मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन, कृषी तंत्रज्ञान, पुनरुत्पादक शेती तसेच ग्रामीण मूल्यसाखळी यांसह विविध विषयांवर विचारमंथन करण्यात आले. कृषी क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्ती, संस्था, सहकारी संघटना, कंपन्या व शासकीय संस्थांचा विविध ४४ विभागांमध्ये 'राष्ट्रीय शाश्वत कृषी पुरस्कार-२०२६' देऊन गौरव करण्यात आला.या पुरस्कार सोहळ्यास केंद्रीय पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसाय मंत्री राजीव रंजन सिंह उर्फ ललन सिंह तसेच राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.




## किशोर बडगे यांचा राष्ट्रीय पुरस्कार

**शिराळा-** 'राष्ट्रीय संमेलन व पुरस्कार सोहळा–२०२६' अर्थात 'भारत गौरव सन्मान–२०२६' मध्ये सन्मानचिन्ह व सन्मानपत्र प्रदान किशोर बडगे यांना नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या 'राष्ट्रीय संमेलन व पुरस्कार सोहळा–२०२६' अर्थात 'भारत गौरव सन्मान–२०२६' या भव्य राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्यात सन्मानचिन्ह व सन्मानपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.सेंद्रिय शेती क्षेत्रात सातत्याने उत्तम कामगिरी करीत कृषी व्यवसायाला नवी दिशा देण्याबरोबरच शाश्वत व पर्यावरणपूरक शेतीला प्रोत्साहन देणाऱ्या त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन त्यांना हा राष्ट्रीय सन्मान प्रदान करण्यात आला. मान्यवरांची उपस्थिती या पुरस्कार सोहळ्यास राष्ट्रीय युवा पुरस्कारप्राप्त तथा निवासी आयुक्त डॉ. मनीष गवई तसेच राष्ट्रीय प्रधान मुखिया सरपंच संघ, नवी दिल्लीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष राहुल उके यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी अमोल भगत यांच्यासह समाजसेवा, कृषी, प्रशासन, शिक्षण, उद्योग व विविध सामाजिक क्षेत्रांतील अनेक मान्यवर उपस्थित होते. सेंद्रिय शेती क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत किशोर बडगे यांना मिळालेला हा सन्मान त्यांच्या कृषी क्षेत्रातील योगदानाचा गौरव करणारा ठरला.



## अरुणोदया इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी सीपीआर प्रशिक्षण

**अमरावती-** वि.म.वि परिसरातील अरूणोदय इंग्लिश स्कूल ॲन्ड ज्यू. कॉलेज ऑफ सायन्स, अमरावती येथे नुकतेच विद्यार्थ्यांना आपत्कालीन परिस्थितीत प्रसंगावधान राखून हृदय व फुफ्फुसांचे पुनरूज्जीवन (CPR) कसे करायचे याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक देण्यात आले. विद्यार्थ्यांना हृदयविकाराचा झटका अथवा अचानक व्यक्ती बेशुद्ध झाल्यास कोणती प्राथमिक काळजी घ्यावी, त्यावेळी सीपीआर कशा पद्धतीने करावे, छातीवर दाब देण्याची योग्य पद्धत तसेच आपत्कालीन वैद्यकीय मदत मिळेपर्यंत कोणत्या उपाययोजना कराव्यात, याबाबत तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ.सुदेश दार्वेकर सहाय्यक प्राध्यापक डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला अरुणोदय शिक्षण संस्थेच्या सचिव डॉ. भारती लुंगे पाटील, डॉ. मेघा नंदनवार, डॉ. संजय वाटाणे, वृषाली देशमुख, निलीमा वासेकर, अजिंक्य गावंडे, अरूणोदय ज्यु.कॉलेजच्या प्राचार्या विशाखा नाफडे,उपप्राचार्या सीमा कुथे, अरुणोदय इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका शिल्पा पाजनकर, उपमुख्याध्यापिका निता काळमेघ तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## आ.प्रा.वीरेंद्रभाऊ जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**
आपले सर्वांचे लाडके नेतृत्व आ.प्रा.वीरेंद्रभाऊ जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच नगरसेविका ॲड. कीर्ती राहुल इमले आणि नगरसेवक तथा गटनेता मो.अनिस सौदागर यांच्या वाढदिवसानिमित्त चांदूर रेल्वे शहरात विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

मंगळवार,११ ऑगस्ट रोजी दिवसभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, सामाजिक बांधिलकी जपत रुग्णसेवा, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव आणि विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. या उपक्रमाची सुरुवात सकाळी १० वाजता ग्रामीण रुग्णालय, चांदूर रेल्वे येथे रुग्णांना फळवाटप करून करण्यात येणार आहे. त्यानंतर



सकाळी ११ वाजता यशवंत लॉन्स, चांदूर रेल्वे येथे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केलेल्या ११० गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

यावेळी शहरातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत त्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करण्यात येणार आहे. तसेच न. प. हुतात्मा स्मारक अभ्यासिका येथील विद्यार्थ्यांसाठी पुस्तक भेट वितरणाचा उपक्रमही याच ठिकाणी राबविण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी, त्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन मिळावे आणि शहरातील युवा पिढीला ज्ञानाच्या दिशेने प्रेरणा मिळावी, या उद्देशाने या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या सर्व कार्यक्रमांसाठी आ.वीरेंद्र जगताप मित्र परिवार, चांदूर रेल्वे यांच्या वतीने नागरिक, विद्यार्थी, पालक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने कार्यक्रमासाठी सर्वांनी मंगळवार,११ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.४५ वाजता पक्ष कार्यालय, पोलीस स्टेशनसमोर, चांदूर रेल्वे येथे उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## डॉ.एस.आर.रंगनाथन जयंती निमित्त पुस्तक प्रदर्शनीचे आयोजन

**अमरावती-** श्री. दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट अमरावती द्वारा संचालित, तक्षशिला महाविद्यालय दारापूर येथे ग्रंथालय विभागाद्वारा भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांची १३४ जयंती साजरी करण्यात आली. या निमित्ताने ग्रंथालय विभागाद्वारा दोन दिवसीय 'पुस्तक प्रदर्शनीचे' आयोजित करण्यात आले होते.पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन व महामानवांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन केले व पुस्तक प्रदर्शनीचे उदघाटन केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यशवंत हरणे होते तर उद्घाटन प्राचार्या प्रा. वर्षा मोर्शे यांनी केले. प्रा. वर्षा मोर्शे यांनी आपल्या उद्घाटनीय भाषणामध्ये उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापक वृंद यांना



आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथालयाचे महत्व यावर माहिती दिली तर वाचन संस्कृती कशी वाढवावी तसेच शिक्षण घेतांनी ग्रंथालयाचा जास्तात जास्त उपयोग करावा असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एस. बी. खंडारे यांनी केले. त्यानंतर कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून लाभलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यशवंत हरणे यांनी सर्व उपस्थितांना डॉ.एस.आर. रंगनाथन जयंतीच्या शुभेच्छा दिल्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील सर्व सुविधांचा लाभ घ्येन्याचे आव्हाहन या प्रसंगी त्यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. खेमानंद फुलझेले यांनी केले तर आभार भूगोल विभाग प्रमुख डॉ. कुंदन अलोणे यांनी मानलेत. या कार्यक्रमास वरिष्ठ व करिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.दोन दिवसीय 'पुस्तक प्रदर्शनीचे' आयोजित करण्यात आले होते. दोन्ही दिवशी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षेकेतर कर्मचारी यांनीप्रदर्शानीला भेट दिली.

## आदिवासी बांधवांना न्यायासाठी पोलीस अधीक्षकांना निवेदन

**अमरावती** -अ.भा.ग्राहक कल्याण परिषद, अमरावती जिल्ह्याच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक यांना धारणी तालुक्यातील काकरमल येथील आदिवासी बांधव दीपक जांभेकर यांच्या आर्थिक फसवणुकीबाबत निवेदन देण्यात आले. संघटनेचे पदाधिकारी दीपक जांभेकर यांची ६,१० लाख रुपयांची फसवणूक झाल्याची तक्रार संघटनेला प्राप्त झाली होती. या प्रकरणी न्याय मिळणे बाबत जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी निवेदनाची गंभीर



दखल घेत संबंधित प्रकरणात धारणीचे पोलीस निरीक्षक यांना तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश दिले. संघटनेचे राज्य चेअरमन गजानन मुदगल,राज्य सचिव ॲड. प्रभाकर वानखडे, संजय जाधव,निलेश टवलारे,मयूर बासुंदे, नंदा राऊत व आदी पदाधिकारी यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयाचे प्रशासकीय अधिकारी यांना रुग्णांना वैद्यकीय सेवा, स्वछता आदी सुविधा उपलब्ध करून देणे बाबत निवेदन दिले.

तसेच झेनिथ सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल मधील डॉक्टर यांच्या तर्फे रुग्णांना देण्यात येणारी अपमानस्पद वागणूक, अतिरिक्त बिल आकारणे, महत्वाच्या सुविधेचा अभाव या प्रकरणी निवेदन दिले.याप्रसंगी संघटनेचे महिला राज्य सचिव जोत्स्ना शेटे, उपाध्यक्ष उज्वला महाजन, पवन सुर्जेकर, विजय अनासने, संगीता ओकार, सविता इंगोले, रुपाली देशमुख, मंगला अस्वार,बबीता राठोड, सीमा नागोचा, वैशाली जवंजाळ आदी पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

## रखडलेल्या रस्त्याच्या डांबरीकरणाची आ.अडसड यांचे कडे मागणी

**अंजनगाव बारी/वार्ताहर**
अंजनगाव बारी जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या पार्डी (देवी) ते मांजरी म्हसला रस्ता क्र. ग्रा.मा. १५० याची गेल्या ५० वर्षांपासून दुरवस्था झाली असून, या रस्त्याचे तातडीने डांबरीकरण करण्यात यावे, अशी मागणी भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केली आहे.भाजपा बडनेरा विधानसभा अमरावती ग्रामीण कार्यकारिणीच्या वतीने याबाबतचे निवेदन आमदार तथा भाजपा अमरावती जिल्हाध्यक्ष (ग्रामीण) प्रतापदादा अडसड यांच्याकडे सादर करण्यात आले.




पार्डी (देवी) ते मांजरी म्हसला रस्ता क्र. ग्रा.मा. १५० हा महत्त्वाचा जोडरस्ता अनेक वर्षांपासून खराब अवस्थेत असून, रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. पावसाळ्यात या रस्त्यावर चिखल व पाणी साचल्याने नागरिक, शेतकरी, विद्यार्थी तसेच वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे या रस्त्याचे डांबरीकरण तातडीने करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

रस्त्याचे डांबरीकरण झाल्यास पार्डी (देवी), मांजरी म्हसला व परिसरातील नागरिकांची दळणवळणाची मोठी सोय होणार असून, शेतकऱ्यांना शेतीमालाची वाहतूक करणेही सुलभ होणार आहे. त्यामुळे नागरिकांच्या मागणीची तातडीने दखल घेऊन ग्रा.मा. १५० रस्त्याचे डांबरीकरण लवकरात लवकर सुरू करण्यात यावे, अशी मागणी भाजप पदाधिकाऱ्यांनी केली.यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष, बडनेरा विधानसभा–भातकुली ग्रामीण विलास राठोड, भाजपा सरचिटणीस सोपानभाऊ मुळे, ज्येष्ठ कार्यकर्ते सुरेशराव कडव, विशेष दंडाधिकारी निखिल पोकळे, मनोज पुनसे, भाजपा अमरावती ग्रामीण सोशल मीडिया प्रमुख शैलेश पोकळे, प्रमोद गोळे, मुकुंदराज होळकर तसेच भाजप बडनेरा ग्रामीण महिला मोर्चाच्या अध्यक्षा दिपाली मलवार यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## जागतिक आदिवासी दिन साजरा



**कुऱ्हा** - जय सेवा आदिवासी बहुउद्देशीय महिला संस्था कुऱ्हा येथे जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी झेंडा जवळ पुजा करिता गावातील सर्व आदिवासी महिला,पुरूष व लहान मुलांसह भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे व झेंड्याचे पूजन करून जागतिक आदिवासी दिवस साजरा करण्यात आला.यावेळी अर्चना गेडाम,संगीता कुंजाम,मंगला सलाडे, वंदना कुंजाम,छबुबाई उईके,मंगला धुर्वे,रमाबाई आत्राम, माला सयामे,मालू कुंजाम सबकल्पना कुंजाम,शोभा भलावी, वंदना धुर्वे, महानंदा भलावी,डिंगाबर सलाडे, नारायणराव वाडीवा, महादेव कुंजाम, वाल्मिक आत्राम,लक्ष्मण कुंजाम,अरविंद भलावी,संतोष उईके,रविंद्र कुंजाम,वैभव उईके,सुरज उईके, प्रकाश भलावी आदी आदिवासी बांधव उपस्थित होते.

# अमरावतीत नगरसेवकांसाठी एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा

## अधिनियम, सभाशास्त्रासह समाजमाध्यम व्यवस्थापनावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**अमरावती/का.प्र.**
अमरावती महानगरपालिकेच्या कामकाजात लोकप्रतिनिधींची भूमिका अधिक प्रभावी, सक्षम आणि जबाबदार करण्याच्या उद्देशाने अमरावती महानगरपालिका आणि अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने माननीय नगरसेवक व नगरसेविकांसाठी एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.पंजाबराव देशमुख प्रबोधिनी सभागृह, अमरावती येथे ही कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

या प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले, उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश माडीकर, सभागृह नेते चेतन गावंडे, विरोधी पक्षनेते विलास



इंगोले, गटनेते नाना आमले, गटनेते डॉ. राजेंद्र तायडे, गटनेते शेख हमीद शेख वाहेद यांच्यासह महानगरपालिकेचे सन्माननीय नगरसेवक व नगरसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते. या पार्श्वभूमीवर नगरसेवकांना त्यांच्या घटनात्मक व कायदेशीर अधिकारांसोबतच कर्तव्यांचीही माहिती असणे गरजेचे आहे. ही बाब लक्षात घेऊन. कार्यशाळेत विविध विषयांवर तज्ज्ञांकडून सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यशाळेच्या पहिल्या महत्त्वपूर्ण सत्रात महानगरपालिका अधिनियमातील महत्त्वाच्या तरतुदी व प्रश्न या विषयावर पुणे महानगरपालिकेचे माजी सहाय्यक आयुक्त व नगरसचिव शिवाजीराव दौंडकर यांनी मार्गदर्शन केले. महानगरपालिका अधिनियमातील विविध तरतुदी, लोकप्रतिनिधींचे अधिकार व जबाबदाऱ्या, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वय, सभागृहातील प्रश्न मांडण्याची पद्धत तसेच महानगरपालिकेच्या कामकाजाशी संबंधित महत्त्वाच्या कायदेशीर बाबी याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. लोकप्रतिनिधींनी कायद्याच्या चौकटीत राहून नागरिकांच्या प्रश्नांची प्रभावीपणे मांडणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबींवरही त्यांनी प्रकाश टाकला. कार्यशाळेतील आणखी एका महत्त्वपूर्ण सत्रात सभा कार्यपद्धती, सभाशास्त्र व प्रश्न या विषयावर छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे माजी नगरसचिव ॲड. महबूबखां पठाण यांनी मार्गदर्शन केले. सभागृहातील कामकाज अधिक शिस्तबद्ध, प्रभावी आणि नियमबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी सभाशास्त्राचे ज्ञान महत्त्वाचे असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

आजच्या डिजिटल युगात समाजमाध्यमे ही नागरिकांशी संवाद साधण्याचे प्रभावी माध्यम बनली आहेत. यावेळी उपस्थित मान्यवरांनी प्रशिक्षण कार्यशाळेचे महत्त्व अधोरेखित करताना स्थानिक स्वराज्य संस्थेचे कामकाज अधिक सक्षम करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी सातत्याने नवनवीन ज्ञान आत्मसात करणे आवश्यक असल्याचे सांगितले. कायदे, नियम, सभागृहाची कार्यपद्धती आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा योग्य वापर करून नागरिकांना अधिक चांगल्या नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी लोकप्रतिनिधींनी सक्रिय भूमिका बजावावी, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. महानगरपालिका आणि अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या प्रशिक्षण कार्यशाळेला नगरसेवक व नगरसेविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध विषयांवरील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनामुळे लोकप्रतिनिधींना महानगरपालिकेच्या कामकाजाची अधिक सखोल माहिती मिळाली. प्रमाणपत्र वितरणानंतर या एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचा समारोप करण्यात आला.

# अमरावती शहरात हलक्या व जड मालवाहू वाहनांना प्रवेशबंदी

**पोलीस प्रशासनाची प्रस्तावित अधिसूचना जारी**

## २१२ प्राणघातक अपघातांमध्ये २४६ निष्पाप नागरिकांचा बळी

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात वाढती लोकसंख्या, वाहनांची मोठी वर्दळ आणि त्यामुळे होणारे प्राणघातक अपघात रोखण्यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाने शहरातील प्रमुख मार्गांवर हलक्या व जड मालवाहू वाहनांना प्रवेशबंदी घालण्याबाबतची प्रस्तावित अधिसूचना जारी केली आहे.

पोलीस उपायुक्त (मुख्यालय) प्रांजली सोनवणे यांनी मुंबई पोलीस कायदा १९५१ चे कलम (१) (ब) आणि मोटर वाहन कायदा १९८८ च्या कलम ११५ अन्वये मिळालेल्या अधिकारांनुसार हे प्रस्तावित आदेश पारित केले आहेत. शहरात सन २०२४ ते जुलै २०२६ या काळात एकूण १,१०८ अपघात झाले आहेत. यातील २१२ प्राणघातक अपघातांमध्ये २४६ निष्पाप नागरिकांचा बळी गेला असून ९१३ व्यक्ती गंभीर व किरकोळ जखमी झाल्या आहेत. ही गंभीर परिस्थिती ☞(पान २ वर)

### ■ या वाहनांना सुट-

प्रवेशबंदीतून सूट आणि वेळ (अपवाद)अत्यावश्यक सेवांना सूट देण्यात आली आहे. यात पेट्रोल, डिझेल, गॅस, शासकीय धान्य वितरण वाहने, महापालिका कचरा संकलन, अतिक्रमण विभाग, पोलीस, रुग्णवाहिका व अग्निशमन दलाच्या वाहनांना प्रवेशबंदीतून पूर्ण सूट असेल. तसेच या वाहनांना ताशी २० किमीची वेग मर्यादा पाळण्याचे बंधन घालण्यात आले आहे. अन्नधान्य व कृषी माल वाहतूकीला सूट देण्यात आली असून याअंतर्गत दररोज दुपारी ११.०० ते दुपारी १६.०० वाजेदरम्यान ठरवून दिलेल्या मार्गांवरून जसेकी रेल्वे मालधक्का बडनेरा, एमआयडीसी, कृषी उत्पन्न बाजार समिती या भागात वाहतुकीस परवानगी राहील.



### ■ हे मार्ग कायमस्वरूपी बंद

कायमस्वरूपी बंद राहणाऱ्या मार्गांमध्ये गांधी चौक ते रविनगर, गांधी चौक ते राजापेठ आणि गांधी चौक ते अंबापेठ मार्ग तसेच बजरंग टेकडी ते विलासनगर, पटवा चौक, मोरबाग, मसानगंज, गर्ल्स हायस्कूल चौक ते इर्विन चौक. शहरातील परकोटाच्या आतील दाट लोकवस्तीतील सर्व अंतर्गत मार्गाचा समावेश आहे.

# मेळघाट ब्लड बँकेसमोर चिमुकलीचा छिन्नविछिन्न मृतदेह आढळला



**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर - परतवाडा रोडवरील मेळघाट ब्लड बँकेसमोर १० ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेचार वाजेच्या सुमारास एक ते सवा महिन्याच्या चिमुकलीचा मृतदेह झुडपामध्ये आढळून आल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे नागरिकांमधून अत्यंत तीव्र संताप आणि हळहळ व्यक्त केली जात आहे. हा प्रकार स्त्री भ्रूणहत्या किंवा अनैतिक संबंधातून जन्मलेल्या नवजात बालकाला टाकून देण्याचा असावा का? हे पोलिसांच्या चौकशीत स्पष्ट होणार आहे.

प्राप्त माहितीनुसार, मेळघाट ब्लड बँकेसमोर रस्त्यावरून जाणाऱ्या काही नागरिकांना झुडपांमध्ये एक संशयास्पद चादर दिसली. जवळ☞(पान २ वर)

■ हे बाळ नेमके कोणाचे आहे? त्याला येथे कुणी आणून ठेवले ? आणि बाळाचा मृत्यू नेमका कधी आणि कसा झाला? या सर्व प्रश्नांचा शोध आता पोलीस अधिकारी घेत आहेत. या परिसरातील खासगी रुग्णालये, प्रसुती गृहे तसेच सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली जात आहे. एकीकडे शासन 'बेटी वाचवा, बेटी शिकवा'चा नारा देत असताना दुसरीकडे निष्पाप बाळाला अशा प्रकारे वाऱ्यावर सोडून देण्याच्या या अमानुष कृत्यामुळे अचलपूर - परतवाडा शहरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. या घटनेमागील निर्दयी दोषींचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून केली जात आहे. चिमुकल्याच्या मृत्यूमागील सत्य पोलिस चौकशीत समोर येणार आहे. फॉरेन्सिक पथक सुद्धा घटनास्थळी दाखल झाले होते .घटनास्थळी पोलिसांचा तगडा बंदोबस्त होता.

# स्वतःच्या घरावरच फायरिंगचा कट; २४ तासांत चौघे अटकेत

## १.५० लाखांची सुपारी दिल्याचा पोलिसांचा दावा,विपुल ठाकरे फरार



### -देशी कट्ट्यातून गोळीबार करून खुनाचा प्रयत्न

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्वतःच्याच घरावर देशी कट्ट्यातून गोळीबार करून प्राणघातक हल्ला घडवून आणण्याचा कट रचल्याची धक्कादायक बाब अमरावती शहर गुन्हे शाखेच्या तपासात समोर आली आहे. अर्जुन नगर परिसरात झालेल्या गोळीबाराच्या घटनेचा गुन्हे शाखेने अवघ्या २४ तासांत छडा लावत चार जणांना अटक केली. या प्रकरणातील संशयीत मुख्य सूत्रधार घरमालक विपुल भानुदास ठाकरे सध्या फरार असून, त्याचा शोध सुरू आहे.

रविवारी (९ ऑगस्ट) गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अर्जुन नगर येथे विपुल ठाकरे यांच्या घरावर देशी कट्ट्यातून गोळीबार करण्यात आल्याची माहिती डायल ११२ वर प्राप्त झाली. घटनेची माहिती मिळताच गाडगेनगर पोलिस, गुन्हे शाखेचे पथक आणि☞(पान २ वर)

# ४ कोटी रुपयांचे २ किलो ८५० ग्रॅम सोने तारण

## ९० ग्रॅम सोने दोन सराफांकडून जप्त; तिन्ही आरोपींना पोलीस कोठडी







**अमरावती/प्रतिनिधीः-** विमको टॉवर येथील मुथूट फिनकार्पच्या शाखेत झालेल्या कथित अपहाराच्या तपासाला आता वेग आला असून, ग्राहकांच्या तक्रारींमधून तब्बल २ किलो ८५० ग्रॅम सोने तारण ठेवण्यात आल्याचे समोर आले आहे. या सोन्याची किंमत तब्बल ४ कोटी ८ लाख रुपये असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. तपासादरम्यान सिटी कोतवाली पोलिसांनी शहरातील दोन सराफ व्यावसायिकांकडून ९० ग्रॅम सोने जप्त केले असून, त्यासंबंधीच्या अधिकृत पावत्याही ताब्यात घेतल्या आहेत.

या प्रकरणातील संशयित आरोपी शाखा व्यवस्थापक शुभम वासेवाय याच्यासह त्याचे साथीदार सुरज अनिल खेरकर आणि धिरज पंचमराव सिरसाट या तिघांना सोमवारी (१० ऑगस्ट) न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने तिन्ही आरोपींना १३ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. आरोपींच्या पोलीस कोठडीतील चौकशीतून या आर्थिक गैरव्यवहारातील आणखी धागेदोरे हाती लागण्याची शक्यता आहे.

ग्राहकांनी सिटी कोतवाली पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपींनी ग्राहकांकडून सोने तारण ठेवून घेतल्यानंतर त्याच्या व्यवहारात कथित गैरप्रकार केल्याचा आरोप आहे. आतापर्यंत पोलिसांकडे ६० तक्रारी दाखल झाल्या आहेत. या तक्रारींच्या तपासातून ४ कोटी ८ लाख रुपये किमतीचे २ किलो ८५० ग्रॅम सोने तारण ठेवण्यात आल्याचे समोर आले आहे. याशिवाय काही ग्राहकांकडून मुद्दल किंवा व्याजाच्या नावाखाली ५१ लाख ३३☞(पान २ वर)

# बार्शी टाकळीच्या तरुणाचा चिखलदरामध्ये मृत्यू

**सेल्फी घेताना तोल जाऊन कोसळला दरीत**



**चिखलदरा/प्रतिनिधीः-** मित्रांसोबत चिखलदरा येथे फिरण्यासाठी गेलेल्या बार्शीटाकळीतील युवकाचा सेल्फी घेताना तोल जाऊन पंधरा ते वीस फूट खोल दरीत कोसळल्याने दुर्दैवी मृत्यू झाला. संतोष लाडके (वय ४०) असे मृत युवकाचे नाव आहे. ७ ऑगस्ट रोजी सकाळी अकरा ते बाराच्या सुमारास परतवाडा–चिखलदरा मार्गावरील वनविभागाच्या एका पॉइंट जवळ ही हृदयद्रावक घटना घडली. या घटनेने बार्शीटाकळी परिसरात हळहळ व्यक्त होत असून, लाडके कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

माहितीनुसार संतोष लाडके हे धाबा येथील काही मित्रांसोबत चिखलदरा येथे फिरण्यासाठी गेले होते. परतवाडा–चिखलदरा मार्गावरील एका पॉइंट जवळ मित्रांसोबत सेल्फी घेत असताना अचानक त्यांचा तोल गेला आणि ते पंधरा ते वीस फूट खोल दरीत कोसळले. या दुर्घटनेत त्यांच्या डोक्याला व शरीराला गंभीर दुखापत झाली. घटना घडताच सोबतच्या मित्रांनी प्रसंगावधान राखत त्यांना तातडीने दरीतून बाहेर काढले. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना परतवाडा येथील दवाखान्यात☞(पान २ वर)

# एसी कॉम्प्रेसर स्फोटातील प्रवीण डवले यांचा उपचारादरम्यान मृत्यू



**अचलपूर/प्रतिनिधीः-** परतवाडा शहरातील गजबजलेल्या तिलक चौक परिसरात एसी कॉम्प्रेशरचे काम सुरू असताना गॅस सिलेंडरचा अचानक भीषण स्फोट झाल्याची घटना घडली होती. या दुर्घटनेत इलेक्ट्रॉनिकचे काम करणारे प्रवीण डवले गंभीर जखमी झाले होते. स्फोटाची तीव्रता एवढी मोठी होती की, त्यांच्या शरीराला गंभीर दुखापत झाली असून एक पाय तुटून वेगळा झाला होता तसेच चेहऱ्यावरही गंभीर दुखापत झाली. घटनेनंतर नागरिकांनी तातडीने जखमी प्रवीण डवले यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. एसी कंप्रेसरचे काम करत असताना नेमका कोणत्या कारणामुळे गॅस सिलेंडरचा स्फोट झाला ? याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नाही.घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेतली होती. स्फोटामागील नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे.

# विधी सेवा प्राधिकरणाकडून वकिलांसाठी ४० तासांचे प्रशिक्षण



### -जिल्हयातील ४७ वकिलांचा सहभाग

**अमरावती/प्रतिनिधीः-** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अमरावती यांच्या वतीने वकिलांसाठी ७ ते ११ ऑगस्ट २०२६ या कालावधीत ४० तासांचे मध्यस्थी प्रशिक्षण जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती येथे सुरु आहे.

अमरावती जिल्हयातील एकूण ४७ वकील प्रशिक्षण घेत असून त्याचा फायदा पक्षकारांना व न्यायालयाला होणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे वरिष्ठ अधिवक्ता प्रथमेश पोपट, न्यायाधीश वरिष्ठ स्तर, बेलापुर,☞(पान २ वर)

# जिल्ह्यातील मतदार गणना अर्जांचे ९९.९८ टक्के वितरण पूर्ण

### -डिजिटायझेशनचे काम अंतिम टप्प्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) सुरु असून आज (दि.१०) दुपारी १२ वाजेपर्यंत जिल्ह्यात एकूण ९९.९८इ गणना अर्जांचे वितरण पूर्ण झाले आहे व डिजिटायझेशनचे कामही अंतिम टप्प्यात आहे. जिल्ह्यातील एकूण २५ लाख ४५ हजार ६७७ मतदारांपैकी २५ लाख ४५ हजार १८३ मतदारांपर्यंत हे अर्ज पोहोचवण्यात आले आहेत. जिल्ह्यातील ८ विधानसभा मतदार संघांपैकी धामणगाव रेल्वे, बडनेरा, दर्यापूर, मोर्शी आणि अचलपूरमध्ये अर्ज वितरणाचे १०० टक्के काम पूर्ण झाले आहे. अमरावती (९९.९९टक्के), मेळघाट (९९.९९ टक्के) आणि तिवसा (९९.८६ टक्के) या मतदारसंघांमध्येही वितरण प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. जिल्ह्यात आतापर्यंत २१ लाख ८१ हजार ८९ गणना अर्ज गोळा करण्यात आले असून, गोळा झालेल्या सर्व अर्जांचे डिजिटायझेशन पूर्ण करण्यात आले आहे. जिल्ह्यातील हे एकूण प्रमाण ८५.६८ टक्के आहे. धामणगावरेल्वे मतदार संघात डिजिटायझेशन ८६.८९ टक्के, बडनेरा ८२.६९ टक्के, अमरावती ७८.५८ टक्के, तिवसा ८३.३४ टक्के, दर्यापूर(अ.ज.) ९०.१६ टक्के, मेळघाट (अ.जा.) ८८.०१ टक्के, अचलपूर ८७.६७ टक्के,मोर्शी मतदार संघात ९०.६४% डिजिटायझेशन पूर्ण झाले आहे.निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात विशेष सखोल ☞(पान २ वर)

# टीटी नगरातातील फ्लॅटमध्ये सुरू होता देहव्यवसाय

### पोलिसांची धाड - पुरुषासह अन्य एक महिला ताब्यात



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील राजापेठ पोलीस स्टेशनच्या हद्दीतील टीटी नगर परिसरातील एका फ्लॅटचा वापर देहव्यवसायासाठी केला जात असल्याचा प्रकार अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या कारवाईत उघडकीस आला. पोलिसांनी सोमवारी (१० ऑगस्ट) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास संबंधित फ्लॅटवर छापा टाकून एका महिलेला अटक केली, तर एका पुरुषासह अन्य एका महिलेला ताब्यात घेतले. टीटी नगरातील एका फ्लॅटमध्ये संशयास्पद हालचाली सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. माहितीची खातरजमा इ(पान २ वर)











